# जर्मनीचे महत्त्वाकांक्षी कैसर !



दुसरा, जर्मन राणी व राजकन्या.

२१·५·७·१९

# कैसरचें मनश्चित्र !

## १ कैसरचा परिचय.

सुमारें चार वर्षें झालीं असतील, एका विद्वान इंग्रजानें एके ठिकाणीं लिहिलें होतें कीं, ' इंग्लंड व जर्मनी यांच्यामध्यें युद्ध होईल अशी जी शंका माणसें प्रदर्शित करतात, ती त्यांची चूक आहे. कारण सूर्याचा उदय पश्चिमेस होण्याइतकीच असंभवनीय ही गोष्ट आहे. ' पहिल्या पहिल्यानें जर्मनीचें शिक्षण, सभ्यता, प्रीति, सहृदयता, प्रतिष्ठा आणि स्नेहसंबंध यांकडे पाहतांना वरील विचार मनांत येत असे यांत संदेह नाहीं. जर्मनीचा इतका वेळ, इतकें चातुर्य आणि इतकें द्रव्य, वास्तविक, आमचे सम्राट व आम्हीं यांच्याबरोबर लढण्यांत नष्ट केलें जाईल ही गोष्ट त्यावेळीं कोणाच्याही ध्यानांत सहजासहजीं येण्यासारखी नव्हती. इतकें मात्र खरें कीं, अनुभाविक सैनिक या भयंकर प्रयत्नांकडे संशययुक्त दृष्टीनें पहात होते; व आपापली सेना या भावि युद्धासाठीं तयार ठेवण्याची तजवीज करीत होते; परंतु साधारणतः असें वाटत होतें कीं, जर्मनी शांतता स्थापित करणें हेंच आपलें पवित्र कर्तव्य मानील ! जर्मनी देश अशा रीतीनें आपल्या शिक्षणाचा उपहास, सभ्यतेचा अनादर, प्रीतीची अवहेलना, सहृदयतेचा संहार, प्रतिष्ठेचा नाश

आणि स्नेह संबंधाची उपेक्षा करून, स्वत: होऊन रणक्षेत्रांत येऊन उभा ठाकेल अशी शंका सुद्धा त्यावेळीं येत नव्हती. तथापि इतक्या गोष्टी झाल्यानें जरी कांहीं भय वाटलें तरी तें जर्मनीला आपल्या गौरवानें तें दूर करितां आलें असतें. कारण आम्हां सर्व सामान्यजनांची अशी समजूत होती कीं, एखादा मनुष्य अगर देश जितका मोठा व जितका बलवान असेल तितकाच तो विचारीही असेल. या समजुतीच्या–तत्वाच्या–जोरावर आम्हीं आपल्या मनाचें समाधान करीत असूं; पण मोठी खेदाची गोष्ट ही कीं, शक्तिमान मनुष्य किंवा देश विवेकपूर्ण नसेल तर तो बसल्याबसल्यासुद्धां मोठमोठें अनर्थ करूं शकतो. या तत्वानुसार, युरोपांतील चालू महायुद्धानें आमची उपरोक्त समजूत अंशत: तरी खोटी करून टाकून, यावेळीं सर्व जनतेला जर्मनीच्या दुष्कृत्यांकडे साश्चर्य पहावयास लाविलें आहे ! अशा प्रकारचे विलक्षण अपवाद साध्या कारणानें कधीं घडून येत नाहींत. सर्वव्यापक अशी समजूत–विश्वास–नाहींसा करणारीं कारणें नेहमीं असाधारण व अद्भुत शक्तीनें परिपूर्ण असतात. जेव्हां ही अद्भुत शक्तिनें परिपूर्ण असतात; जेव्हां ही अद्भुतशक्ति सौम्य स्वरूपाची असते, तेव्हां सुखपरिणामी होते. पण उग्रपक्षीं ती घोर आपत्तीचें मूळ कारण होऊन बसते. जर्मन जातीच्या स्वाभाविक उग्रतेला हल्लींच्या कैसरच्या कुटिल नीतिनें भडकवून दिलें ! मग काय ? जिकडे ते चालले तिकडेच, त्यांना आपला नेता मानणारे

जर्मन ही वळलें; आणि आज युरोपची भूमि लाखों निरपराधी सैनिक आणि प्रजा यांच्या रक्तानें रंगून राहिली आहे ! ! या सर्व गोष्टीचें मूळ कारण जी कैसरची कुटिल नीति, तिचे जनक-हल्लींचें जर्मनीचे कैसर होत. आपल्या विलक्षण बुद्धीच्या आधीन होऊन यांनीं जर्मनीचें शिक्षण, तिची सभ्यता, प्रीति सहृदयता, प्रतिष्ठा आणि तिचा स्नेहसंबंध यांना वेगळेंच स्वरूप धारण करण्यास लावलें. इतकेंच नाहीं तर सर्व देशाचें रूपांतर करून टाकलें. प्रथमत: तेथील सर्व शक्ति उग्र आणि भयानक बनली गेली; व तिच्या संसर्गानें सर्व युरोपांत भयंकर सांसर्गिक ज्वाळा उठूं लागल्या आहेत ! अशा या विलक्षण बुद्धिशाली कैसरचें-जर्मनीच्या बादशहाचें नांव-विलियम आहे. यांच्याविषयीं मराठींत आजपर्यंत कोणासच वाचावयास न मिळालेली विश्वासनीय व निरडक अशीच माहिती प्रस्तुत पुस्तकांत देण्याचें योजिलें आहे.

कैसर-दुसरे विलियम-यांचा जन्म जर्मनीची राजधानी बर्लिन येथें ता. २७ जानेवारी सन १८५९ सालीं झाला. हे स्वर्गवासी लोकप्रिय व्हिक्टोरिया महाराणी यांचे सख्खे नातू आणि हल्लींचे सम्राट पंचमजॉर्ज यांचे आतेभाऊ होत. जेव्हां इंग्लंडांत एखाद्या राजकुमाराचा जन्म होतो तेव्हां तेथें कांटरबरीचे मुख्य धर्माध्यक्ष व राज्यांतले अनेक उच्च पदाधिकारी त्या समारंभास तेथें हजर असतात; आणि नंतर त्या राजकुमारासाठीं अनेक लहानथोर सेवक, दुध पाजणाऱ्या व मुलाला खेळविणाऱ्या दाया तसेंच

कित्येक आणखी नोकर चाकर नेमण्यांत येतात. परंतु दुसरे विलियमच्या जन्माचे वेळीं केवळ एक दाई व एक डाक्टर हजर होता. जरी ते राजकुमार होते तरी त्यांचें पालनपोषण, अगदीं सामान्यपणानेंच झालें !

जेव्हां हे दहा वर्षांच्या वयाचे झाले तेव्हां यांना सैन्यांत दुसऱ्या प्रतिच्या एका पदावर नेमण्यांत आलें. सप्टेंबर १८७४ तें १८७७ पावेतों यांनीं कयासल शहरीं लष्करी शिक्षण संपादन केलें. नंतर दोन वर्षेंपर्यंत हे 'बोन' विश्वविद्यालयांत शिक्षण घेत होते. नंतर कांहीं प्रसंगामुळें हे पुनः आपल्या लष्करी खात्यांत येऊन मिळाले. विद्यालयांत शिक्षण घेत असतां साहित्यविषयक शिक्षणसंबंधीं यांची अभिरुची बरीच कमी दिसून येत होती. हे मुख्य राजपुत्र असल्यामुळें तेथील अध्यापक यांच्या मेहेनतीबद्दल कांहींसा संतोषही प्रगट करीत. यांच्या जागीं दुसरा कोणी विद्यार्थी असता तर त्याला त्या थोडक्या अवधींत आपल्या शिक्षणाकडें लक्ष्य देण्यास बरेंच कठीण पडून आपण त्या शिक्षणास सर्वथैव अयोग्य असें वाटून त्याला शाळा सोडणेंच भाग पडलें असतें यांत संशय नाहीं. सन १८८५ सालीं यांना एका पथकाचें सेनापति नेमण्यांत आलें. सन १८८८ सालच्या मार्च महिन्यांत यांचे वडील परलोकवासी झाल्यानंतर हे जर्मनीचे महाराज बनले. हे तेथील मुख्य राज्य जे प्राशिया त्याचे नवे राजे आणि जर्मनीचे तिसरे कैसर झाले.

## कैसरचा परिचय !

लहानपणापासून कैसरचे आयुष्याचा बराचसा भाग सैन्य आणि सैनिकाचा प्रभाव यांत खर्च झाल्यामुळें राजनिती आणि राजकारण यांच्यापेक्षां सैन्यबलाचे कामीं यांची अभिरुची विशेष आहे. यांचे जें काय आहे तें सैन्य व त्यालाच तें आपलें सर्वस्व मानितात. प्राशिया आणि जर्मनींतील सर्व सेना यांची सर्वांहून अधिक आवडती आहे. याशिवाय इंग्लंड, राशिया, स्वीडन, आस्ट्रिया, रुमानिया, टर्की इत्यादि देशांतही त्यांनीं आपलें येथील सैनिकांपैकीं कांहीं कांहीं उच्च व सन्मानसूचक अशा पदव्या, कित्येकांना देऊन ठेवलेल्या आहेत. आपल्या व दुसऱ्या देशांतल्या सर्व सैनिक अधिकाऱ्यांना देण्याकरितां नानाप्रकारचे किताब व बिल्ले आणि वस्त्रे ते आपल्याजवळ नेहमीं तयार ठेवीत असतात. चालू महायुद्धाच्या अगोदर, जेव्हां हे एखाद्या देशांत जात तेव्हां तेथील सैनिकांच्या वेषांत हे त्या सेनेंत जाऊन मिसळत. त्याप्रमाणें सैन्याबरोबर संबंध ठेवणाऱ्या नांवा चालविणें, कुस्त्या लावणें वगैरे दुसऱ्या नानाप्रकारच्या खेळाच्या जितक्या मंडळ्या जर्मनींत आहेत त्या सर्व यांच्यांच नोकर आहेत. या सर्वांच्यासाठीं यांच्यांजवळ वेगवेगळीं वस्त्रें आहेत. कोठेंही गेलें असतां अशीं मूल्यवान वस्त्रें, चिन्हें व रत्नजडित पदकें बरोबर नेण्यासाठीं तयार करण्यांत यांच्या पैशांचा बराच व्यय होत असतो; आणि राजवाड्यांतील कित्येक विस्तीर्ण खोल्या या जिनसांनीं परिपूर्ण भरलेल्या असतात.

ही सैन्यविषयक आवड यांच्या मिळकतीचा व उमेदीचा किती भाग सफा करीत आहे याची कल्पना आपणास करता येणें अशक्य आहे. तथापि लक्ष्यांत ठेवण्यासारखी जर एखादी गोष्ट असेल तर ती ही कीं, सैन्यबलाच्या कामाकडे कैसर आपलें लक्ष्य जितकें देतात तितकें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीकडे देत नाहींत.

कैसर हे गर्विष्ट व अतुल पराक्रमी आहेत. यांचा अहंभाव इतका अतिरेकाला जाऊन पोहोंचलेला आहे कीं, ज्याप्रमाणें एखादा मनुष्य सहजपणें ' माझी टोपी ' ' माझें बूक ' ' माझें घड्याळ ' असें म्हणतों त्याचप्रमाणें हे ' माझी सेना, ' ' माझे किल्ले, ' ' माझा खजिना ' ' माझे सैनिक मंत्री ' ' माझे मुख्य प्रधान ' वगैरे उद्गार, अगदीं विन दिक्कतपणें, गप्पासप्पांत व आपल्या व्याख्या-नांत काढतात. जोंपर्यंत हे जर्मनीचे कैसर आहेत तोंपर्यंत तेथील महाजन तसेंच त्यायाशीं संबंध ठेवणारे सर्व जण आणि सर्व पदार्थ प्रायः यांचेच ताब्यांत आहेत. हें खरे आहे; परंतु प्रत्येक बाबतींत बोलण्याची कांहीं ठराविक पद्धत आहे, त्यांत थोडीशी जरी चूक झाली तरी त्या योगानें फार मोठें अंतर पडतें.

राजधानींत असतांना हे बहुधा प्रातःकाळीं स्नान करून सव्वा नऊ वाजतां राजकीय कामास सुरुवात करीतात. एखादे वेळेस कांहीं जरूरीचें काम असल्यामुळें सकाळीं स्नान करण्यास फावलें नाहीं तर दुपारीं किंवा संध्याकाळीं, भोजन होण्याच्या

किंचित अगोदर अगर मागाहून स्नान करितात. पहिल्यानें गरम पाण्यानें अगर त्यासारख्या क्षारयुक्त थंड पाण्यानें हें आपलें शरीर स्वच्छ करितात. स्नानाचे वेळेस साबणाची एक संबंध वडी उपयोगांत आणिली जाते. तसेंच बरेचसे स्पंज व ब्रश उपयोगांत आणण्यासाठीं स्नानगृहांत ठेवलेले असतात. स्नानाकरितां यांना कित्येक घागरी पाणी लागतें. स्नानानंतर शरीराला किंवा केंसांना लावण्यासाठीं कोणत्याच प्रकारचीं साधी अगर सुवासिक तेलें स्नानगृहांत ठेवण्यांत येत नसतात. लहानपणापासूनच शरीराची मेहनत घेतल्यामुळें त्यांनीं एक प्रकारचा साबणच वापरल्यासारखी यांची शरीरकांति नेहमीं सतेज असते. शिवाय कधीं काळीं कांहीं विवक्षित कारणामुळें कमी अधिक अस्वस्थता उत्पन्न झाल्यानें यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें असाधारण तेज चकमत असतें.

हमेशा आपलें शरीर अगदीं स्वच्छ ठेवण्याची यांना संवय आहे. कोणतीहि गोष्ट झाली तरी आपले हात धुऊन स्वच्छ करण्यास हे तयार असतात. एखाद्या वस्तुला हात लावण्याची त्यांची इच्छा नसतांना तिचा चुकून हाताला स्पर्श झाला तर हे तावडतोब आपले हात धुऊन स्वच्छ करितात. यांचा हा क्रम दिवसा व रात्रीं सारखाच चालू असतो. लहानसहान गोष्टीवरून व थोडक्याच वेळांत सुद्धां आपलें शरीर अगदीं स्वच्छ ठेवण्याचा यांचा हा विलक्षण प्रयत्न पाहून राजवाड्यातले स्त्री पुरुष व नोकर चाकर

यांस कंटाळा येतो; पण त्यानें यांना कोणतीच अडचण वाटत नाहीं. हे आपल्या खटाटोपींतच नेहमीं मग्न असतात !

हे सकाळीं ९। वाजतां सेनासाचिव व १०॥ वाजतां मुख्य प्रधान यांची मुलाखत घेऊन त्यांच्या हकीकती ऐकतात. नंतर १२॥ वाजतां नवीन सैनिकांची मुलाखत घेऊन त्यांना त्यांच्या कामासंबंधीं अवश्यक उपदेश करितात. दुपारीं १॥ वाजतां जेवण-खाण करून शिकारीकरितां निघून जातात. कधीं कधीं सेनासचीव व मुख्य प्रधान यांची मुलाखत न घेतां हे ८ वाजतांच कोणती ना कोणती तरी सेना पहावयास निघून जातात. तेथून येऊन १॥ वाजतां थोडेसें भोजन करून, नंतर साधारतः असल्या निजवावयाच्या खोलींत जाऊन सुमारें दीड तास झोंप घेतात. त्यानंतर मग गरम पाण्यानें स्नान करून समुद्र जलानें आपलें शरीर स्वच्छ करितात. हे संध्याकाळीं ६ वाजतां उपहार करितात रात्रींचें यांचें जेवण राजवाड्यांत होईल किंवा बाहेर कोठें एखाद्या सैन्याच्या तळावर अगर एखाद्या सभ्य गृहस्थांच्या घरीं होईल याचा नेम नसतो. जेव्हां या राजवाड्यांत भोजन करितात तेव्हां कधीं कधीं जेवण झाल्यानंतर कांहीं मंडळीसह हे बिलियर्ड खेळण्याच्या जागीं जातात व तेथें स्वतः एक पाय मेजावर आणि दुसरा खालीं लटकत ठेवून बसतात. हे आल्याबरोबर यांचे स्नेही सोबती नानाप्रकारच्या उचितानुचित गोष्टी, उपहास, सोंगे आणणें, प्रहसन अगर हास्यवि-

नोद सुरू करितात, आणि कैसर तें मोठ्या आवडीनें ऐकत व पहात असतात. या वाग्विलासांत यांचे कृपापात्र असेच सैनिक मिसळतात; आणि ते कैसरना प्रसन्न करण्याकरितां वाटेल तें बोलण्यास व सर्व कांहीं करण्यास तयार असतात. त्यांच्या देशांतल्या अगर परदेशांतल्या स्त्रिया व पुरुष हे यांच्या टीकेला अगर उपहासाला विषय झालेले असतात.

कैसरना आपल्याच तोंडानें आपली प्रशंसा करण्यांत मुळींच संकोच वाटत नाहीं. ' मी असा साहसी आहे ' ' मी असा बुद्धिमान आहे ' ' मी पुरुषार्थी आहे ' वगैरे वाक्यें त्यांच्या तोंडांतून नेहमीं निघत असतात. कधीं कधीं हे म्हणत असतात कीं; ' पहा, अमका सैनिक थोडयाशा परिश्रमानें कसा अगदीं घामाघूम होऊन गेला ! परंतु मी सतत अर्धा तास सक्त मेहनत घेऊन ही अगदीं तजावतवाना असतों. ' ज्या दिवशीं हे एखादें असाधारण काम करितात त्या दिवशीं हे त्या बाबतींत, प्रायः आपल्या सर्व स्नेह्याशीं बोलत असतात. त्यांत त्यांना, यांची उदारत', वीरता आणि यत्नशीलता यांचा पूर्ण परिचय होतो. एकदां फ्रान्सची राजधानी पारिस येथें बाजारांत आग लागली होती त्या आगीमुळें ज्यांचे नुकसान झालें अशांच्या सहाय्यार्थ फंड गोळा करण्यासाठीं तेथें एक मंडळी स्थापन झाली होती. त्या फंडास कैसरनीं सुमारें ६००० रु. मदत म्हणून पाठविले होते. व त्या गोष्टीनें

त्यांचे मन त्या दिवशीं सुप्रसन्न झालें होतें. ते सांगत होतें कीं, ' पहा, या जर्मनीचा शत्रु जो फ्रान्स त्याला इतके रुपये दिले ! कोणी दुसऱ्या आपल्या शत्रूला अशी इतकी मदत करील काय ? अशा प्रकारें लहानसहान बाबतींतसुद्धां हे आपल्या निराळ्याच मौजेंत गढलेले असतात !!

यांची अशी इच्छा असते कीं, त्यांचे येथले सर्व स्त्रीपुरुष किंवा स्वत: त्याचे नोकर, मंत्री व त्यांचे नोकर, न्यायखात्यांतले नौकर, वर्तमानपत्रांचे संपादक अथवा जर्मनीतिले अन्य रहिवाशी यांनीं आमच्या सर्व कामांची प्रशंसाच करावी. हे आपल्या प्रम-जुतीप्रमाणें कोणतेंच अनुचित काम करीत नाहींत; व कदाचित झालेंच तरी तें योग्यच असें सर्वांनीं समजावें अशी यांची इच्छा असते. याप्रमाणें यांनीं एखादें बरें वाईट काम केलें तर त्या कामाची प्रशंसा होणें अवश्यक असतें. त्याप्रमाणें जर प्रशंसा झाली नाहीं तर यांना वाईट वाटतें. या कारणामुळें हे व यांचे मंत्री, जर्मनीतिलि सर्व वर्तमानपत्राकडे डोळ्यांत तेल घालून पहात अस-तात. त्यांत जर त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें विरुद्ध मजकूर दिसला कीं त्या वर्तमानपत्राचा अवतार संपलाच समजावा. साधारणत: तेथील संपादक यांची मिथ्या प्रशंसा करून आपले काम निभावून घेतात; परंतु त्यांत जो प्रतिभाशाली, स्पष्टवक्ता आणि प्रतापी लेखक असतो तो यांच्या या कृत्याला दाद न देतां

मोठ्या चातुर्यानें आपला रोख कायम ठेवून खुबीदार लिहितो. तसें पाहिलें तर यांना आरंभापासून आपली व आपल्या कामांची प्रशंसा आवडत आहे. एकदां यांच्या प्रवासांत फिरण्याचे बाबतींत एका जर्मन वर्तमानपत्रानें यांच्यावर बरीच कडक टीका केली होती. त्यांत म्हटलें होतें कीं, हे "कैसर फक्त प्रवास करण्यांतच आपल्या वेळेचा अपव्यय करितात." त्यावर त्यांनीं आपल्या एका भाषणांत या दोषारोपाला प्रत्युत्तर दिलें होतें. याच वेळेस कोणा 'चापलूस' पत्राचे संपादकानें याच्या प्रवासाच्या बाबतींत प्रशंसापर लेख लिहून यांना शिखरापर्यंत चढाविलें; आणि लिहिलें कीं, "आमचे सम्राट वास्तविक मोठे राजनीति जाणणारे असून केवळ परस्पर स्नेहसंबंध वाढविण्याकरितांच ते प्रवासाचे अत्यंत कष्ट सहन करीत आहेत." अशा घटनेनें त्यांच्या त्या दुर्बलतेवर पांघरूण घालून आपला स्वार्थ साधला व आपल्या 'चापलूस' पत्रांवर कैसरचा विश्वास बसून त्यांचा व्यापार सुरळीत चालूं झाला. तेव्हांपासून खुशामती लोकांची प्रवृत्ति दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चालली.

कैसर आपलीं सर्व कामें राजनीतिपूर्ण व गौरवपूर्ण समजतात. हे आपल्या अनर्थकारक व विनोदी कृत्यांसही वरील कोटींतच सामील करून घेतात. प्रवास करणें, सेनेकडून असंभाव्य कार्यें करविणें, दुसऱ्या कोणाला सहज तयार करतां येणार नाहींत अशा किल्ल्यांची अगर जहाजांची रचना करणें वगैरे शेंकडों साधारण



क्र. नं. १६६

अथवा असाध्य कार्ये, यांच्या मतानें केवळ मनरंजनाची व गौरव-युक्त अशीं आहेत. यांपासून देश अगर जात यांचा कोणत्याच प्रकारचा फायदा होवो वा न होवो, यांच्या मतें ह्या सर्व महत्वाच्याच गोष्टी आहेत ! यांची अशी इच्छा असते कीं; आपली प्रजा देखील त्या तशाच समजून तिनें आपल्या अध्यवसायीपणाची प्रशंसा करावी. हे आपली बुद्धिमत्ता व योग्यता दाखविण्यासाठीं कधीं कधीं लहान मोठीं पुस्तकें लिहितात; चित्रें काढतात व नवीं नवीं नाटकें आणि कविता रचून व त्यांचा प्रसार होण्याचीहि खटपट करितात. चापलूस लोक तीं घेऊन आनंदानें फुलून जाऊन वाऱ्याबरोबर सुद्धां गप्पा मारावयास लागतात. वास्तविकरित्या कैसरच्या ह्या रचना बहुधा सामान्य असतात; परंतु त्या सर्व उत्तम कोटींपैकींच समजल्या जाव्यात अशी यांची इच्छा असते.

ज्यांच्यावर लक्ष्मीची अवकृपा आहे असे लोक आपलें भाग्य सुधारण्यासाठीं यांच्या अनुरोधानेंच बोलतात, चालतात पण अनेक लक्ष्मीपुत्र, यांनाच, आपला कर्ता, हर्ता व संरक्षणकर्ता मानून सर्व प्रकारें यांची मिथ्या प्रशंसा करण्यास तयार असतात. त्यांच्यापैकीं कांहीं तर अपसांत या बाबतींत अगदीं चढाओढ करीत असतात. त्यांना अंगांत घालण्यास कोट पुढें करण्यांत व त्यांचे जोडे काढून ठेवण्यांतसुद्धां कित्येक लक्ष्मीपुत्रांची चढाओढ लागलेली असते. एकदां एका थिएटरांत कैसरनीं तयार केलेल्या नाट-

काचा प्रयोग होत होता. तो पाहण्यास कैसर स्वत: तेथें आले होते. यांच्या जवळच ५० वर्षांच्या उमरीचे एक लक्षाधीश गृहस्थ बसले होते. हे स्वत: प्रतिष्ठित व सज्जन होते. शिवाय यांची बहीण रूमानियाची राणी व पुतणी हालंडची राणी होती. नाटक चालूं असतां जेव्हां एखाद्या चांगल्या प्रसंगाला पाहून प्रेक्षक लोक हर्षित होऊन टाळ्या वाजवीत तेव्हां हे सभ्यगृहस्थ—एका राणीचे बंधु व दुसरीचे चुलते—खुर्चीवरून प्रत्येक वेळेस उठून, कैसरकडे तोंड फिरवून त्यांना नम्रतेनें सलाम करीत. या लक्षाधीशांचा हा क्रम त्या रात्रीं सर्व नाटक संपेपावेतों सारखा चालूं होता ! त्यांचे ते शुभ्र केस व त्यांची ती खटकोघटकीं लवून सलाम करण्याची तऱ्हा पाहून प्रेक्षक लोक मनांतल्या मनांत हंसत. परंतु कैसर तेथें प्रत्यक्ष असल्यामुळें त्यासंबंधीं कोणी हू कीं चूं केलें नाहीं.

कैसरना दुसऱ्याला हंसणें फार आवडतें. गप्पा गोष्टींत गुंग असतांना हे कधीं कधीं तर राजघराण्यांतील स्त्रिया, पुरुष, उच्चपदाधिकारी व सामान्य लोकांवरसुद्धां, कसलाही संकोच न बाळगतां, खुशाल टीका करितात. जेवण्याच्या वेळेस आपल्या पाहुण्याचा उपहास करणें यांना साधारण गोष्ट वाटते. अशा वेळीं यांच्या मनाला जें येईल तें बोलत असतात. यांच्या स्वतांच्या हंसण्यानें इतर लोक ही क्षुल्लक गोष्टीवरूनसुद्धां सारखे हंसत अस-

तात. खरोखरी जेव्हां हे एखादी हास्योत्पादक गोष्ट सांगतात त्यावेळीं हंसणें स्वाभाविक आहे; परंतु केवळ कैसरचा अपमान होऊं नये येवढ्याचकरितां भीतीनें त्यांना कधीं कधीं हंसून आपला आनंद व्यक्त करणें भाग पडतें. ज्यावेळीं हे पूर्ण विनोदीवृत्तींत असतात तेव्हां हे ज्यांच्या विचित्र गोष्टीनें यांना प्रसन्नता वाटते अशा लोकांना आपल्या बैठकींत ते अवश्य बोलावितात. अशा प्रकारच्या रंगेल वृत्तीच्या मनुष्यांपैकीं जो यांच्या मनास पटतो त्याचा लवकरच भाग्योदय होऊन त्याला लवकरच कांहींना कांहीं तरी पदवी मिळते.

कैसर आपल्या भाषणांत कधीं कधीं मोठ्या हास्यास्पद चुका करितात. थोडेसें लक्ष्य देण्यानें त्यांना हा दोष सुधारतां येण्यासारखा आहे; परंतु हे बहुधा त्या गोष्टीची पर्वा करीत नसतात. एकदां तर तेथील कोणी पत्रकारानें गुप्तारीत्या या गोष्टीची चौकशी करून कैसरीन यांच्याकडे एक निनांवी पत्र पाठविलें. त्यांत त्यांना लिहिलें होतें कीं; आपण आपल्या पतिकरितां कांहीं पुस्तकें विकत आणून ठेवावींत म्हणजे तीं वाचून मग व्याख्यान देतील तर त्यांच्या हातून अशा ढोबळ चुका तरी होणार नाहींत; व या चुकांमुळें त्यांना नेहमीं लज्जित होण्याचा प्रसंग तरी येणार नाहीं. अशा प्रकारचे अनेक प्रयत्न झाले तरी हे चुका करण्याचे कांहीं सोडीत नाहीत; व जें वाटेल तें बिनदिक्कत

बोलून टाकतात. सेनाविषयक बाबतींत चुका करणें म्हणजे यांना कांहींच वाटत नाहीं. एकदां यांनीं कैसरीन यांना एका सैन्याचें मुख्य नेमले होते; परंतु त्यांना पदक देतेवेळेस त्यांनीं अविचारानें त्यांना एका छोट्या सैनिकाचेंच पदक अर्पण केलें ! सन १८९० सालीं एकदां यांनीं आस्ट्रियाचे राजांना आपली प्रचंड सेना दाखविण्यासाठीं तिचें नेतृत्व आपणांकडे घेतलें होतें; परंतु हुकूम सोडतांना यांच्या हातून कांहीं चुका झाल्यामुळें सर्व सैन्यांत मोठी गडबड उडून गेली. त्याचा परिणाम असा झाला कीं; यांच्या करड्या अमलाला भिऊन त्या सैन्याच्या मुख्याला आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला !

सैन्यविषयक बाबतींत हे आपली उग्रता पूर्णपणें प्रदर्शित करितात. हे स्वतः प्रथमपासून सैनिक असल्यामुळें बहुधा नेहमीं सैनिकांच्या वेषांतच असतात. हे राजकीय अथवा सामान्य वस्त्रें क्वचितच अंगावर घालितात. ज्याच्या रोमरोमीं सैनिकता भरून राहिली त्याचे सैन्यविषयक कर्तव्याचे हुकूमही तसेच भीतिप्रद असतात. एकदां एका सेनेच्या तुकडीसमोर भाषण करतांना हे म्हणाले— 'रँगरूटानों, तुम्हांला नेहमीं आपल्या देशाच्या शत्रूबरोबर लढलेंच पाहिजे.......कधीं असाही प्रसंग येण्याचा संभव आहे कीं, त्यावेळीं तुम्हांस तुमच आई, बाप, बहीण, भाऊ यांजवर गोळ्या घालण्याचा हुकूम द्यावा लागेल आणि अशा स्थितींत तुम्हांस तो हुकूम अवश्य

पाळावा लागेल.......तुमचें मन तुम्हांला कांहीं जरी सांगत असलें तरी तुह्मी आमचा हुकूम क्षणार्धांत अमलांत आणलाच पाहिजे.'

कैसरना बुद्धिबळें खेळण्याचा विशेष नाद आहे. ह्या खेळांत ते फार निष्णात आहेत. एखादे वेळेस खेळतांना प्रतिपक्षी हरला तर त्याबद्दल यांना फार खेद वाटतो; परंतु त्यानें जर यांना जिंकले तर त्याची हे अवश्य प्रशंसा करितात. नव्या नव्या कोट्या करून दुसऱ्याला चकित करण्यांत यांना फार मौज वाटते. हा विनोद यांना इतका आवडतो कीं, त्याला त्यांनीं सैन्यांतसुद्धां प्रचलित करून टाकलें आहे ! कधीं कधीं स्पष्टवक्त्या स्त्रिया व पुरुष स्वतः या विचित्र कोट्यांचें उत्तर देण्याचें साहस करितात; परंतु हें साहस ज्यांच्या बरोबर कैसर आपला स्नेहभाव समजतात व ज्यांच्या विनोदानें हे प्रसन्न होतात ते लोकच करितात. एकदां एका सैनिकाच्या येथें भोजनास यांना निमंत्रण देण्यांत आलें होतें. भोजनविधी आटोपल्यानंतर बुद्धिबळांचा डाव सुरू झाला. तेथें कैसरनीं घड्याळाच्या लंबकावर रूपक बनवून कोटी रचली. त्यांनीं त्याच्या एका बाजूस 'कैसर' व दुसऱ्या बाजूस 'विलीयम' असें लिहिलें व त्याचा अर्थ सांगण्यास सर्वांस फर्माविलें. त्यावेळीं तेथें ५०-६० सैनिक हजर होते; परंतु कोणीच उत्तर देत नाहीं असें पाहून यांनीं स्वतः त्याचा अर्थ 'महाराज विलीयमचा निर्णय' असें सांगितलें. जर्मन भाषेंत घड्याळाचा लंबक आणि निर्णय

या अर्थाचे शब्द सारख्याच स्वरूपाचे आहेत हें आठवल्यावरून त्यांनीं ही मजेदार कोटी केली होती. त्यांचें तें उपरोक्त उत्तर ऐकून सर्वांना मोठी प्रसन्नता वाटली. फक्त एक गृहस्थ जो यांच्यासमोर बसला होता तो मात्र स्तब्ध होता. त्याची ती स्तब्धता पाहून कैसरनीं त्यास म्हटलें ‘ काय ! माझ्या उत्तरानें तुम्हाला समाधान वाटलें नाहीं ? ’ त्यानें ‘ नाहीं ’ म्हटल्यावर यांनीं त्यास ‘ ठीक. तर मग तुम्हीच याचा खुलासा करा ’ असें सांगितलें. त्यानें पहिल्यानें पुष्कळ कांकूं केलें व म्हटलें ‘ महाराज, क्षमा असावी. आपणच जर याचा अर्थ एकदां सांगून टाकला आहे तर आतां माझें सांगणें कोण ऐकेल ?’ पण कैसरनीं आग्रहच धरिला कीं, ‘ तुम्ही या कोड्याचा अवश्य उलगडा कराच ’ इतका आग्रह पडल्यावर बिचाऱ्याला बोलावेंच लागलें. तो म्हणाला “ याचा अर्थ ‘महाराजांचा निर्णय’ असा तर कांहीं होत नाहीं; पण असा मात्र होईल कीं; महाराजांची स्थिती या लंबकाप्रमाणें “ इकडे जावें, तिकडे जावें; स्थीर रहाणें त्यास न ठावें. ” या समर्पक उत्तरानें तेथील सर्व सैनिकांना राग आला. परंतु कैसरनीं हंसून म्हटलें ‘ जर तुम्ही आमच्या परिभ्रमणशीलतेचा असाच अर्थ करीत असाल तर तुमचें उत्तर खरोखरच ठीक आहे. आपल्या या समर्पक उत्तराचें आम्हांला आजन्म आठवण राहील !

यांना शिकारीचा फार नाद आहे. शिकारीसाठीं एकदां बाहेर पडले म्हणजे दोन दोन दिवस हे बाहेर रहातात आणि त्या अवधींत यांचा १०-१२ हजार रुपयांपर्यंत खर्च होतो. निघण्याच्या अगोदर ठरविलेल्या ठिकाणीं यांच्या सर्व सोयी करण्यांत येतात. राहणें, भोजन, विश्रांति वगैरे बाबतींत आपण राजवाड्यांतच आहों असें यांस वाटावें म्हणून हुबेहुब राजवाड्यांतल्या प्रमाणें सर्व सोयी करण्याची तजवीज करावी लागते. शिकारीस गेल्यावर हे एखाद्या महालकऱ्याकडे किंवा जमीनदाराच्या येथें उतरतात; आणि त्याच्या राखून ठेवलेल्या जंगलांतच बहुधा हे शिकार करितात ! अशा वेळीं यांच्या सैन्याचा सर्व खर्च त्या भल्या माणसाला सोसावा लागतो. यांच्या राजकीय थाटाला साजेसा सर्व बेत करण्यांत त्याच्या हजारों रुपयांचा फडशा उडतो. बरें, यांच्या पुरताच जरी खर्च करावा लागता तर एक असो; पण यांच्या बरोबरचे सर्व अधिकारी, नोकरचाकर यांचीही तरतुद त्यालाच करावी लागते. हें सर्व करितांना त्याचे नाकींनव येतात; पण करतो काय ? इतर ठिकाणीं उतरावयाच्या वेळीं कित्येक जण आगाऊ पुढें जाऊन तेथें कोणकोणत्या गोष्टींची उणीव आहे हें पाहून जरूर ती सर्व पूर्तता करून घेतात. त्याप्रमाणें सर्व पूर्तता झाली म्हणजे कैसरना सूचना पाठविण्यांत येते; नंतर कैसर आपल्या परिवारासह तेथें येऊन उतरतात. एकदां हे अशाच रीतीनें एका जमीनदाराच्या येथें शिकारीसाठीं

जाऊन उतरले. त्यांचें घर रेल्वेस्टेशनपासून ४–५ मैल दूर होतें. इतक्या लांबचा रस्ता, कैसरची गाडी नीट यावी म्हणून, त्याला स्वतःच्या खर्चानें करावा लागला !! प्रवासांत यांना कंजुषपणा व अस्वच्छता दिसून आल्यास यांचें मन अप्रसन्न होतें. यासाठीं हे शिकारीस जाणाऱ्या रस्त्यानें वाटेंतलीं गांवें व घरें अगदीं स्वच्छ करवून घेऊन त्यांना रंगसफेदी देववावी लागते. त्यांना शोभिवंत करविण्यासाठीं लागणारा खर्च त्या गरीब बिचाऱ्या घरवाल्यांना करावा लागतो ! कोणा गरीब घरवाल्याजवळ खर्च करण्यास पैसे नसतील तर तें घर शोभिवंत करण्यासाठीं लागणारा खर्च, कैसर ज्याच्या येथें उतरण्यास जाणार असतील त्या जमीनदारास द्यावा लागतो !! जो भला इनामदार यांच्या ह्या शिकारीच्या नादाची शिकार बनतो—म्हणजे ज्याच्या येथें हे शिकारीसाठीं जाऊन रहाण्याचें ठरवितात—त्या बिचाऱ्यावर ही एक मोठी आपत्तीच येऊन कोसळते. जेव्हां कैसर त्याला शेवटचा रामराम करून जावयास निघतात तेव्हां ते त्याला म्हणत असतात " आम्ही आपल्या आदरसत्कारानें फार खूष झालों आहोंत. आम्ही आपलें घर हें आमचेंच घर समजतो. अशाच रीतीनें वरचेवर साध्या वेषानें येऊन आपला पाहुणचार घेण्याचा योग नेहमीं येवो अशी आमची इच्छा आहे. तसेंच आमच्या या येण्याजाण्यानें आपणाला श्रम न पडावेत व विशेष खर्चही न यावा हीही इच्छा आम्ही बाळ-

गतों. " (!) ही झाली तबियत खूष असल्यावेळची गोष्ट. याच्या उलट ह्मणजे जेव्हां यांच्या मनाप्रमाणें व्यवस्था झालेली नसते तेव्हां हे एखाद्या क्षुल्लक गोष्टीवरूनसुद्धां एकदम रागावतात. कधीं कधीं तर गाडीघोड्याची पर्वा न ठेवितां पायांनींच चालून तडक राजवाड्यांत येऊन आपल्या निजण्याच्या खोलींत निजून रहातात. येवढ्या गोष्टीनें यांचें सर्व ठीक होतें; पण हजारों रुपये खर्च करून यांच्यासाठीं तरतूद करणाऱ्या भल्या गृहस्थास, यांच्या केवळ एका लहरीनें ती सर्व व्यर्थ गेल्याचें पाहून, मनांत काय वाटत असेल हें त्याचें त्यालाच ठाऊक !!

कैसरच्या अंगीं प्रबलता आणि निर्बलता; स्थीरता आणि वैषम्य यांचा विचित्र संयोग झालेला आहे. त्यांच्या अंगीं योग्यता आहे यांत शंका नाहीं; पण एकाग्रचित्त होणें व विचारांना कार्यांत परिणत करणें यांना साधत नाहीं. यामुळें त्यांना आपल्या आयुष्यांत अनेक महत्कार्यें घडवून आणण्याचा योगायोग आला तरी त्यांत हे क्वचितच यशस्वी होत असतात. यांचें जीवनसूत्र व आदर्शवचन हें आहे कीं; "मी आपल्या देशाला व जगाला ज्या स्थितींत पाहत आहे त्याहून उच्च स्थितीला नेऊन पोंहचवीन." परंतु वास्तविक पहातां यांना आपल्या सिद्धांताच्या अनुरोधानें कधींच एखादें काम करवत नाहीं. यांच्यांत अधीरता बऱ्याच अधिक

प्रमाणांत आहे. जेव्हां हे अधीर होतात तेव्हां विवेक यांना अजिबात सोडून जातो; आणि मग अविचारानें यांच्या हातून भलतेंच कांहीं तरी घडून येतें. तसेंच उतावीळपणा हाही एक मोठा दुर्गुण यांच्यांत आहे. उतावळें होण्यानें यांचा समंजसपणा पार नाहींसा होतो व मग यांच्या अनुभविक मंत्र्यांच्या सल्ल्यालासुद्धां हे लाथेनें तुडविण्यास तयार होतात.

साधारणतः यांच्या जें कांहीं मनांत येतें तें हें कसें तरी बऱ्या वाईट रीतीनें करून टाकितात. आपल्या अमक्या विचाराच्या परिस्फुटतेनें जनतेच्या मनावर काय परिणाम होईल व भविष्यतत्काळीं कोणकोणत्या अडचणी उत्पन्न होतील याचा हे आपल्या मनाशीं क्वचितच विचार करतात. आपल्या गौरवावर व राजकीय सामर्थ्यावर विश्वास ठेवून, आपल्याविषयींचें दुसऱ्यांचें दोषविवेचना, पर्यालोचन आणि निंदा यांची हे रतिभरसुद्धां चिंता करीत नाहींत. वाटेल तें होवो; हे आपल्याच तोऱ्यांत राहून स्वतंत्रतेनें वाटेल तें करितात. हे स्वतः आपल्यालाच मूर्तिमंत राज्य समजतात. आपल्याला जें बरें दिसतें तें राज्यांतल्या सर्व प्रजेला बरेंच दिसणार अशी यांच्या मनाची कोती समजूत आहे. आणि याच समजुतीनें आपल्या हुकुमांत कोणीसुद्धां हात घालतां कामा नये अशी यांची इच्छा असते. आम्हीं जें म्हणूं तेच आमचें

कायदे आहेत व सर्व जर्मन जात आमची प्रजा आहे हा यांचा दृढ समज आहे !!

यांच्यांत स्वाभाविक चपलता आहे; आणि बहुधा सर्व गोष्टी व कामें यांचें ज्ञान होण्यासाठीं हे यत्न करीत असतात. तत्वज्ञानी, वेदान्ती, नैयायिक संगीतशास्त्री, वाटिकाविज्ञानवेत्ता; गृहनिर्माण-कुशल आदी मनुष्यांबरोबर अशा प्रकारें गप्पागोष्टी करीत असतात कीं, जणूं काय यांना या सर्व शास्त्रांचे पूर्णज्ञान आहे. या सर्व प्रकारच्या ज्ञानांतल्या आपल्या निपुणतेचें प्रदर्शन करण्याकरितां हे आपल्या गप्पागोष्टींत अगर भाषणांत कधीं कधीं विलक्षण चुटके सोडून देत असतात !

ज्या बाबतींत यांच्या हातून भलत्याच मोठमोठ्या चुका होतात व यांच्या समजुतीनें जगण्या मारण्यापर्यंत ज्याच्या परिणामाचा पल्ला पोहोंचतो अशी ज्ञानाची गोष्ट राजनीति होय; परंतु त्यांतसुद्धां हे फार दुर्लक्ष करितात. शिवाय यांची उतावळी व अधीरता, यांची राहिली साहिली योग्यता पार नाहींशी करून टाकतात. यांच्या मनांत वाटते कीं; माझें म्हणणें सर्वांनीं ऐकावें व माझ्याच साहय्यानें सर्व जग चालावें ! या आढ्यतेनें जेव्हां इतर राजांबरोबर संमेलनांत बसून उपदेशाच्या गोष्टी सांगूं लागतात तेव्हां ते यांच्याकडे लक्ष्य न देतां आपलें काम करून टाकतात.

मग यांना लज्जित होऊन मुकाट्यानें उठून वरीं यावें लागतें. या सर्व चुकांचें मुख्य कारण म्हणजे हे राजनीतिज्ञ नसून केवळ सैनिक आहेत हेंच, वर्तमान युरोपीय महाभारतानें यांचें खरें स्वरूप उघडकीस आलें. तसें पाहिलें तर 'मी शांततेच्या पक्षपाती आहे' असें हे जोरानें सांगत असतात. ह्या गोष्टीचा दुसऱ्याला हे जितका विश्वास पटवून देत तितकाच दुसरे लोक यांचा अविश्वास मानीत होते आणि यांच्या खऱ्या अशा स्थितींतसुद्धां स्वरूपाविषयीं संशय मानीत होते. हे दुसऱ्याला धोक्यांत घालण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्याबरोबर युद्धाच्या पूर्वींसुद्धां जेव्हां जेव्हां हे वरकांती शांतीचे देवदूत बनत त्या त्या वेळीं यांचा हात तरवारीवरच रहात असे ! !

यांना आपल्या आयुष्यांत फार कमी सुख मिळतें. बहुतांशी हे काळजींतच असतात. यामुळें यांच्या तोंडावर नेहमीं उदासीनतेची छाया पसरलेली दिसत असते व कपाळावर चिंतेच्या रेषा दिसून येतात. यांना पहाताच मनुष्याच्या मनांत एकाएकीं असें येतें कीं, संसारसुखापेक्षां अधिकतर दुःखच यांना मिळालें असावें; यशापेक्षां विशेषतर अपेशच यांना घेरीत आहे आणि आशेपेक्षां प्रबलतर निराशाच यांच्या आयुष्याच्या मुख्यांश आहे. इतकें असून हीं एक प्रकारचें अद्भुत तेज यांच्या नेत्रांत भरलेलें आहे. साधारणतः हे

आपल्या तीव्र दृष्टीतापानें दुसरें लोकांस कांहींसे भयभीत ही करितात. आपल्या या विशेष गुणानें त्यांनीं कित्येक वेळां जर्मनीच्या शत्रूंनाही वश करून घेतलेलें आहे. यांना पहातांच नेत्रांतल्या अद्भुत तेजाच्या प्रभावानें त्यांच्या मनस्थितीचें परिवर्तन होत असे !

ज्या गोष्टींत यांना स्वतःला विशेष आनंद वाटतो त्यांना ते फार महत्वाच्या समजतात. न्यायसभेंत जो यांच्या मनाप्रमाणें अनुकूलतेनें चालतो तोच यांचा मित्र. आपल्या विरुद्ध असलेल्यांची हे अतिशय निंदा करितात व त्याजवर आपली छाप कशी बसवावी याविषयीं हे मनांतल्या मनांत योजीत असतात. बल, विद्या, विज्ञान व शिल्प इत्यादि गोष्टींत जर्मनी सर्वांच्या पुढें असावा अशी यांची नेहमीं इच्छा असते. यासाठीं हे आपल्या विचित्र विश्वासाच्या भरंवशावर नेहमीं यत्न करण्यांत चूर असतात. परंतु जेव्हां कधीं यांच्यांत व जर्मन लोकांत एखाद्या गोष्टींत मतभेद उत्पन्न होतो तेव्हां त्या गोष्टीस भलतेंच स्वरूप येऊन यांची सर्व खटपट व्यर्थ जाते !!

पदार्थ विज्ञान शास्त्राचा जर्मनींत अतिशय प्रसार झाल्यामुळें धार्मिकता नष्ट होत चालली आहे; हा विचार मनांत येऊन हे कधीं कधीं धर्मोपदेशांच्या उन्नति प्रीत्यर्थ झटण्यास तयार होतात. ईश्व-

राचा आपणावर कोप होईल अशी यांना भीति वाटतें (!) यामुळें हे कधीं कधीं स्वतः फार पवित्र व धार्मिक बनण्याचा आव घालितात पण मधुनच आपल्या एखाद्या उद्दामपणाच्या कृत्यानें सर्वांना आश्चर्यचकित करून सोडितात. केवळ या एकाच गोष्टींत नाहीं तर दुसऱ्या अनेक गोष्टींत हे आपलाच हेका धरून बसतात व त्यांत चूक झाल्याचें दिसून आलें तरीसुद्धां यांना त्यांबद्दल पश्चात्ताप वाटत नाहीं.

## २ कैसरचें स्वास्थ आणि त्यांची रोगभीति.

कैसरचा जन्म झाला त्यावेळीं तें अशक्त होते. शरीर अगदीं रोड व वर्ण पिंगट होता. जन्म झाल्यावर बराच वेळपावेतों हे निपचित पडलें होते; त्यामुळें ह्यांच्या जीवंतपणाबद्दल त्या दाईला शंकासुद्धां वाटली, परंतु तिनें जेव्हां यांना हालवून थोपटलें तेव्हां हे रडावयास लागले. तेथील रिवाजाप्रमाणें यांच्या जन्माच्या वेळेस प्रत्येकीं दहा दहा तोफांच्या १०१ फैरी झडल्या; त्यापैकीं ६० व्या फैरीच्या वेळेस हे रडावयास लागले! नंतर हे जीवंत असल्याबद्दल तेथें हजर असलेल्या लोकांची खात्री होऊन ते आपापल्या घरीं निघून गेले!!

जन्मल्याच्या तिसरेच दिवशीं असें आढळून आलें कीं; यांना आपला डावा हात हालवितां येत नाहीं. यांच्यासारख्या अशक्त मुलाच्या बाबतींत असला दोष विशेष काळजी उत्पन्न करणारा होता. शोधांतीं असें आढळून आलें कीं; डाव्या हाताचें हाड निखळलें गेलें आहे. प्रयत्नाअंतीं या स्थितींत कांहीं सुधारणा झाली; परंतु यांच्या उजव्या हाताप्रमाणें डाव्या हातानें काम होत नाहीं. या दोषाच्या वास्तविक कारणांसंबंधीं मतभेद होता. त्यावेळेस तेथें हजर असलेल्या डॉक्टरांपैकीं कांहींचें मत हाडांचा सांधा निखळल्यामुळें हें झालें असें होतें तर दुसरे कित्येक म्हणत होते कीं, जन्म-

तःच यांचें सर्व डावें अंग निर्बल व दूषित आहे. असें सांगतात कीं; यांचा डावा हात उजव्या हातापेक्षां ६ इंच आंखूड आहे. जेव्हां हे घोड्यावर बसतात त्यावेळेस हे आपला डावा हात कमरेवर ठेवितात. अथवा दुसरी एखादी वस्तु त्यांत धरून ठेवितात. तसें न करितां तो हात तसाच लोंबकळत ठेविला तर यांना फार त्रास होतो. कधीं कधीं हे आपला डावा हात आपल्या छातीवर ठेवितात. हे त्या हातानें घोड्याचा लगाम धरितात पण घोड्याला उजवीडावीकडे वळविण्याच्या वेळेस यांना उजव्या हातानें लगाम धरावा लागतो. या हातानें त्यांना वजनदार वस्तु उचलवत नाहीं. पोषाक करतेवेळेस, डाव्या पायाच्या निर्बलपणामुळें हे फार सावधगिरीनें उभे राहतात. थोड्याशा देखील गैरसावधपणानें हे तावडतोब जमिनीवर पडतात. पायजमा घालण्याच्या वेळेस यांना जमिनीवर सपशेल निजावें लागतें. कधीं कधीं हे मोठ्या कष्टानें आपल्या डाव्या अंगावर भार देऊन उभे राहतात; पण अशा वेळीं हे कधीं अचानकपणें खालीं पडतील याचा नेम नसल्यामुळें, नोकर लोक फार दक्षता ठेवीत असतात. सैनिकाच्या वेषांत अनेक प्रकारचे पायजमे, पाटलून्स, विजारी, ब्रिचेस वगैरे घालावयाचा प्रसंग येतो तेव्हां मोठें कठीण काम असतें. सैन्याची देखरेख करतांना हे एखाद्या वेळेस रागावले तर त्यावेळेस डाव्या अंगाकडे यत्किंचित् दुर्लक्ष्य होतांच हे शिथील होऊन कांपावयास लागून,

कधीं जमिनीवर लोळण घेतील याचा नेम नसतो. कांहीं शारीरिक व्याधी किंवा फोड उत्पन्न झाले तर ते बहुधा यांच्या डाव्या अंगावरच उठतात. या सर्व गोष्टींवरून यांचा हा दोष जन्माच्या वेळच्या कांहीं चुकीनें उत्पन्न झालेला नसून तो प्रकृतिविषयक आहे हें उघड दिसतें.

वर सांगितलेल्या दोषाशिवाय कैसरला मूर्च्छारोगही आहे. हा जरी विशेष नाहीं तरी बराच चिंताजनक आहे. हा रोग कधीं कधीं यांना पछाडतो व हे त्यावेळेस बेशुद्ध होतात. या रोगामुळे हे दोन वेळां खुर्चीवरून खालीं पडले व यांच्या त्या पडण्यानें त्यांना इजाही झाली होती. प्रथम प्रथम कोणालाच यांच्या रोगाची फारशी माहिती नव्हती पण हळुहळु सर्वांना माहिती झाल्यामुळें, एखाद्या वेळेस भलताच प्रसंग न यावा म्हणून यांचे संरक्षक विशेष सावधगिरी बाळगितात. एकदां हे पोषाक करीत असतांना यांना मूर्च्छा आली व खुर्चीवरून खालीं पडून बेशुद्ध झाले. तें पाहून सर्व नोकर लोक घाबरून गेले व यांचा प्राण निघून गेला कीं काय या संशययुक्त भीतिनें राजवाड्यांत मोठा हाहाःकार उडाला. कैसरीन व डॉक्टर तेथें धांवतच आले. योग्य उपचार झाल्यानंतर बऱ्याच वेळानें हे शुद्धींत आले, तेव्हां सर्वांच्या जीवांत जीव आला !

अशी स्थिती होण्याचें कारण पाहूं गेलें असतां, कैसरच्या अंगीं कांहीं तरी मानसिक दुर्बलता असली पाहिजे असें स्वाभाविक

वाटतें. या मानसिक दुर्बलतेचा असा एक परिणाम यांच्यावर झाला आहे कीं; मला कांहीं तरी एखादा रोग अवश्य जडेल अशी भीति यांना नेहमीं वाटते. ज्या मनुष्याला आजन्म स्वास्थ नाहीं तो वास्तविकपणें सदोदित शारीरिक व्याधीनें पिडीतच असावयाचा. स्वस्थ मानस असलेल्या मनुष्याला या प्रकारची कोणतीच भीति वाटत नसते. त्याची खात्री असतें कीं, माझें धष्टपुष्ट शरीर कोणत्याच प्रकारच्या रोगजंतुंना आंत शिरकाव करून घर करून बसण्यास वाव मिळूं देणार नाहीं. कैसरनीं या भीतिनें आपला राजवाडा, वस्तीपासून दूर अंतरावर गांवांतली घाणेरडी हवा व रोगजंतु जेथें न येतील अशा ठिकाणीं, अगदीं अलग बांधला आहे. त्यांतली प्रत्येक खोली, प्रत्येक दरवाजा व खिडक्या इतक्या बंदोबस्तानें बांधल्या आहेत कीं; त्यांत बाहेरची कसलीच घाणेरडी हवा अगर कोणत्याही प्रकारचे रोगोत्पादक जंतु त्यांत येणें मुळींच शक्य नाहीं. या रीतीनें रोगभयापासून दूर राहण्याचा हे अहर्निश प्रयत्न करितात. रोगविषयक गप्पागोष्टीनेंसुद्धां रोग जडेल कीं काय अशीं यांना भीति वाटत असते.

कसरना सर्वच रोगाची भीति वाटते पण त्यांतले त्यांत गळ्याच्या रोगाची यांना विशेष भीति वाटते. त्या रोगाच्या मनुष्यास पहातांच, भूत दृष्टीस पडल्याप्रमाणें घाबरून जाऊन, हे तेथून

झटकन नाहींसे होतात. या रोगाच्या नुसत्या गोष्टीनेंसुद्धां हे बावरून जाऊन देहभान विसरून जातात. हे आरंभीं ज्या राजवाड्यांत रहात होते त्यांच्या शेजारींच एका महालकऱ्याचें घर होतें. हा महालकरी या गळ्याच्या रोगानें मयत झाला. ही बातमी ह्यांना कळतांच यांनीं घाबरून जाऊन तावडतोब हुकूम दिला कीं, 'मी याच वेळेस येथून निघून जात आहे माझें सर्व सामान तावडतोब बर्लिनला पाठवून द्या.' त्यावेळेस बर्लिनचा राजवाडा बांधण्याचें काम चालू होतें; व त्यांत रहाण्याची सोय पण नव्हती. तथापि हे म्हणाले कीं; 'मला त्याची मुळींच पर्वा नाहीं. त्यांत एखादी अर्धी तरी खोली तयार असेल. अथवा जशी असेल तशाच खोलींत मी दिवस काढीन. बस्स, माझा हुकूम आहे कीं; सर्व सामान तावडतोब तिकडे रवाना झालेंच पाहिजे; आणि मी पण निघालोंच !' राजाज्ञा कोण मोडील ? त्याच दिवशीं सर्व सामान तेथें जाऊन पोंहचलें. त्या दिवसापासून त्या अर्धवट तयार झालेल्या राजवाड्याचें भाग्य उदयास आलें व कैसरनीं आपल्या रहाण्यानें त्यास पावन करून टाकलें ! कैसरचे बरेच निकटसंबंधीं व स्वतः त्यांचे वडील याच—गळ्याच्या—रोगानें मरण पावले असल्यामुळें त्यांना त्या रोगाची अतिशय भीति वाटते.

एकदां जनानखान्यांतल्या एका दासीचा गळा एका प्रकारच्या रोगानें सुजला होता. त्या वेळीं महाराज विलियम कांहीं

जरूरीच्या कामासाठीं कोठे बाहेरगांवीं गेले होते; तेथेंच त्यांना ही बातमी लागली. ही दासी जनानखान्यापासून अगदीं निराळी रहात होती तरी पण यांना असा संशय आला कीं; कैसरीन त्या दासीला अवश्य भेटावयास गेल्या असल्या पाहिजेत आणि त्या दासीचा व त्यांचा कांहीं तरी स्पर्श झाला असला पाहिजे. येवढयावरूनच हे त्या दिवशीं बाहेर राहिले व राजवाड्यांत जाण्याची टाळाटाळ करूं लागले! त्या दिवशीं हे कैसरीनबाईच्या जवळसुद्धां गेले नाहींत. यांना भीति वाटूं लागली कीं; त्यांना त्या दासीचा संसर्ग झाला असेल व त्या स्पर्शजन्य रोगाचा आपणांसही उपद्रव होईल! इकडे कैसरीनबाई मोठ्या काळजींत पडल्या. जेव्हां एका मुख्य दासीनें गुप्त रीतीनें यांजकडे जाऊन यांची खात्री करून दिली कीं; कैसरीनबाई त्या दासीकडे मुळींच गेल्या देखील नाहींत तर तिचा स्पर्श कसा होणार? नंतर बऱ्याच वेळानें हे राजवाड्यांत येऊन कैसरीनबाईंना भेटले!

कोणी मंत्री, पदाधिकारी अगर नोकरचाकर यांच्या घरचें कोणी मनुष्य आजारी आहे अशी बातमी यांना लागली पुरे कीं, कामकाजासंबंधी कितीहि अडचण येवो, केवढेंही नुकसान होवो, हे त्यांना समोर येऊं देत नाहींत. कधीं कधीं यांच्या या करण्यानें राज-

कीय कामकाजाची भलतीच नुकसान होते; पण हे त्या गोष्टीची मुळींच पर्वा करीत नाहींत. राजवाड्याशीं व महाराणीशीं ज्यांचा संबंध आहे अशा सर्व नोकरांना असा सक्त हुकूम देण्यांत आलेला आहे कीं; त्यांच्या घरीं कोणी मनुष्य आजारी झाल्यास त्याची ताबडतोब बातमी देण्यांत येऊन रजा द्यावी. यांत कोणी कसूर केल्यास त्याला देहान्त शासन केलें जाईल ! ह्या विचित्र हुकुमाचा गैरफायदा नोकर लोक कधीं कधीं घेतात. ज्याला खासगी कामाकरितां रजा पाहिजे असेल तो खुशाल, आपल्या घरीं अमुक मनुष्यें अमुक रोगानें आजारी आहे अशाबद्दलचें खोटेंच, डॉक्टरचें सर्टिफिकिट हजर करून रजा मागतो; व तेवढयावरून त्याला रजा मिळून त्या मुदतींत तो आनंदानें घरीं खासगी कामें करून घेतो.

एकदां कैसरीनबाईच्या कृपेंतल्या एका दासीच्या गळ्याची शीर कशानेंशी सुजली होती. तिनें डॉक्टरच्या सल्ल्यानें ती कापून टाकली होती. इकडे कैसरना ती गोष्ट कळतांच त्यांना गळ्याच्या रोगाच्या भीतीनें पछाडलें. त्यांनीं कैसरीनबाईच्या सोयीगैरसोयीकडे मुळींच लक्ष्य न देतां, तिला राजवाड्यांतून ताबडतोब बाहेर घालवून देण्याचा हुकूम फर्माविला ! हा हुकूम रात्रीं ११ वाजतां सुटला. त्यावेळीं ती बिचारी दासी गाढ झोपेंत होती; तथापि तिला ताबडतोब जागें करण्यांत येऊन वीस मिनिटांच्या आंत तिची गाडी सर्व सामनासह इस्पितळाकडे निघाली. यावेळीं त्या

दासीचें दैव ही तिला प्रतिकूलच होतें. इस्पितळांतल्या जमादारानें सांगितलें कीं; येथील सर्व जागा भरून गेल्या आहेत; त्या बाईची सोय होणें शक्य नाहीं. नंतर त्याला बाई स्वतः कैसरीनबांईची मुख्य दासी आहे; असें कळल्यावर त्यानें मोठ्या कष्टानें तिच्यासाठीं एक अडगळीची कोठडी साफसूफ करून दिली; आणि त्या अभागी स्त्रीनें ती रात्र त्या खोलीस तळमळत काढली ! !

कधीं कधीं उत्सव, नाच अगर भोजन समारंभाच्या वेळीं कैसरना या रोगभयाच्या संशयापिशाच्चापासून फार त्रास होतो. दुसऱ्या बरोबर गप्पागोष्टी करीत असतांना, त्याच्या घरचें कोणी मनुष्य आजारी आहे असें कळतांच हे लागलीच नाखूष होतात ! एकदां एका उत्सव प्रसंगीं हे एका ओळखीच्या स्त्रीबरोबर बोलत बसले होते. तिच्या बोलण्यांत सहजगत्या तिच्या मुलाच्या आजारीपणाबद्दल गोष्ट निघाली. त्यासरशीं यांची मर्जी खपा होऊन तिला यांनीं खडकावलें कीं; ‘ अशी स्थिति होती तर तुम्हीं माझ्या येथें आलांत कशाला ? ’ बिचारीच्या डोळ्यांतून घळकन अश्रु गळलें व ती निमुटपणें आपल्या घरीं परत गेली ! !

कसलें विलक्षण रोग भय ! आणि केवढीही देहावरची अनावर आस्था ! ! !

## ३ कैसरचा विलक्षणपणा.

एकदां कैसरचे कांहीं निकटसंबंधीं मंडळींनीं इंग्लंडला जाण्याचा बेत केला. हें ऐकून यांच्या पोटांत मोठी खळबळ उडून गेली. ते म्हणाले; 'अरे हे खरोखरच आपल्या बायकांमुलांसह इंग्लंडला जात आहेत काय? या प्रवासांत प्रत्येकाला कमींत कमी ७॥ रु. रोजीं खर्च येईल ना!' याच्या दुसऱ्याच दिवशीं यांनीं आपल्या राजवाड्यांत कांहीं सुधारणा करण्याविषयीं सूचना काढली व त्यासंबंधीं नकाशा स्वतः करून दिला. तो पाहून यांच्या मंत्र्यांपैकीं एकानें ह्मटलें 'महाराज! या सुधारणांप्रीत्यर्थ कोटी रुपयांहून अधिक खर्च होईल' तें ऐकून कैसर म्हणाले 'ओहो! या गोष्टीची आह्मांला मुळींच पर्वा नाहीं. खजिन्यांत रुपये शिल्लक नसतील तर सरकार कर्ज काढील; परंतु माझ्या नकाशाबरहुकूम सर्व सुधारणा अवश्य झाल्याच पाहिजेत!' धन्य कैसर महाराज! एकीकडे ७॥ रु. रोजीं खर्च करण्यासाठीं विलक्षण कासाविशी तर दुसऱ्या बाजूस क्रोडो रुपये नाश करण्यास एका पायावर तयारी!!

२

ज्याप्रमाणें आपल्या इकडे होळी अगर दिपवाळीच्या सणाच्या वेळेस नौकर लोकांना कांहीं तरी इनाम द्यावयाची चाल

आहे; त्याप्रमाणें इंग्रज लोकांतही मोठ्या सणाच्या दिवशीं नोकर लोकांना मालकाकडून कांहीं तरी पारितोषिक मिळण्याची आशा असते. युरोपांत बहुधा सर्व ठिकाणीं ही चाल आहे. या बाबतींत राजेरजवाडे व संस्थानिक यांचे बाबतींत तर लिहिणें व्यर्थच आहे; परंतु एकदां एका मोठ्या सणाच्या वेळेस कैसरनीं आपल्या खजानजीस बोलावून हुकूम दिला कीं; 'हें पहा, जेवढे माझे खास नोकर आहेत तेवढ्यांनाच फक्त प्रत्येकीं सात रुपये द्यावयाचे, इतरांना कोणालाही कांहीं द्यावयाचें नाहीं. नाही तर राजवाड्यांतल्या हजारों नोकरांना बक्षिसें वाटतां वाटतां नाकींनव यावयाचे.' हे आपल्या समजुतीप्रमाणें बरोबर वागले पण नोकर लोक कसले बस्ताद! त्यांनीं तंटाभांडण करून मुख्य नोकरांपैकीं ३५ रुपये व बाकी सरसकट सर्वांनीं ७–७ रुपये इनाम घेतले! निरुपाय होऊन कैसरनाही पण त्यांचा हट्ट पुरविणें भाग पडलें! अशा रीतीनें यांची चतुराई व्यर्थ गेली!!

२

बहुधा सणाच्या दिवशीं पायदळ सैन्याची पहाणी करण्यास निघतांना कैसर, अनाथ दुबळ्यांना वाटण्यासाठीं आपले खिसे अशरफियांनीं ( एक प्रकारचें नाणें ) भरून घेऊन बाहेर पडतात. पण एका सणाच्या दिवशीं त्यांनीं आपल्या खजानजीला हुकूम

केला कीं; 'आजपासून माझ्या खिशांत फक्त रुपयेच भरून देत जा.' आणि कैसरीनबाईकडे वळून म्हणाले 'पहा मी आतांपर्यंत अशरफियां घेऊन जात होतों; परंतु मी दिलेल्या अशरफियां भिकाऱ्यांजवळ पाहून त्यांच्यावर शिक्क्याचें नाणें चोरल्याचा कोणी आरोप करूं नये म्हणून मी आजपासून अशराफिया ऐवजीं रुपयेच वांटण्याचें ठरविलें आहे.

अशरफियांचे रुपयेच झाले असते तर हरकत नव्हती, पण निघण्याच्या वेळेस कैसर रुपयांच्या ऐवजीं चार आण्यांच्या किंमतीचें नाणेंच बरोबर घेऊन गेले. कारण काय तर जे काय रुपये न्यावयाचे होते ते सर्व त्याच सालीं नवीन पाडलेले होते; व ते खूप चमकत होते. या येवढ्या सबबीवर त्या रुपयांना खजिन्यांतच रहावें लागलें !!

४

एकदां कैसरच्या सासूनें मुख्य प्रधान मि. होहेनलोह्य यांच्यापासून खाजगी खर्चाकरितां कांहीं रुपये उसने घेतले. ही गोष्ट कैसरच्या कानीं जातांच त्यांना फार राग आला. कारण त्यायोगें यांची चोहोंकडे बदनामी झाली. यांनीं त्यावेळेस बोलून दाखविलें कीं; मी ह्या अपकीर्तीचा कलंक शक्य तितक्या लवकर धुवून काढण्याचा प्रयत्न करीन. मी आपल्या खाजगींतून मि. होहेनलोह्य

यांस रक्कम देऊन टाकीन.' नंतर कैसरनीं राजकीय खजिन्यापैकीं घायाळ सैनिक आणि सैनिकांच्या विधवा व मुलें यांना मदत करण्याच्या फंडांतून सदरहु मुख्य प्रधानास नव्वद हजार रुपये देण्याचा हुकूम फर्माविला ! या औदार्याच्या बाबतींत कांहीं समीष्टवाद्यांनीं मोठा गोंधळ माजविला; पण कोण कोणाचें ऐकतो ! कांहीं काळ लोटल्यावर हें उठलेलें वादळ शांत झालें; व अशा रीतीनें सासूच्या योगानें झालेल्या अपकीर्तीचा कलंक धुऊन टाकण्यास हे समर्थ झाले !

५

कैसरचा स्वभाव सर्वस्वीं सैनिक बनला आहे; यामुळें हे स्वभावतःच आपल्या सैनिकांवर नेहमीं कृपा करीत असतात. पण हे ज्या गोष्टीला कृपा समजतात ती गोष्ट त्या बिचाऱ्यांना आपत्ति भासते ! जेव्हां कधीं हे संतुष्ट होऊन एखाद्या सैन्याच्या तुकडींत आपल्या भोजनास येण्याचा लाभ देतात तेव्हां यांचा भोजनाचा असाधारण खर्च त्या बिचाऱ्या सैनिकांच्या पगारांतून कापून घेऊन पुरा केला जातो. कैसरची समजूत अशी असते कीं; आपल्या जेवणास खर्च साधारणपणें ७-८ रुपये खर्च होत असेल व त्या समजुतीप्रमाणें ते मोठ्या औदार्यानें ते ७-८ रुपये आगाऊ पाठवून देतात. एक पैसुद्धां अधिक पाठवीत नाहींत. पण वास्तविक

खर्च हजारों रुपये होत असतो याची कोणाला दाद आहे ? कैसर जेवावयास यावयाचे असले म्हणजे त्यांच्या इतमामाप्रमाणें त्यांचा योग्य सत्कार करण्यासाठीं त्या बिचाऱ्या सैनिकांना किती तरी अधिक सोयी करावयाच्या असतात. चांगल्या चांगल्या उत्तम प्रकारच्या फुलांचे हार; आणि पुष्पगुच्छ, दिवे, हंड्याझुंबरे वगैरे सर्व प्रकारचे शोभेचे पदार्थ; आणि उत्तम उत्तम भोजनपदार्थ अशा एक ना दोन हजारों गोष्टी मुद्दाम तयार ठेवावयाच्या असतात. शिवाय कैसरचा असा एक हुकूम असतो कीं; भोजनाच्या वेळीं प्रत्येक सैनिकानें विवक्षित प्रकारच्या पोशाकांत हजर राहिलें पाहिजे. तेव्हां पोशाकासाठीं त्यांना बराच खर्च येतो. या उंची पोशाकासाठीं त्या बिचाऱ्यांचा राहिला साहिला पगारही पार खलास होऊन जातो व त्यामुळें कधीं कधीं त्यांना आपला खाजगी खर्च चालविण्यास मोठा त्रास पडतो. अशा प्रकारच्या आपत्तींत सांपडलेल्या एका सैनिकाची आई आपलें दुःख खालीलप्रमाणें एकाजवळ सांगत होती:—

“ माझ्या मुलाचा पगार अवघा शंभर रुपये. त्यांपैकीं सुमारें ७० रुपये कपडे, भाडें व खाण्यापिण्याबद्दल व सरकारी दाणावैरणीबद्दल कापण्यांत येतात. बाकी राहिलेल्या ३० रुपयांत त्याला आपला किरकोळ खर्च चालवावयाचा असतो. म्हणून मी त्यास सुमारें १५ रु. दरमहा आणखी पाठवीत असे. अशा रीतीनें मिळालेल्या ४५ रुपयांत तो आपला किरकोळ खर्च कसा तरी

चालवीत होता; परंतु जेव्हांपासून कैसर महाराज आपल्या पंक्तिचा लाभ देऊं लागले तेव्हांपासून तो मोठ्या संकटांत आला आहे. गेल्या महिन्यांत या खर्चाकरितां म्हणून आणखी पंधरा रुपये त्याच्या पगारांतून कापले गेले! पण पुनः महाराजांनीं आपला पंक्तिलाभ दिल्यामुळें माझ्या मुलाचे आणखी १५ रुपये कापले गेले व त्यामुळें तो मोठ्या अडचणींत येऊन पडला आहे. त्याला किरकोळ खर्चा-साठीं उसनवारी करणें भाग पडलें. हे उसनवार रुपये व त्यांचे व्याज हीं वेळेवर त्याला परत देतां न आल्याकारणानें वर्तमान-पत्रांतून त्याजवर टीका व्हावयास लागली. हाय! हाय!! मी आतां काय करावें? माझ्या मुलाचा सत्यानाश व्हावयाची वेळ आली आहे! एका बाजूनें कैसरचा भोजनखर्च त्याला मारीत आहे, तर दुसऱ्या बाजूनें तो कैसरबरोबर उठूं बसूं लागल्यानें उधळ्या बनत चालला आहे!!"

ही दुःखी स्त्री आपली ही दुर्दशेची कहाणी कैसरीनबाई-जवळ सांगून कांहीं तरी सोय करावयास इच्छित होती; पण तिचा तेथवर प्रवेश न झाल्यामुळें तिला मुकाट्यानें परतावें लागलें!!

६

कैसर बर्लिनमध्यें असतांना त्यांना भेटण्यासाठीं राजवाड्यांत जाण्याची परवानगी नाहीं. त्या राजवाड्यांतल्या ज्या ५७-५८

खोल्या यांच्या खास स्वतःच्या उपयोगासाठीं आहेत, त्यांत तर त्यांच्या समक्ष अगर पश्चात कोणालाही जातां येत नाहीं. त्याशिवाय बाकीच्या खोल्यांत मात्र कैसरच्या समक्ष, ओळखीचे मनुष्यास जाण्याची परवानगी मिळते.

एकदां अमेरिकेचे एक प्रख्यात लक्षाधीश मि. वैंडरबिल्ट यांची गाडी राजवाड्याच्या बाहेरच्या कांपाउंडांत येतांच तेथील पहारेकऱ्यानें त्या गाडीवानाजवळ नेहमींप्रमाणें पास मागितला. तसा पास त्याजवळ नसल्यामुळें त्या पहारेवाल्यानें गाडी तेथेंच अटकवून ठेविली. नंतर त्या गृहस्थाबरोबरच्या स्वतः कैसरच्या स्नेह्यांनीं त्या पहारेकऱ्यास पुष्कळ समजावून सांगितलें कीं; मि. वैंडरबिल्ट यांची व महाराजांची दाट ओळख आहे; परंतु त्यानें त्यांचें कांहीं न ऐकतां एकदम सांगितलें कीं, ' यावेळीं तुम्ही आपली गाडी ताबडतोब परत फिरवावी यांतच तुमचें कल्याण आहे नाहींपेक्षां आपणां सर्वांस गोळ्या घालणें मला भाग पडेल ! '

निरुपाय होऊन ते अमेरिकन गृहस्थ परत फिरले. पहारेकऱ्याच्या अशा उर्मटपणाला वर्तणुकीचा बहुधा सर्वांना तिरस्कार वाटणें साहजिकच आहे; परंतु कैसरच स्वतः जर अशा उर्मटपणाला उत्तेजन देतात तर ते लोक जें करतील तें थोडेंच आहे ! येवढ्या तेवढ्या वरून सुद्धां एखाद्यावर गोळी घालण्यास तयार होणाऱ्या

पहारेकऱ्यास अशी आशा असतें कीं, माझी दक्षता पाहून कैसर स्वतः मशीं हस्तांदोलन करून दोन गोष्टी बोलतील. मला शाबासकी देतील; आणि या आशेनें तें सैनिक व पहारेवाले अगदीं बेफामपणानें वागतात. एखाद्या सभ्य गृहस्थाचा योग्य सत्कार करण्याचें तें पार विसरून जातात.

७

एकदां एका वर्तमानपत्रांत असें प्रसिद्ध झालें होतें कीं; कैसरचा मुख्य एक नोकर ज्या एका सुंदर तरुण मुलीशीं लग्न लावण्याच्या विचारांत आहे; ती जरी धनवान आहे तरी तिची आई ही फ्रान्समधील एका शिंप्याच्या कुळांतली आहे. कैसरीनबाईनीं हें वाचताच आपल्या मुख्य परिचारिकेस तें वर्तमानपत्र कैसरच्या वाचनाच्या टेबलावर नेऊन ठेवण्यास सांगितलें. ती बाई ह्मणाली ' महाराज, ही बातमी वाचून त्या अयोग्य संबंधाला आतांच हरकत घेतील. कारण ती मुलगी एका नीच कुलोत्पन्न आईची मुलगी असून तिच्याशीं महाराजांच्या खास नोकरानें लग्न लागल्यास त्याची मानहानी होऊन त्याला पुढें मागें मिळणारी एखादी पदवी देतां यावयाची नाहीं. तेव्हां अशा अनुचित विवाहाला मोडता घातलाच पाहिजे. ' तें वर्तमानपत्र पाहून कैसरनीं ताबडतोब त्या मुख्य सेवकास हाक मारून म्हटलें:—

‘ तूं त्या सुंदर मुलीबरोबर लग्न कां करीत नाहींस ? ती धनवान आहे व तिच्या धनाचा तूं सदुपयोग करशील याची मला खात्री आहे. ’

‘ क्षमा करा महाराज. ’ तो सेवक म्हणाला, ‘ हा संबंध जडणें शक्य नाहीं. ’

‘ कां ? मी स्वतः हुकूम करीत असतांनासुद्धां तूं लग्न करणार नाहींस ? ’

‘ महाराज, तिची आई फार भांडखोर आहे. मेयर नांवाच्या नीच बाईशी माझा संबंध असल्याचा खोटाच आरोप मजवर करून ती नेहमीं भांडत असते. ’

‘ कांहीं हरकत नाहीं. तूं माझा वीर व भावी कर्मचारी आहेस. खरें बोल, तुला ती सुंदरी आवडते कीं नाहीं ? ’

‘ जर कैसर मला परवानगी देतील तर अन्य कोणताहि एखाद्या कुरूप मुलीशीं मी आनंदानें लग्न करीन. ’

‘ ठीक तर मग माझा हुकूम आहे कीं; तुला त्या सुंदरीबरोबर आजच लग्न लाविलें पाहिजे. ’

नंतर कैसरनी महाराणीस निरोप पाठविला कीं, मी या दोघांचा लग्नसंबंध कायम करून टाकला आहे; आणि लवकरच विवाह होणार आहे. या विपरीत निरोपानें कैसरीनबाईना काय

वाटलें असेल बरें ? ती स्वतः त्या विवाहाच्या विरुद्ध होती; पण कैसरनीं वाटेल तशी खटपट करून त्याच दिवशीं त्या दोघांचें लग्न लावून टाकलें ! !

८

कैसरची विनोदीवृत्ति कधीं कधीं दरबारांतसुद्धां त्यांना पछाडते अनेक प्रकारच्या राजकीय गोष्टी करीत असतांना यांना विनोदाची लहर येतें. त्यांचें नेहमीं म्हणणें असतें कीं, अशा रीतीनें मधुन मधुन विनोद करावयास न सांपडला तर आपल्यास बरें वाटत नाहीं.

एकदां दरबार भरला असतां अनेक स्त्रिया व पुरुष यांना प्रणाम करण्यासाठीं क्रमाक्रमानें येत होते व प्रणामकरून परत आपापल्या जागीं जाऊन बसत होते. त्यांत एक जहागीरदारीणबाईची पाळी आली. कैसर कोठें तरी पुढेंच बसले असावेत अशा प्रामाणिक समजुतीनें ती चुकून यांच्यापासून पुढें–पलिकडे–दोन पावलें गेली. तोच यांच्या विनोदवृत्तीस उसळी येऊन हे त्या बाईस म्हणाले:— ‘ नमस्कार, बाईसाहेब ! हरकत नाहीं. आपण मजपासून चारच पावलें पुढें गेलांत ! ! ’ बिचारी इनामदारीणबाई लज्जेनें अर्धमेली झाली व भीतीनें घाबरून गेली. दुसरें दिवशीं क्षमा मागण्यासाठीं ती कैसरकडे गेली. त्यावेळेस कैसरच्या वर्तनांत असंतुष्टता

अगर राग तर दिसला नाहींच; पण स्वारी फार खूष असल्याचें दिसून आलें. कारण आदल्या दिवशीं ते दरबारांत बसून बसून कंटाळून गेले होते; पण इनामदारणीच्या ह्या विनोदानें त्यांचें मनास सुप्रसन्नता आली होती. त्या रात्रीं कैसरनीं त्या बाईला तिच्या रूपवती मुलीसह भोजनास निमंत्रण देऊन त्यांचा सन्मान केला.

९

एकदां राजवाड्यांत परत येत असतां कैसरच्या चर्चेवरून असें दिसत होतें कीं; ते कोणतें तरी एखादें महत्वाचें काम पार पडून आले असावेत. आंत येतांच त्यांनीं बोलण्यास आरंभ केला:-

'काय सांगावें ? लोक मोठमोठ्या विलक्षण चुका करितात.--शहरामधील नाले कसे असावेत याबद्दलचा नकाशा असा कांहीं चमत्कारिक बनविण्यांत आला होता कीं, साऱ्या वस्तीचें घाणेरडें पाणी नेमकें न्हावयाचा खोलींतल्या मोरींत येऊन पडत होतें ! ! चार तासपावेतों सारखें डोकें शिणवून एकाचा तो नकाशा ठीकठाक तयार करून टाकला.'

हें वरील भाषण तींतील गोष्टीपेक्षां हजारपटीनें अधिक महत्वाचें असें काम जें एका मुख्य प्रधानाच्या जागीं-कैप्रिवीच्या जागीं-एका नवीन इसमाची नेमणूक करण्याविषयीं दरबारांत त्या

दिवशीं झालेल्या वाटाघाटीसंबंधीं होते; व तिचा त्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें अगदीं उत्तम असा निकाल करून टाकला होता.

१०

एकदां राजवाडयांत असा प्रश्न निघाला कीं, कैसर टर्कीच्या सुलतानाशीं दृढ स्नेहभाव ठेवण्याचा इतका अट्टहास कां करितात ? वादविवादा अंतीं असें ठरलें कीं, तेथील स्त्रिया अतिशय सुंदर असल्यामुळें त्या अट्टहासाचें मुळाशीं कामदेव आहेत. दुसरें एक असें कारण आहे कीं, ह्या उभयतांचे स्वभाव अगदीं एकसारखें असल्यानें परस्परावर प्रेम आहे. या उभयतांची अशी इच्छा असते कीं, आम्ही केलेला कोणताहि हुकूम, तो बरा वाईट असल्याबद्दल किंचित्सुद्धां कुरकुर न करितां सर्व प्रजेनें पाळला पाहिजे. मग त्यासाठीं तें न पाळणाऱ्यांच्या रक्तानें राजमार्ग रंगविण्यासुद्धां मागे घ्यावयाचे नाहींत !

११

१८९७ मध्यें टर्कीच्या सुलतानांनीं अर्मिनियन लोकांतील कांहीं इसाई मतावलंबी रहिवाशांचे खून करविले. त्यानंतर दुसऱ्याच वर्षीं कैसरनीं त्या सुलतानाकडे आपले कुटुंबांतले माणसांचे फोटो प्रेमाची भेट म्हणून पाठविले. ही भेट दरबारांत देण्याचें काम तेथील जर्मन वकिलाकडे सोंपविण्यांत आलें होतें. वरील

खुनांच्या कारणामुळें त्या वकिलाला सुलतानाचा फार राग आला होता. अशा स्थितींत ही वरील कामगिरी त्याजवर सोंपविण्यांत आली; तेव्हां त्यानें मुख्य प्रधानास उलट कळविलें कीं; ' ही कामगिरी करण्यापेक्षां मी आपल्या जागेचा राजीनामा खुषीनें देईन. ' मुख्य प्रधानाला कैसरच्या विचित्रपणाचा आति धाक वाटत होता. त्याला अशी भीति येऊन पडली कीं; ही कामगिरी न झाल्यास कैसर काय करतील याचा नेमच नाहीं. यामुळें त्यांनीं त्या वकिलास पुष्कळ प्रकारें समजावून त्या कामास प्रवृत्त केलें. इतका आग्रह पडल्यावर त्यानें लाचार होऊन ती ' प्रेम व सनातन सौहार्दसूचक चित्रमय भेट ' सुलतानास नजर केली. अशा प्रकारें त्या दोघांच्या प्रगट व अप्रगट प्रेमांत आणखी भर पडली ! !

१२

कैसर आपल्या सेनेसंबंधीं अतिशय काळजी घेतात; पण ती कोणत्या बाबतींत ? युद्धविषयक शिक्षण, व्यवस्थितपणा, शौर्य अथवा सर्व विषयनिपुणता यांच्या वृद्धीची ते बहुधा कधींच काळजी घेत नाहींत. यांची काळजी म्हणजे सैनिकाचे वेष, त्या वेषाचा रंग, कोट पाटलुण यांची बटणें व त्यांची तऱ्हा, कमरेच्या पट्ट्याची रुंदी, पायांतील बुटांची टोकें गोल असावींत अगर नोंकदार असावींत इ. इ. बाबतींत ते विशेष काळजी घेतात. सैन्यविषयक

महत्वाच्या बाबतींत सेनासचीव अगर सेनापति कांहीं सूचना करीत असले तरी या वरील गोष्टींत त्यांचें मन गुंतल्यामुळें त्यांच्या म्हणण्याकडे यांचें लक्ष्य नसलें !

एकदां कैसरनीं हुकूम दिला कीं; कारखान्यांत काम करावयास येणाऱ्या सर्व सैनिकांनीं दररोज आपले मोठे जोडे घालून आलें पाहिजे. दहा पंधरा दिवस त्यांनीं त्याबरहुकूम केलें पण त्यामुळें कारखान्यांत काम करितांना फार त्रास पडतो हें पाहून त्यांनीं पुनः पहिल्याप्रमाणें वागण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणें प्रश्यांतल्या सर्व रेल्वेवरील स्टेशनमास्तरांना एकदां असा हुकूम फर्मावण्यांत आला कीं; कैसर रेल्वेप्रवासांत असतांनां एखाद्या स्टेशनवर उतरतील त्यावेळेस तेथील स्टेशनमास्तरनें एक प्रकारच्या उंची पोषाकांत त्यांना भेटलें पाहिजे. या पोषाकांत एक उंची कापडाची गोंडयाची टोपी असली पाहिजे. या हुकुमानें प्रत्येक स्टेशनमास्तरला आपल्या पगारापैकीं सुमारें २०० रु. खर्च, पोटाला टांच देऊन करणें भाग पडलें व ज्यांना तितका खर्च करण्याची ऐपत नव्हती; त्यांना नोकरीला मुकावें लागलें !!

१२

राजवाड्यांत उत्सवप्रसंगीं अगर भोजनसमारंभास येणाऱ्या सव निमंत्रित स्त्रीपुरुषांनीं एका विवक्षित प्रकारचा पोषाक करून यावें असा सक्त हुकूम आहे. स्वतः कैसरना खर्चासंबंधीं कधींच

संवय नाहीं. पण ज्या रहिवाशांचें उत्पन्न बेताचेंच आहे त्यांना या कपड्यांप्रीत्यर्थ हजारों रुपयांवर पाणी सोडावें लागतें. ते जर आपल्या घरचे दुसरे उंची कपडे घालून आले तर तें कैसरना खपत नाहीं. यामुळें निमंत्रीत मनुष्य कोणत्या तरी बहाण्यानें घरीं राहण्याचा प्रयत्न करतो. कोणी अचानकपणें गांवास निघून जातो; कोणाची तबियत एकाएकीं बिघडतें; वगैरे अडचणी उपस्थित करून हजर न राहण्याबद्दलची कैसरची क्षमा मागतो. आपल्या समोर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिनें आपण सांगू त्या पोषाकांत आलें पाहिजे असें कैसरला वाटत असतें पण असा कोणता शहाणा श्रीमंत मनुष्य एक तासासाठीं हजारों रुपये कपड्यांप्रीत्यर्थ नासून टाकण्यास खुषीनें तयार होईल ! अनेक स्त्रिया व पुरुष कैसरच्या या सन्मानाला दुरूनच हात जोडून कोणत्या ना कोणत्या तरी सबबीनें घरीं निजून राहतात !

१४

सन १८९५ मध्यें इंग्लंडचे एक मोठे प्रतिष्ठित गृहस्थ लॉर्ड ल्यान्सडेन स्वतः कैसरचे पाहुणे म्हणून जर्मनीस गेले. प्रथमतः त्यांच्या राहण्याची सोय राजवाड्यांत करण्यांत आली होती; परंतु ते येतांच त्यांची बर्लिनमधील एका मोठ्या खाणावळींत राहण्याची सोय करण्यांत आली. ते आल्याची खबर मिळतांच कैसरच्या येथील खास गाडी त्यांना घेण्यासाठीं स्टेशनवर पाठविण्याचा मान

मात्र त्यांना मिळाला. शिवाय त्यांच्या खाण्यापिण्याच्या बाबतींतही कांहीं कमतरता ठेवली नाहीं; परंतु त्यांची असामान्य प्रतिष्ठा व स्वत: कैसरशीं असलेला त्यांचा स्नेहभाव हे पाहतां त्यांचा सत्कार ज्या मानानें व्हावयास पाहिजे होता; तसा मुळींच झाला नाहीं.

सैन्याच्या कवायतीच्या वेळेस सर्व पाहुण्यांना तेथें बोलावण्यांत आलें होतें; परंतु मोठ्या मुष्कीलीनें लॉर्ड लॅन्सडोनचा पत्ता, त्यांच्या मित्रानें शोधून काढला. कारण त्यांना दुसऱ्या किंवा तिसऱ्या मागील रांगेंत दूर उभें करण्यांत आलें होतें ! रात्रीं जेवण्याचे वेळेस त्यांची खुर्ची तेथील साधारण प्रतिच्या सरदारांच्या रांगेंत ठेवण्यांत आली होती ! रात्रींच्या वेळेस होणाऱ्या नाटकाचें यांना मिळालेलें टिकीट, दूर जमिनीवर उभें राहण्याचें होतें ! त्या स्वदेशाभिमानी सज्जन इंग्रज मनुष्यानें हा अपमान निमुटपणें सहन केला. वरील अप्रतिष्ठेखेरीज बाकी सर्व प्रकारचा सत्कार बरा करण्यांत येत होता; परंतु वरील तिन्ही ठिकाणच्या अपमानानें एखादा साधारण मनुष्यसुद्धां रागावला असता. मग लॉर्ड ल्यान्सडेनच्या बाबतींत काय सांगावें ? पण विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं; एकच वर्षापूर्वीं हे जर्मनीस आल्यावेळीं कैसरनीं त्यांचा फारच योग्य आदरसत्कार केला होता !!

या अद्भुत वैपरित्याचें कारण येवढेंच होतें कीं; लॉर्ड लॅन्सडेन जर्मनींत आले तेव्हां राजधानीस पोंहचण्याच्या अगोदर, कैस-

४

रच्या बैठकींतील एका सैनिकाबरोबर बोलतां बोलतां त्यांनीं इंग्लंडच्या रहिवाशांची प्रशंसा केली व म्हटलें 'मी आपणांस येथील वटेम्बर्गच्या राजाइतका प्रतिष्ठित समजतों.' ही गोष्ट ऐकतांच कैसर म्हणालेः—

'हं! हं! एक सामान्य इंग्रज, येथील वटेम्बर्गच्या राजा-इतका प्रतिष्ठित असतो आँ?'

येवढेंच बोलून कैसर स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं असें ठरविलें कीं; या गृहस्थाला, त्याचा येथला दरजा अवश्य समजावून दिला पाहिजे. या त्यांच्या विचाराचें फल आम्ही वर वर्णिलेंच आहे!!

१५

युरोपांतल्या राजे लोकांत असा प्रघात आहे कीं; एकजण दुसऱ्याला आपल्या देशाच्या कांहींना कांहीं तरी सन्मानसूचक पदवीनें आलंकृत करीत असतो. ह्या पदव्या कधीं कधीं सैन्यासंबंधींही असतात. या रीतीला अनुसरून कैसरनीं आपली आजी महाराणी विक्टोरिया यांना आपल्या येथील एका सैन्याच्या प्रधानाची पदवी दिली होती. एकदां कैसर इंग्लंडला गेले. तेथें भोजनप्रसंगीं यांनीं आपलें वक्तृत्व खालीं लिहिल्याप्रमाणें सुरू केलें:—

'मी, इंग्लंडची राणी, भारतवर्षाची महाराणी व आमच्या खास स्वारांच्या सेनेचे प्रधान यांच्या सौख्याची उत्तरोत्तर वृद्धि होण्यासाठीं परमेश्वराजवळ प्रार्थना करीत आहे. ......'

हरएक गोष्टींत आपण दिलेल्या पदवीचा उल्लेख करण्याची काय अवश्यकता आहे ? सर्व जगाला माहीत होते कीं; यांनीं आपल्या आजीच्या मागें एक उपाधी लावून दिली आहे ! परंतु त्या भोजनप्रसंगीं यांना त्याचें स्मरण दिल्यावांचून रहावलें नाहीं !

१६

एकदां कैसरचा एक मुख्य पदाधिकारी, ज्यांना फाशीची शिक्षा झाली असून त्यांनीं महाराजांकडे दयेची प्रार्थना केली होती; त्याची यादी घेऊन त्यांजकडे गेला. त्यांला यांनीं कंटाळून जाऊन सांगितलें कीं; 'यांपैकीं ज्यांना आपल्या प्रतिष्ठेचा बचाव करण्याकरितांच केवळ या शिक्षेला पात्र व्हावें लागलें तेवढ्यांचींच नांवें यांतून काढून टाका. बाकी दुष्टांच्यासाठीं वेळ घालविण्यास मला फुरसद नाहीं. त्यांना आपल्या कर्माचें फल भोगूं द्या.'

ज्या कामांत कैसर गुंतल्यामुळें त्यांना वरील महत्वाच्या कामासाठीं फुरसद नव्हती तें काम कोणतें होतें म्हणाल तर एका नाटकाचा प्रयोग होण्यासाठीं तयारी करावयाची होती !!

१७

एके वेळीं कैसरनीं एका मुख्य सैनिकाला तीन दिवसपर्यंत तुरुंगांत राहण्याची शिक्षा दिली. त्याजवर असा आरोप ठेवण्यांत



९४०८

आला कीं; त्याच्या जोडयाला मारलेले खिळे नीट रीतीनें ठोकलेले नव्हते ! हें ऐकून कैसरीनबाईंना आश्चर्य वाटलें. कैसरनीं त्यांस सांगितलें ‘ अहो, त्याला शिक्षा करण्याचें वास्तविक कारण असें होतें कीं; त्यानें तुम्हां आम्हांला त्या दिवशीं सलाम केला नव्हता. ’

कैसरीन–‘ परन्तु त्या दिवशीं आपण नवीन तऱ्हेचा पोषाक केला होता. त्यामुळें कदाचित त्यानें आपणाला ओळखलें नसेल. ’

कैसर–‘ मला त्याची इतकी पर्वा नाहीं. प्रत्येक सैनिकानें व नोकरानें, त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधली तरी आपल्या धन्याला ओळखलेंच पाहिजे. ’

याचप्रमाणें दुसऱ्या एका सैन्यांतील एका सैनिकानें यांना नियमानुसार सलाम केला नव्हता. या अपराधाबद्दल त्याला हुकूम मिळाला कीं; ‘ तुह्मी आपली सर्व चीजवस्त घेऊन येथून चालतें व्हावें. कारण अशा प्रकारच्या मूर्खांसाठीं माझ्या सैन्यांत जागा नाहीं ! ! ’

१८

थंडीच्या दिवसांत एके दिवशीं संध्याकाळच्या वेळीं हे पायींच सहल करावयास जात होते. त्यावेळीं एका साधारण सैनिकानें यांना दुरूनच ओळखून, जरा पुढें होऊन, यांना पद्धतशीर सलाम केला. येवढयानेंच हे फार खूष झाले आणि म्हणाले–

‘ बेटा, तूं कोण आहेस ? ”

सैनिक-( हात जोडून ) ' महाराजाधिराज, महाराजांच्या अमुक सैन्यांतील मी साधारण सैनिक आहे.'

कैसर-' काय ? एक साधारण सैनिक ? ठीक. सांगा तुमची कोणी प्रेमिका आहे कां ? '

सैनिक-' महाराजाधिराज, होय. अमुक युवति जी......'

कैसर-ओहो ! फार उत्तम. मी तुम्हाला कनिष्ट कप्तानाची पदवी दिली आहे. जा ! आपल्या भावी सासऱ्याला जाऊन सांगा कीं, तुम्ही माझे खास सार्जंट आहांत ! ( सैनिक भाषेंत ) तोंड फिरवा. चला.

सैनिक-महाराजाधिराज, धन्यवाद ! हजारों धन्यवाद ! परमेश्वर आपणांला सर्वदा सुखी ठेवो !

नंतर कैसर आपल्या राजवाड्याकडे निघून गेले व तो भाग्यशाली नवा सार्जंट ( छोटा कप्तान ) आनंदानें ( आमच्या समजुतीप्रमाणें ) आपल्या प्रियकरणीच्या घराकडे निघून गेला.

११

कांहीं काळापूर्वीं कैसर आपल्या मानापमानाकडे फार लक्ष्य देत असत. जर कोणत्याही प्रकारची त्यांचे संबंधाची बरी वाईट गोष्ट कोणाच्या तोंडून निघाली अगर एखाद्या वर्तमानपत्रांत छापली गेली तर अपराध्याला चांगलीच शिक्षा मिळत असे. त्या प्रकारच्या अपराध्यासाठीं निराळीच व्यवस्था करण्यांत आली होती व तिजवर कैसरचें सदोदित लक्ष्य असे.

## कैसरचे मनश्चित्र !

एकदां एका जमिनदाराच्या स्त्रीचे तोंडून निघालें कीं, कैसर माझ्या पायांतल्या जोड्यांचेसुद्धां चुंबन घेतात. त्याचप्रमाणें एका वर्तमानपत्रांत असें छापलें होतें कीं, काल रोजीं महाराज व त्याचे-बरोबर आणखी ५० जण शिकार करीत असतां एका वृद्ध डुक-रीच्या मागें सारखे दोन तासपर्यंत आपले घोडे पिटवीत होते; आणि याचप्रमाणें आणखी एका स्त्रीनें मोठ्या धारिष्टानें असें म्हटलें होतें कीं, कैसरनीं रचिलेल्या कविता कवडी मोल आहेत. या तिघां-पैकीं पहिल्या दोन अपराध्यांना, कैसरनीं, नऊ नऊ महिन्यांची व तिसऱ्याला तीन महिन्यांच्या कैदेची शिक्षा दिली !

अशा प्रकारच्या अपराधावरून शेंकडों जण तुरुंगाची सफर करून आले होते. ह्या व्यवस्थेसंबंधीं दुसरी एक कौतुक पूर्ण गोष्ट अशी होती कीं, जर कोणी मनुष्य कैसरच्या बाबतींत कांहीं अप-मानकारक गोष्ट बोलला तर त्याजवर त्या गोष्टीचा ५ वर्षेंपर्यंत उलट प्रयोग होत असे.

एकदां एका साधारणप्रीतीच्या १६ वर्षांच्या सुंदर किशो-रीच्या तोंडांतून असें उद्गार निघालें कीं; 'जर मला कैसरच्या बरोबर खेळावयाचा सुयोग प्राप्त होईल तर किती उत्तम होईल !' बस्स येवढ्यावरून त्या बिचारीला धरून आणून नऊ महिन्याची शिक्षा फर्माविण्यांत आली. कैसरना ती गोष्ट कळतांच त्यांनीं सदरहु बाबतींत पूर्ण चौकशी करून त्या मुलीला तावडतोब क्षमा केली व

सोडून दिलें. तिला कैदेतून सोडतांना यांनीं आपल्या मिशीवर ताव दिला व तिजकडे वळून म्हटलें. ‘या सुंदरीनें मला केव्हां तरी झोंकदार पोषाखांत सजलेलें पाहिलें असावेसें वाटतें. अरेरे !! मी तिला केव्हांही अपराधीच ठरवितों, ती बिचारी अशिक्षित आहे ! तिनें माझ्यासंबंधीं जें काय म्हटलें ती एक वेगळ्याच प्रकारची माझी-माझ्या सौंदर्याची-प्रशंसा होती !!’

ज्या युवतींना सौंदर्य अनुकूल होतें त्या आपल्या चित्ताकर्षक रूपाच्या जोरावर या शिक्षाविधानापासून आपणाला कधीं कधीं बचावीत असत; परंतु बिचाऱ्या पुरुषांचे मात्र पुरे हाल असत आणि त्यांना निष्कारण कैदखान्यांत रडत पडावें लागत असे १९०७ सालीं परमेश्वरास त्यांची दया आली व त्यामुळें या कायद्यांत योग्य सुधारणा करण्याची कित्येकांच्या मनांत प्रेरणा उत्पन्न होऊन त्या कायद्यांत बरेच अवश्य फेरफार करण्यांत आले ही महदानंदाची गोष्ट झाली !!

२०

कैसर आपल्या बायकोला, आणि मुलांना पत्र लिहितात त्यावेळीं ते त्या पत्राखालीं अशी सही करितातः—

“ विलियम महाराजा चक्रवर्ती. ”

हे जर्मनीचे कैसर होतांच सर्व जग यांना चांगल्या प्रकारें ओळखीत असतां स्वतः कैसरीन व राजकुमार यांना सुद्धां ह्या

गोष्टीचें सतत स्मरण देत राहिल्यानें काय फायदा होत असेल तो त्यांचा त्यांनाच ठाऊक किंवा परमेश्वराला माहीत. तिसऱ्याला मात्र तें एक गहन गूढ आहे ! !

२१

एकदां केसर आपल्या खास खोलींत कांहीं वाचीत बसले होते. त्यावेळीं त्यांनीं साधा पोषाख केला होता. त्यांच्या खोलीचा दरवाजा लागलेला होता; परंतु दारास असलेल्या फटींतून आंतले सहज दिसत होते राणीवंशांतली एक वृद्ध दासी तिकडून जात असतां तिला तेथें केसर दिसले. तेव्हां ती तेथेंच थबकली व हळूच त्या फटींतून आंत पाहूं लागली. तिला मनांत वाटतें कीं, ' आज माझें धन्यभाग्य आहे ! महाराजांना या साध्या पोषाकांत पाहून माझे नेत्र पवित्र झालें.

केसरचें दर्शन करून ती आपली दासीमंडळांत येऊन आनंदानें आपल्या भाग्याचें वर्णन करीत होती. कांहीं थोडेसें बोलणें झालें नाहीं तोंच महाराजांचा मुख्य नौकर तेथें येऊन दरडावून विचारूं लागला कीं, ' आतां महाराजांच्या खाजगी खोलीजवळ कोण स्त्री उभी होती ? ' हें ऐकतांच म्हातारीनें घाबरून जाऊन ' मी होते ' असें सांगितलें. तेव्हां तो म्हणाला ठीक. महाराजांचा हुकूम असा आहे कीं, तूं आतांच्या आंता येथून चालली हो. आपल्या राजवाड्यांत तुझ्या सारख्याला नौकर ठेवूं इच्छित नाहीं. चल, चालती हो येथून. '

त्या अभागी म्हातारीवर वज्राघात झाला. बिचारी रडतच आपल्या सर्व साधनासह राजवाड्यांतून बाहेर पडली ! !

२२

एकदां कैसर रागांत होते व त्यांना पहातांच असें दिसत होतें कीं, आतां कोणावर तरी वीज कडकडणार ! इतक्यांत त्यांनीं बोलण्यास आरंभ केला–

" काय हा अंधार ! जर माझ्या राजवाड्यांत अशा चोऱ्या होऊं लागल्या तर मग देशांत कोणाची कांहींसुद्धां वस्तु ठिकाणावर रहाणार नाहीं ! आतांशा येथले लोक फार चोर बनले आहेत. यावरून मला वाटतें कीं, आतां वाड्यांत चांगलाच पक्का बंदोबस्त केला पाहिजे; तरच येथल्या वस्तू चोरीस जाण्याचें बंद पडेल ! "

हें भाषण ऐकतांच सर्वांच्या अंगावर कांटा उभा राहिला ! कैसरीनबाईनासुद्धां मोठी काळजी पडली. त्यांनीं सुद्धां या गोष्टीचा पुष्कळ तपास केला कांहीं दिवसानंतर राजवाड्यांतल्या एका नोकरानें याचा खुलासा खालीलप्रमाणें केला:—

' कैसरनीं गेल्या रविवारीं आपला अर्धवट ओढलेला चिरूट आपल्या मेजावर ठेवला होता. नंतर बुधवारीं त्यांना त्याची आठवण झाली तेव्हां पाहिलें तर तेथें तो नव्हता ! सर्व नोकर लोकांना विचारपूस केली पण पत्ता लागला नाहीं. तेव्हां त्यांचा समज झाला

कीं, दासींपैकींच कोणी तरी लांबविला असला पाहिजे. म्हणून ताबडतोब त्यांनीं चोरीचा तपास सुरूं केला होता. '

ऐकलांत राजवाड्यांतल्या दरोड्याचा वृत्तांत ! तीन दिवसांनीं तो चिरूट कचऱ्याच्या टोपलींत सांपडला. तेव्हां खोली झाडणाऱ्या दासीनें कबूल केलें कीं, " मला वाटलें कीं, आपलें मेज साफ नाहीं. असें पाहतांच महाराज मजवर रागवतील; म्हणून तो टोपलींत टाकून देऊन मेज साफ केलें. "

बिचाऱ्या नोकरांचें मरण. साफसूफ करावें तरी शिक्षा, आणि न करावें तरी शिक्षा ! त्यांनीं बिचाऱ्यांनीं काय करावें तें आपणच सांगा ?

२३

कैसरची अशी समजूत आहे कीं, सार्वजनिक उत्सव अथवा सैन्याच्या खेळाच्या वेळीं स्त्रियांना तेथें बोलावल्यानें व्यवस्थेंत फार घोंटाळा उडतो. येवढ्यासाठीं तें हलके हलके अशा प्रसंगीं बोलावयाच्या स्त्रियांची संख्या कमी करीत आहेत. १८९६ मध्यें सैन्याची कवायत झाली, तेव्हां ती पाहण्यासाठीं फक्त १०० निवडक स्त्रियांना निमंत्रण देण्यांत आलें होतें. त्या सर्व जणी कैसरच्या भयानें चांगला पेहराव करून व आपापल्या समजूतीप्रमाणें नटून आल्या होत्या. कवायतीची वेळ ११ वाजतां होती. कैसरनीं हुकूम

दिला कीं; ' ठरलेल्या वेळेच्या पूर्वी एक दोन मिनिटें मी येईन मी येऊन आपल्या जागेवर बसल्यानंतर बायकांना आंत येऊं द्यावें अगोदर कोणी आल्यास तिला बाहेरच थांबवून ठेवावें. '

आतां या स्त्रिया मोठ्या अडचणींत सांपडल्या. येऊन तर चुकल्या. आतां परत जाणें बरें दि त नव्हतें. सरकारी कामगारांनीं त्या सर्वांना एका लहानशा खोलींत उभे रहावयास सांगितलें. त्या खोलीचे दार एका चौथऱ्याकडे होतें; व तेथेंच त्यांना गंमत पाहण्यासाठीं बसण्याकरितां खुर्च्या ठेवलेल्या होत्या. खोलींत हवा बिलकूल येत नव्हती. व स्वच्छता तर मुळींच नव्हती. त्यावर कळस म्हणजे तेथें थोडी दुर्गंधि पण येत होती. कसें तरी करून त्या स्त्रियांनीं आपलें दोन तास त्या काळ-कोठडींत काढले. नंतर अकराला दोन मिनिटें कमी असतांना यांना आपापल्या जागीं येऊन बसण्याचा हुकूम झाला. त्यावेळेचा देखावा काय वर्णावा ! त्यांतली प्रत्येकजणीं आपल्याला चांगली जागा मिळविण्याविषयीं धांदल करूं लागली. कोणी त्या चवुथऱ्याच्या पायऱ्यावरून घसरून पडल्या, कोणी धांदलीनें दुसरीला धक्का मारून पुढें गेल्या; कोणी आपला झगा वर धरून मागच्या खुर्चीवर जात होत्या, कोणाचीं शाल त्या धांदलींत नाहींशी झाली; तर कोणी धडपडत खालीं पडत व पुनः उठत. अशा रीतीनें त्यांची एकच धांदल उडून गेल्यामुळें एक चमत्कार पूर्ण खेळच सुरूं झाला होता !

अशा वेळीं स्वतः कैसर सर्वांच्या पुढच्या खुर्चीवर बसून मनांत काय विचार करीत असतील यांचा आपणास अंदाज करितां आलाच असेल. ते आपल्या मनाशीं असा विचार होते कीं, माझा पहिलाच विश्वास दृढ होत आहे कीं, या स्त्रियांना अशा सार्वजनिक प्रसंगाला बोलावण्यानें सर्व गोष्टींचा खेळखंडोबा होतो यांत शंका नाहीं !

२४

साधारणतः कैसरच्या जवळ क्वचित मनुष्यें जाऊं शकतात. यामुळें जेव्हां हे एखाद्या समारंभास आपल्या राजकीय थाटांत जाण्यास निघतात तेव्हां ह्यांना पाहण्यास हजारों स्त्रीपुरुषांची गर्दी लोटते. हे त्या ठिकाणीं जाऊन पोंहचल्यावर सामान्यतः तेथील राहिवाशी स्त्रियांची यांच्याभोंवती गर्दी जमते. इकडे यांना जास्त गर्दी झालेली खपत नाहीं व थोड्याशा जमावानें यांना चैन पडत नाहीं. एकदां १८९४ सालीं एका मोठ्या जमावांत जाण्याचा यांना प्रसंग आला. तेव्हां यांच्या हुकुमानें स्वार लोकांनीं गर्दी मोडण्यास सुरुवात केली व मागून हे डोळे झांकून आपला घोडा दौडवीत चालले. या धांदलींत कित्येक स्त्रिया खालीं पडल्या व कित्येक तुडवल्या गेल्या ! !

दुसरे दिवशीं राजवाड्यांतल्या मुख्य कारभाऱ्याकडे मोठ्या घराण्यांतल्या स्त्रियांच्या शेंकडों तक्रारी आल्या. त्यांत या स्वा-

यांच्या वाईट वर्तनाविषयीं बरीच कागाळी केलेली होती. कैसरनीं तीं पत्रें पाहिलीं तेव्हां ते हंसले व म्हणाले:—

'पहा ना, बायकांच्या धडपडीला कांहीं मर्यादा आहे कां? मीं नेहमीं ह्मणत असतो कीं; या बायका सार्वजनिक उत्सवाच्या वेळेस एक प्रकारें विपत्तिच असतात!'

महाराज विलियम यांचें हें म्हणणें अगदीं सोळा आणे खरें आहे! कारण तें जर खोटें असतें तर 'राजा मारे और रोवे न दे' ही म्हण प्रचारांत आलीच नसती.

२५

जर्मनींत अनेक मेळे होतात. त्यांपैकीं कांहीं कैसरच्या अध्यक्षतेखालीं होतात; व त्यांत साधारणपणें सर्व सामान्य जनांचा जमाव होत असतो. हे मेळे तेथें फार पुरातन काळापासून होत आले आहेत. तथापि हल्लींच्या कैसरना त्यांबद्दल उत्साह वाटत नसतो. तरी हे होतच असतात. या मेळ्यांत घुसून लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून उभें राहणें अथवा त्यांच्या श्वासोच्छ्वासानें दूषित झालेल्या हवेंत रहाणें महाराजांना अगदीं नापसंत वाटतें. यामुळें त्यांना तसें करण्यांत अगदीं उत्साह वाटत नाहीं. वास्तविक प्रचलित रिवाजानुरूप कांहीं कांहीं वेळेस यांना त्या मेळ्यांत प्रविष्ट होणें भाग पडतें. राजवंशांत कोणी मरण पावलें अगर देशावर एखादें असामान्य संकट येते तेव्हां हे मेळेबंद रहातात. तसे ते नेहमीं बंदच रहावेत असें यांना वाटतें.

कैसरचें मनश्चित्र !

जानेवारी १८९६ मध्यें प्रश्याचे राजकुमार अलेक्झांडर परलोकवासी झाले. हे कैसरचे आजे लागत होते. महाराजांना त्यांच्या मृत्यूनें जरूर दुःख झालें असलें पाहिजे. परंतु यांना खरोखर एका गोष्टीचा आनंद वाटला कीं; कमींत कमीं एक वर्षपर्यंत या मेळ्याच्या त्रासापासून आपली सुटका झाली !! एका मेळ्याची बहुतेक तयारी होऊन चुकली होती व निमंत्रणें पण दिलीं गेली होती. तरी पण यांनीं ताबडतोब आज्ञा दिली कीं; सर्व काम ताबडतोब बंद ठेवावें. आणि सर्वांना सूचना द्यावी कीं; या वर्षांत हा मेळा भरणार नाहीं. राजाज्ञा ताबडतोब अमलांत आली. त्या वर्षीं मेळे मुळींच झाले नाहींत. मेळे न भरल्यानें जर्मनींतील लोकांना फार वाईट वाटतें. कारण अशा वेळेस परंपरागत स्वत्त्वाचा उचित आदर होत असतो आणि दुसऱ्यांना आपली निपुणता दाखविण्यास व लाभ करून घेण्यास संधि सांपडते. मेळे न भरण्यानें रहिवाशी व व्यापारी अप्रसन्न होतात; परंतु ते कैसरच्या स्वभावाला पटत नाहींत !!

एकीकडे महाराजांना या मेळ्याबद्दल निरुत्साह वाटतो परंतु ज्यांत यांना पसंत असलेल्या मंडळींचा जमाव असण्याचा संभव असतो ते मेळे, हे कधीं कधीं कारणाशिवायसुद्धां भरवितात; आणि एकेक नवीन मौज करण्यासाठीं कांहीं तरी कारणांचा हे आपल्या मनाशीं विचार करीत असतात. १८९६ मध्यें राजकुमार अलेक्झांडर याच्या मृत्युच्या कारणावरून यांनीं मेळे बंद ठेविले परंतु

कांहीं काळानें यांना स्वस्थ बसण्याचा कंटाळा आला तेव्हां राजकीय नाचासाठीं अनेक रंगल स्त्रिया व पुरुषांना निमंत्रणें गेलीं !! मग काय पहावयाचें ! सर्व राजवाडा नाचरंग, हास्यविनोद आणि आमोद प्रमोद यांनीं दणाणून सोडला !

मनांत ठरविलेल्या एखाद्या उत्सवाची तयारी ते तावडतोब कोणाचेंही न ऐकतां करितात अगर अगोदर सूचना देऊन लौकरच सुरुवात करितात. अशा स्थितींत नोकर लोकांचे फार हाल होतात. तथापि त्यांतले त्यांत जसें जमेल तसें करून टाकतात. १८९५ सालीं एकदां कैसरनीं अशीच एका उत्सवाची तयारी तावडतोब करण्याचा हुकूम दिला, व सांगितलें कीं; तीनच दिवसांत एक नाटकाचा प्रयोग करून दाखविण्यांत येणार आहे. त्यांत स्वतः आम्ही महाराणी, त्यांच्या सर्व सुंदर मैत्रिणी आणि कित्येक निवडक सैनिक काम करणार आहेत. सर्व तयारी करण्यास सुरुवात झाली. कैसरीनबाई वगैरे स्त्रियांनीं त्यासाठीं नवीन मूल्यवान् कपडे तयार करविले. नाटकांतल्या महत्वाच्या कामाकरितां राजवंशीय स्त्रिया व पुरुष आणि बाकी कामाकरितां साधारण प्रतिच्या स्त्रिया व पुरुष यांची योजना करण्यांत आली होती. त्यावेळीं वाद्यें वाजविण्याकरितां उत्तम वादकही बोलावण्यांत आले होते.

नियमित वेळीं नाट्यशाळेंत हे सर्व जमले. हे सर्व कैसरना भीत होते. त्यांपैकीं ज्या स्त्रिया आणि पुरुष राजवाड्यांतले होते

ते थोडेबहुत धीट होते; आणि त्यांपैकीं जे महाराजाबरोबर नेहमीं बसत उठत असत ते तर मोठे बोलघेवडे होते. सामान्य मनुष्यांना भयभीत करण्याला महाराजांचें वास्तव्यच पुरेसें होतें; परंतु आरंभापासूनच यांनीं जेव्हां नाटकाच्या रंगभूमीची व्यवस्था आपल्या हातीं घेतली तेव्हां तर त्यांपैकीं बहुतेकांना जें कांहीं थोडेसें येत होतें त्याचा देखील विसर पडला ! सर्व नट आणि नटी जमल्यावर कैसरनीं आपलें व्यवस्था करण्याचें काम सुरू केलें.

रंगभूमीची व्यवस्था पहाण्याचें काम सोपें नाहीं. मग कैसरसारख्या सैनिक माणसाला नाटक प्रयोग करविणें व स्वतः त्यांत भाग घेणें म्हणजे सैन्याची कवायतच समजावयाची ! त्यांनीं सुरवातीसच म्हटलें:——

" अटेंशन. " नंतर मिस्तर किंवा मिस्, मिसीस शिवायच प्रत्येक पुरुष व स्त्रीचें नांव पुकारावयास आरंभ केला ! प्रत्येक पुढें येणाऱ्या इसमास त्याची जागा व कामगिरी हें सांगत होतें. वाद्यें वाजविणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून म्हणाले:——

" ए, सारंगीवाल्या, तूं चांगला नीट बैस. ए, पियानोवाल्या, तूं आपलें डोकें डाव्या बाजूस झुकव. ...सर्व लहान सारंगीवाले लोकांनीं आपलीं डोकीं खालीं नमवावींत. ( त्याप्रमाणें सर्वांनीं केल्यावर ) बस. आतां सर्व ठीक जमलें. ध्यानांत ठेवा ! मी सांगेन त्या बरहुकूम सर्वांनीं आपापलीं वाद्यें वाजवावींत ! "

नंतर बाकी तिघांना बोलावून त्यांच्या जागेवर त्यांना बसावयास सांगितलें. त्यानंतर सुंदर युवतींची पाळी आली. यांनीं त्यांतल्या एका ठसकेबाज तरुणीला म्हटलें:--- ' मिसिस बैसेबिज लक्ष्यांत ठेवा, तुम्ही ज्या स्त्रीची भूमिका करणार आहांत, ती आपल्या सौंदर्यानें व कोमलपणानेंच केवळ नाहीं तर आपल्या हावभावानेंसुद्धां प्रसिद्ध होती ! '

मिसिस बैसेबिजची उमर सुमारें २३ वर्षांची होती. ती रूपवती व कोमल असून विनोदी व चपल होती. शिवाय ही कैसरशीं नेहमीं बोलणारी बसणारी होती. त्यामुळें वर लिहिलेल्या कैसरच्या विचित्र कटाक्षाच्या भाषणानें ती कांहींशी लाजली व तिच्या गालांवर लाली चढली. तिला कैसरकडे आपली नजर टाकून पहावेना. ती आपल्या जागेवरून किंचित् मागें सरून आपल्या मैत्रिणींत जाऊन बसली. ही नवयौवना आपल्या नाटकी पोशाखांत फारच सुंदर दिसत होती. यामुळें ती कैसरीनबरोबर नाटकशाळेंत आल्यापासून तिच्यावर विशेष नजर ठेवून तिच्या सौंदर्यदर्शनानें हे आपल्या नेत्रांना आनंदीत करीत होते. पण नेत्र आणि जिव्हा यांच्यांत प्रतिस्पर्धा सुरू झाली. यामुळें कारण नसतांनाही यांना त्या विलासिनीशीं बोलल्याखेरीज रहावलें नाहीं ! !

कैसरच्या विलक्षण रंगव्यवस्थेनें कैसरीन अधिकच घाबरल्या; व त्यांतून निसटण्यासाठीं आजारीपणाचा बहाणा करावयास

लागल्या. पण कैसर थोडेंच त्यांचें ऐकणार ? त्यांनीं कैसरीन बाईंना नीट रीतीनें पंखा धरण्याची शंभरदां तालीम दिली परंतु त्यांना तें साधेना; तेव्हां हे फार असंतुष्ट झालेसें दिसले. यानंतर बाकी युवतींच्याकडे तें वळणार होते व त्यामुळें त्या चपलाचीं हृदयें भीतीनें कांपत होतीं. पण इतक्यांत बातमी आली कीं; प्रेक्षक सर्व आले असून ज्या वृद्ध गृहस्थांच्या सन्मानार्थ हा समारंभ करण्यांत आला तेही आले आहेत. हें ऐकतांच कैसर तेथून निघाले आणि स्वतःला करावयाच्या कामाची तयारी करावयास लागले; नंतर त्यांच्या जागीं दुसरा व्यवस्थापक आला. तो आपल्या कामांत फार निपुण आणि अनुभवी होता. तो आला तेव्हां सर्व स्त्रियांच्या जीवांतजीव आला आणि मग प्रयोगाला सुरुवात करण्यांत आली !

तुम्हांस

क्षात्रविरांच्या खऱ्या हृदयाची परिक्षा पाहणे असेल तर

अघोर कर्म-कथा !

हेंच पुस्तक मागवा !

किंमत बारा आणे . व्ही. पी.नें चवदा आणे.

प्रो. ज्ञानमित्र, पुणें-शहर.

# ४ कैसरची राजनिती.

कैसरचे वडील तिसरे फ्रेडरिक यांचा विवाह महाराणी व्हिक्टोरिया यांच्या मुलींबरोबर झाला होता. यांचे विचार प्रथमपासूनच उच्च दर्जाचे होते; पण इंग्रज जातीच्या सहृदय महाराणीच्या प्रभावानें ती अधिक उदात्त बनले. यांच्या उदारपणाच्या वागणुकीनें, हे गादीवर बसल्यावर राजनीतिला निराळेंच वळण लागून तींत पुष्कळ फायदेशीर फेरफार होतील अशी सर्व प्रजेला मोठी आशा वाटत होती. पण दुर्दैवानें त्यांना लवकरच निराश व्हावें लागलें. सन १८८८ च्या मार्च महिन्यांत हे गादीवर बसले, परंतु पुढें तीनच महिन्यांनीं हे परलोकवासी झाल्यामुळें त्यांचे चिरंजीव, हल्लींचे दुसरे विलियम यांच्या हातीं राज्यसूत्रें आलीं.

तिसरे फ्रेडरिक आणखी कांहीं काळ जगते, तर हल्लींच्या कैसरच्या उग्र विचारांत कांहीं तरी सुधारणा होण्याचा संभव होता. पहिले विलियम व त्यांचे मुख्यप्रधान बिस्मार्क यांच्या शिक्षणाच्या प्रभावानें यांच्या कुटील नीतिनें वेगळेंच स्वरूप धारण केलें. यांनीं आरंभापासूनच सर्व राज्यकारभार आपल्याच तंत्रानें चालविण्यास आरंभ केला. यांनीं आरमार व सैन्य यापुढें आपलें पहिलें भाषण केलें; व त्यानंतर तीन दिवसांनीं दरबारांत सर्व साधारण लोकांपुढें भाषण केलें. त्यांत यांचा सैन्याविषयींचा आदर व महति विशेष

असल्याचें दिसून आलें. यांनीं कित्येक वेळां म्हटलें आहे कीं, " आमच्या राज्याच्या इमारतीचा अढळ आणि भक्कम पाया आमचें सैन्यबळ होय. "

एखादें काम होवो वा न होवो; लाभ होवो अथवा हानि होवो. कांहीं झालें तरी यांची इच्छा अशीच असतें कीं, आम्ही सांगूं त्या बरहुकूम अंमलबजावणी झालीच पाहिजे. त्यांत थोडीसुद्धां कसूर झाल्यास हे तावडतोब नाखूष होतात. यामुळें ह्यांचें हातीं राज्यसूत्रें येतांच यांच्यांत व बिस्मार्कमध्यें विलक्षण ओढाताण सुरूं झाली. दोघेही आपापला हेका सोडीनात. याचा परिणाम असा झाला कीं; यांनीं बिस्मार्कला आपल्या जागेचा राजीनामा द्यावयास लागलें. नंतर कैसरनीं सर्व राज्यकारभार आपल्या स्वताच्याच तंत्रानें चालविण्यास सुरुवात केली. आतां हें खरें कीं; कैप्रिवी, होहेनलोह्य, ब्युलो वगैरे लोकांनीं मुख्य प्रधानकीचें काम केलें परंतु ते केवळ नामधारी प्रधान होते. सर्व कारभार यांच्याच तंत्रानें चालत होता.

यांनीं रशियाबरोबर स्नेहभाव वाढविण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम उलटच झाला. फ्रान्स व रशिया यांच्यातला स्नेहभाव वाढतच होता. तथापि १८८९ मध्यें रशियाचे झार बार्लिनला आले होते व १८९० सालीं कैसरही रशियांत जाऊन आले. १८९१ त झालेल्या गुप्त भेटींत परस्परांच्या शिथील वर्तनानें या भावी आशेवर पाणी पडलें. यानंतर कैसर स्नेहभाव

वाढविण्याकरितां जर्मनीच्या सर्व मांडलीक राजांकडे आणि आस्त्रिया, हंगेरी, इटाली या राज्यांच्या मुलाखतीसही जाऊन आले. तसेंच आसपासच्या सर्व देशांतही पण जाऊन आले. आसपासच्या सर्व देशांत जाऊन, जर्मनीच्या नवयुगाचे जनक आपण असल्याचें भासविण्याचा यांनीं पुष्कळ प्रयत्न केला. अशा रीतीनें हलके हलके सर्व युरोपभर आपल्या प्रभावाची छाप बसून राज्यकारभारांत सर्व ठिकाणीं जर्मनीला मान्यता मिळावी असा यांना हेतू होता. १८९८ सालीं युनानची राजधानी कुस्तुनतुनिया येथें हे गेले. यांच्या या जाण्यानें युरोपांतल्या सर्व राजे लोकांना यांचा फार राग आला. कारण नुकताच तेथील सुलतान अबदुल हमीद यानें आर्मिनियनच्या अनेक रहिवाशांचा निष्कारण वध करविला होता; आणि युरोपांतल्या इतर सर्व जातींप्रमाणें ईसाई मतावर यांचा विश्वास होता. सुलतानाच्या या अनुचित अत्याचारामुळें त्याच्याविरुद्ध युरोपांतले सर्व राजे होते; व त्यावेळेस कैसरला त्याच्याशीं स्नेहभाव संपादन करतांना पाहून सर्वांना यांचा राग येणें स्वाभाविक होतें. हे आपणांस ईसाई राज्याचा नेता म्हणवीत होते व अशा स्थितींत ईसाई मतावलंबी आर्मिनियांचा संहार करणाऱ्या सुलतानाशीं यांनीं स्नेहभाव ठेवणें हें यांच्या मोठेपणास न शोभण्यासारखें होतें.

पौर्वात्य देशांतही आपला प्रभाव गाजवावा अशी यांची इच्छा होती; आणि त्यासाठीं उचितानुचित विचार सोडून देऊन

हे युनानमध्यें गेले. या सफरींत त्यांनीं ग्रीस व तुर्क या दोघां राज्यांची भेट घेतली. तेथें जाण्याचा यांचा उद्देश केवळ राज्यविषयक नसून यांना तेथील माणसें व पदार्थ फार आवडत होते यामुळें त्यांना आपली इच्छा दाबून ठेवतां आली नाहीं ह्मणून जावें लागलें. या सफरीहून आल्यानंतर यांचे नांव 'डर रीज कैसर' असें पडलें. यानंतर हे नार्वे देशांतही जाऊन आले.

सन १८८८ मध्यें जर्मनींतील लोकमत इंग्लंडच्या विरुद्ध होतें. हें वैमनस्य नाहींसें करण्याकरितां हे १८८९ मध्यें इंग्लंडला गेले. यापुढें सतत सहा वर्षेपर्यंत हे आपली आजी महाराणी व्हिक्टोरिया यांचेकडे जात येत होते. यामुळें इंग्लंड आणि जर्मनी यांत बराच स्नेहभाव वाढला आहे व तो पुढें बराच काळ टिकेल असा संभव दिसत होता. परंतु व्यापार विषयक बेबनावामुळें हा स्नेहभाव १८९५ पासून पुढें सारखा टिकला नाहीं आणि परस्परांवरील विश्वास उडत चालला. यावेळेस ट्रान्सवालमध्यें जेम्सनचा द्वेष सुरू झाला पण तो जागचेजागीं जिरल्यानंतर यांनीं तेथल्या प्रधानाला तारेनें कळविलें कीं, "आपण आपल्या चातुर्यानें इंग्लंड वगैरेची मदत घेतल्याशिवाय आपल्या येथें शांतता स्थापन करून आपली स्वतंत्रता कायम ठेविली ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे." यांच्या या अनुचित उत्साहाच्या संदेशानें इंग्लंडला बरेंचसें वाईट वाटलें व तेथील रहिवाशांचें मन यांच्याविषयीं कलुषित झालें. इकडे

जर्मन लोक यांच्या या कृत्यानें सुप्रसन्न झाले. १९०१ मध्यें महाराणी विक्टोरिया यांच्या अंत्यविधीसाठीं हे इंग्लंडला पुनः गेले व त्यावेळीं त्यांनीं इंग्लंडचे लोकमत अनुकूल बनविण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला पण तो व्यर्थ जाऊन, एकवार उत्पन्न झालेला संशय कमी न होतां तो कायमच राहिला! सन १९०२ मध्यें यांनीं राजकुमार हेनरी यांस अमेरिकेच्या संयुक्त राज्यांत पाठवून त्यांच्याशीं स्नेह संपादन करण्याचा प्रयत्न केला.

कैसरनीं जर्मनीला एक मुख्य आरमारी सामर्थ्याचें राष्ट्र बनविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. आरंभापासूनच याच गोष्टींत त्यांनीं मन घातलें होतें. सन १८९५ सालीं यांनीं स्वतः हा प्रश्न राजदरबारांत उपस्थित केला व तेव्हांपासून तेथील आरमारी सामर्थ्याची झपाट्यानें वाढ झाली. जर्मनलोक समुद्रावरील व्यापारांत मन घालीत नाहींत हें पाहून त्यांनीं ही योजना अमलांत आणिली. एकदां यांनीं असें म्हटलें होतें कीं; " लक्ष्यांत ठेवा, आपली भावी उन्नति अवनति या समुद्रावर अवलंबून आहे. " दुसऱ्या एका वेळेस यांनीं आपल्या भावाला निरोप पाठविला कीं; " आरमाराइतकें सैन्यबल उत्तम तयार होईपावेतों आह्मी मुळींच विश्रांति घेणार नाहींत. " आपल्या अंतरांतला गुप्तभाव छपविण्यासाठीं असें ह्मणत होते कीं; " आरमार व सैन्य यांची सुधारणा फक्त जगभर शांती स्थापण्याकरितां व पौर्वात्य देशांचा पराभव करण्याकरितांच करण्यांत येत आहे. "

आपल्या या अंतर्भूत गुप्तभावाला छपवून ठेवून वरकांती स्नेहभाव दाखवून सर्व जगाला धोक्यांत घालण्याचा यांचा हा प्रयत्न किती वर्षें चालूं होता; याचा अंदाज करणें शक्य नाहीं. वास्तविक जर्मनीचा उद्देश काय आहे याचें ज्यांना ज्ञान होत नव्हतें व ज्यांची अशी समजूत होती कीं, सभ्यजर्मनीची भरभराट व सामर्थ्य जगांत शांतता स्थापित करण्याकरितांच आहे; व पुढेंही राहील ते यांच्या सैन्यबळाच्या वाढत्या उद्योगाला दोष देत नव्हते. त्या यत्नांला ते लढण्याचें सामान जमविण्याचा हेतू समजत होते. त्यांच्या विचारकोटींत आजचें महाभारत क्वचितच येत असेल ! येथर्दे मात्र होते कीं, एकदां कैसरनींसुद्धां ह्मटलें होतें कीं; "जर्मनीचें समुद्रावर फिरणारें प्रत्येक जहाज शांततेचें एक निश्चयात्मक दर्शक आहे." अशा प्रकारच्या उक्ति, भाषणें, व्याख्यानें व प्रतिज्ञा यांच्या पांघरुणाखालीं कैसर आपला गुप्तभाव छपवीत होते. ज्या देशांशीं भयंकर शत्रुत्व संपादन करण्याचा मनाशीं विचार करीत होते त्या देशांबरोबर वरकांती स्नेहभाव वाढवीत होते. आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासून ज्या इंग्लंड, रशिया, स्पेन, बेलजियम इत्यादि राष्ट्रांबरोबर स्नेहभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत होते; त्यांच्याशींच लढण्यास आज हे कंबर कसून तयार आहेत ! या गोष्टीचा विचार करितां यांचा सर्व पहिला कावा पैशाचिक हास्याचा निदर्शक होय !

रोमच्या पवित्र राजाप्रमाणें हे आपणालाही स्वत्वविशिष्ट-आप्त जर्मन सम्राट समजतात. वस्तुतः जर्मनदेश अकुंचित व परिमित आहे. राजसत्ताक पद्धति तेथें मुळींच नाही. तथापि कैसर आपलाच हुकूम चालवितात व दुसऱ्या कोणाचेंही ऐकत नाहींत. राज्याच्या मंत्रीमंडळांच्या सल्ल्यानें यांना जर्मनीचे महाराज अशी पदवी मिळाली; परंतु यांचे विचारांत व भाषणांत असें दिसून येतें कीं, जणूं काय हे ईश्वरप्रेषित असून यांचा हुकूम सर्वमान्य व्हावयास पाहिजे. ता. २५ ऑगस्ट १९१० रोजीं यांनीं आपल्या भाषणांत ह्मटलें होतें कीं; “ आह्मी आपणाला परमेश्वराचे दूत समजतों आणि म्हणून इतरांच्या विचारास व सल्ल्यास आह्मी मुळींच किंमत देत नाही. ” राज्यकारभारविषयक व इतर बाबतींतल्या सर्व कामांत आपलाच हुकूम चालला पाहिजे; याविषयीं यांचा विशेष अट्टहास असतो व ह्यामुळें कधीं कधीं अनेक महत्वाचीं कामें बिघडून जातात !

स्वातंत्र्यप्रिय व त्यांतल्या त्यांत समिष्टवादी जर्मन लोक कैसर यांच्या या कुतर्कपूर्ण कल्पनांनीं चिडून जातात व त्यांच्यांत आणि यांच्यांत नेहमीं कांहीं ना कांहीं तरी खटका उडतच असतो. कधीं कधीं एखादी गोष्ट अगदीं निकारावर आली म्हणजे त्या शोचनीय अवस्थेला निर्दाळण्याचें काम यांना व यांच्या मुख्य प्रधानांना मोठ्या संकटानें करावें लागतें. ज्या विचित्र विश्वासाच्या जोरावर

हे आपले प्रजेला अगदीं मुठींत ठेवण्याचा उद्योग करित असतात. तो आतां निरर्थक बनला आहे; व या विसाव्या शतकांत त्याचा कांहीं सुद्धां उपयोग होत नाहीं. तरी पण एका बाजूनें हे आपला दुराग्रह तर दुसऱ्या बाजूनीं जर्मन लोक आपली अविच्छिन्न स्वतंत्रता कायम राहण्यासाठीं सारखे प्रयत्न करीत असतात. अशा स्थितींत आपल्या प्रजेला उदासीन तर कधीं कधीं भांडतांना पाहून हे आपल्या आवडत्या सैन्यविषयक बाबतीकडे वळतात. आपल्या अपरिमित अधिकारासंबंधींच्या यांच्या असंभवनीय कल्पनाच जर्मनांच्या असंतोषाच्या अंशतः कारण झालेल्या असतात; व हे जोपर्यंत आपल्या त्या असंभवनीय कल्पना अजिबात टाकून देणार नाहींत तोपर्यंत ही विरुद्धताही जशीच्या तशीच कायम रहाणार यांत संशय नाहीं.

यांनीं आपल्या अनेक व्याख्यानांत ह्मटलें आहे कीं; "जर्मनीला जगांत विशेष उद्देश्य साधावयाचें आहे व तेवढ्यासाठींच परमेश्वरानें मला कैसर बनविलें आहे." यांना वाटतें कीं; जर्मन जातीच्या साहाय्यानेंच सर्व जगाचें संरक्षण होत आहे (!) आणि म्हणून त्यांचा केव्हांही अपमान होता कामा नये. रोमच्या राजकीय प्रभावाप्रमाणेंच जगभर जर्मनीयता फैलावली पाहिजे; असें यांचें म्हणणें आहे !

आपल्याच राज्यांतल्या खटपटी करून यांना संतोष वाटत नाहीं. अन्य देशांतल्या कित्येक बाबींसंबधीं आपलें मत दाखविण्याचा हे शक्य तेथवर प्रयत्न करीत असतात. कधीं कधीं परदेशीय सैनिकांना पदव्यासुद्धां हे देतात. १९०६ मध्यें अल्जेसीरियन लोकांच्या सभेनंतर यांनीं तेथील विदेश-विभागाच्या प्रधानाच्या नांवें एक तार दिली. तिचा परिणाम असा झाला कीं, त्याला आपल्या कामाचा राजिनामा द्यावा लागला ! सन १९०५ मध्यें यांनीं जपानचे सेनापति ' नोगी ' यांना आपल्या येथील एक सैनिकाची पदवी दिली. पण तेवढयानेंच यांचें समाधान न होतां त्यांनीं तीच पदवी अर्थर बंदराच्या संरक्षणार्थ असलेल्या रूसचे सेनापति स्टॉसेल यांना ही दिली ! सेनापति नोगी व स्टॉसेल यांचें परस्परांशीं किती वैमनस्य आहे हें कांहीं नव्यानें सांगावयास नको. या गोष्टीनें कैसरला कदाचित आनंदही झाला असेल पण या विवेकशून्य केलेल्या सन्मानानें दोघांच्या मनांत परस्पराविषयीं केवढें वितुष्ट आले असेल तें त्यांचे त्यांनाच माहीत. सन १९०२ सालीं बवेरियाच्या मंत्रीमंडळापुढें एका सभासदानें शिल्पशास्त्राच्या उन्नतीप्रित्यर्थ ७५००० रुपये खर्ची घालण्याविषयीं सूचना पुढें मांडली होती. ती बहुमतानें नापसंत ठरून तिला नकारात्मक उत्तर मिळालें ! यानंतर कैसरनीं तेथील सभेच्या अध्यक्षांच्या नांवें संदेश पाठविला त्यांत तेथील सभासदांची निंदा करून सूचना केली होती कीं; मी

तो खर्च आपल्या पदरचा देतों ! शिल्पशास्त्राच्या उन्नतीप्रित्यर्थ मदत करण्याचा यांचा उद्देश निःसंशय स्तुत्य होता; परंतु यांचें विधान सर्व थैव दूषणीय होतें. कारण ज्या अर्थी बवेरियाच्या मंत्रीसभेशीं यांचा अर्थाअर्थी मुळींच संबंध नाहीं व तेथील सभासद व अध्यक्ष स्वतंत्ररित्या आपापलें काम करीत आहेत; त्या अर्थी त्यांच्या कामांत अशा रीतींनें अनुचित ढवळाढवळ करणें कोणालाही न रुचणें साहजिक आहे. कैसरच्या अशा निष्कारण ढवळाढवळ करण्याच्या वाईट संवयीनें जर्मनींतील समिष्टवादी लोक नेहमीं असंतुष्ट असतात. राज्यकारभार व तद्विषयक अधिकार याशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टींत यांनीं हात घालणें सर्वथैव अनुचित व निंद्य आहे असें त्या लोकांचे मत आहे.

नवंबर १९०७ मध्यें कैसर पुनः इंग्लंडला गेल्यावेळीं सर्वांना वाटत होतें कीं; आतां या उभय राष्ट्रांमधील स्नेहभावांत कांहीं तरी उन्नति होईल; पण प्रकार विपरितच झाला. त्याचा खुलासा १९०८ सालीं असा करण्यांत आला कीं; कैसरनीं सर्व प्रकारें विश्वास दाख-विल्यावरून इंग्लंडच्या एका प्रधानानें, आरमारासंबंधीं नवीन व्यव-स्थेच्या कांहीं सूचनांचा खर्डा, पार्लमेंटच्या इतर सभासदांकडे, बैठक होण्याच्या अगोदरच पाठविला होता. त्यावरून दोन्ही देशांत बऱ्याच भानगडी उपस्थित झाल्या. जर्मनीचे लोकही आपल्या कैसरवर फार रागावले व त्यामुळें इंग्लंडच्या प्रेमभावाला बट्टा

लागला. हा असंतोष दूर करण्याकरितां यांनीं अनेक उपाय केले पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. त्यावर्षीं यांनीं आपल्या भाषणांत व व्याख्यानांत बोलून दाखविलें कीं; "जर्मनींत होणारी युद्धविषयक साहित्याची तयारी इंग्लंडशीं लढण्याकरितां नसून, इंग्लंडशीं सामील होऊन पौर्वात्य राष्ट्रांवर विजय मिळविण्याकरितांच आहे, व ती तशींच चालूं राहील." यावरून यांचें लक्ष्य जपानवर असल्याचें स्पष्ट दिसत होतें. यांच्या या भयानक सूचनेनें इंग्लंड, रूस, फ्रान्स, जपान व स्वतः जर्मनी या सर्व देशांत मोठी खळबळ उडाली; व त्या सर्वांनीं यांच्या या अनर्थपूर्ण विचारांचें खंडण केलें. कारण असें झाल्यानें जगांत नांवालासुद्धां स्नेहभाव राहणें शक्य नव्हतें. त्यावर्षीं कैसरनीं आपल्या या विचाराच्या पुष्टिकरणार्थ मंत्रीमंडळाशीं बराच वादविवाद केला पण व्यर्थ गेला. नंतर दोन वर्षेपर्यंत ह्यांनीं मौन धारण केलें. यांच्यासारखा कूटनीतिचा सूत्रधार कधीं तरी स्वस्थ बसेल काय ? सन १९१० पासून यांनीं फिरून आपल्या असंभवी कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यास सुरुवात केली; आणि त्याचा शेवट सांप्रतच्या युरोपीय अभूतपूर्व महाभारतांत झाला. या महाभारताचे हे जनक बनून त्यांनीं त्यांत डोळे झांकून उडी घेतली !

## ५ कैसरीन आणि कैसर.

कैसरीनबाईंचें नांव ऑगस्ट विक्टोरिया आहे. ह्या कैसरहून एक वर्षानें वडील आहेत. यांचा जन्म सन १८५८ मध्यें झाला. यांचे वडील ऑस्टेनबर्ग येथील एक जमीनदार होते; परंतु हे नामधारीच इनामदार होते. यांच्याजवळ संपत्ति बेताचीच होती. शेलसवीग हॉलस्टीनच्या इनामदारीवर यांचा हक्क होता पण प्रश्याचे राजानें तो मुलुख आपल्या राज्यांत सामीलकरून घेतल्यामुळें यांच्या कायदेशीर हक्कासंबधानें नेहमीं तंटे उपस्थित होत असत. ऑस्टेनबर्गचे जमीनदार राजकुमार फ्रेडरिक जेव्हां युद्ध करतील तेव्हांच आपल्या या हिसकावून घेतलेल्या जमीनदारीचा आपल्याला पुनः लाभ होईल असें यांना वाटत होतें. या कारणामुळें त्यांनीं हल्लींच्या कैसरचे आजे राजनीतिनिपूण विलियम यांजकडे खटपट करण्यास सुरुवात केली. त्यांनीं त्यांस सांगितलें कीं तुम्ही जर शेलसवीग हॉल्स्टनच्या जमीनदारीचा हक्क आमचे नांवें करून देत असाल तर मी तुमच्या मुलीबरोबर माझ्या नातवाचें लग्न लावून देईन; व तुम्हांला तहाहयात २५५००० ची नक्त नेमणूक करून देईन. ऑस्टेनबर्गच्या जमीनदारांनीं हें त्यांचें म्हणणें मान्य केलें व तसा करार करून दिला. नंतर फेब्रुवारी १८८१ मध्यें हल्लींच्या कैसरबरोबर ऑगस्ट विक्टोरिया यांचा विवाह झाला.

सामान्य जमीनदाराच्या वंशांत जन्म झाल्यामुळें कैसरीन-बाईंना आपल्या पतीचा बराच धाक बाळगावा लागतो. नाहीं तरी कैसर तसे दांडगे आहेतच. आपल्याबरोबर लग्न झाल्यामुळेंच एका सामान्य जमीनदाराच्या मुलीला महाराणी होण्याचें भाग्य प्राप्त झालें. ह्या विचारानें कैसर फुगुन जाऊन ते कैसरीनबाईंना मनास येईल तसें वागवितात. कैसरीनबाईंना आपल्या पूर्वींच्या व हल्लींच्या स्थित्यंतराच्या विचारानें कैसरच्यापुढें बोलण्याचें मुळींच धैर्य होत नाहीं. एखाद्या वेळेस कैसर आंब्याला चिंच म्हणत असलें तर ह्याही भीतीनें त्याला चिंचच म्हणतात. तसें पाहिलें तर महाराणी ऑगस्ट व्हिक्टोरियाच्या अंगीं तेजस्विता बरीच आहे; पण केवळ त्या वरील विचाराच्या दाबामुळें त्यांना, कैसर एखादें अनुचित कर्म करीत असले तरी त्यांना अडथळा करण्यास त्या धजत नाहींत. पहिल्या पहिल्यानें तर त्या अशा गोष्टी मनांवरच घेत नसत. पण एखादे प्रसंगीं कांहीं बोलावेंच लागलें तर कांहीं तरी 'हो' स 'हो' म्हणून वेळ मारून नेत असत. कधीं कधीं याजकडे दुःखी स्त्रिया आपल्या दुर्दैवाची कहाणी सांगावयास आल्या तर त्यांना निराश होऊन जावें लागतें. कारण यांना कैसर आपलें ह्मणणें मान्य करतील असा भरंवसाच नसतो. कैसरीनबाई आपल्या पतीवर जितकें प्रेम करितात तितक्याच त्या त्यांना भितात. एका बाजूनें कैसर त्यांना आपल्या प्रबल इच्छेनें, विचित्र विचारानें व अद्भुत विल-

क्षणपणानें, आपल्या कह्यांत ठेवूं पहातात तर इकडे कैसरीनबाई आपल्या पतिला नेहमीं प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात ! एखाद्या कामानिमित्त कैसरना बाहेर रहावयाचा प्रसंग आला असतां ते त्यांना विचारीत असतात. त्याचप्रमाणें बऱ्यावाईट गोष्टींसंबंधीं ऊहापोह चालला असतां कैसरीनबाई आपल्या पतिच्या 'हो' स 'हो' ठोकून देऊन मोकळ्या होतात !

कोणी प्रेम जिंकितो तर कोणी प्रेमप्रवाहांत वाहवतो. कोणाला दुसऱ्याला प्रेमपाशांत अडकविणें आवडतें, तर कोणाला प्रेमप्रवाहाच्या ओघांत वाहत जाणें आवडतें. साधारणतः जो मनुष्य आपल्या प्रेमपाशांत दुसऱ्याला जखडून टाकतो तो प्रेम जिंकितो. व जो त्या प्रेमांत पडतो तो त्याच्या ओघांत वहात जातो. या दोन प्रकारांपैकीं पहिला प्रकार स्वाभाविक, उचित व सुखपूर्ण आहे व दुसरा उद्दंड, अनुचित व दुःखपूर्ण आहे. जो मनुष्य आत्मसंयमन करतो तो प्रायः पहिल्या प्रकारच्या प्रेमाचा स्वीकार करितो. स्वभावतःच उद्दंड मनुष्य सामान्यतः दुसऱ्या प्रकारच्या प्रेमाच्या हातीं आपलें भाग्य सोंपवितो. प्रेम जिंकणाऱ्या मनुष्याला मोठमोठ्या कठीण प्रसंगांतून निभावून निघावें लागतें व त्याकरितां नेहमीं सावधपणानें वागावें लागतें. दुसऱ्या प्रकाराविषयीं काय वर्णन करावें ? ते डोळे मिटून प्रवाहांत उडी घेतात व त्याच्या ओघा-

बरोबर वहात जातात ! पहिल्या प्रकारच्या प्रेमाचें क्षेत्र पवित्र विवेकाचे सहाय्यानें वाढतें तर दुसऱ्याचें अविवेकाच्या मदतीनें वाढतें !!

कैसरचा विवाह झाल्यानंतर ५-६ वर्षांनीं ते प्रेमप्रवाहांत पडले. कित्येक दिवसपर्यंत ते राजवाड्यांतल्या नाटकशाळांच्या सौंदर्यसागरांत गटंकळ्या खात होते. एकीच्या प्रेमाची परमावधि ती दुसरीच्या हृदयव्यथेची परिसीमा; एकीचें सुख तें दुसरीचें दुःख; एकीची शांति ती दुसरीची हृदय जाळणारी भयंकर ज्वाला; व एकीची मनधरणी ते दुसरीचें प्रत्यक्ष मरण. युवति महाराणीच्या बाबतींतही मोठी दुःसह आपत्ति होती. ती मनांतल्या मनांत सारखी झुरत असे. पत्नी वाटेल तशी सामान्य स्त्री असली तरी तिला, आपल्या पतिप्रेमांत दुसरी कोणीही सुंदरी वांटेकरीण झाल्यास, मुळींच खपावयाचें नाहीं. तो अपमान, तें दुःख, तो अनादर व तो वज्राघात तिला अति दुःसह व्हावयाचा. अशा स्थितींत ती मरूनच जावयाची; परंतु जिवंत रहाण्याची आशा कोणास सुटली आहे ? कैसरीनबाई कधीं कधीं आपल्या मनाशींच दुःख करीत असतात कीं, केवळ मुलें होण्यासाठींच मी जर्मनीची महाराणी बनल्यें काय ? माझ्यांत काय वैगुण्य आहे ? मला सौंदर्य नाहीं; कां माझ्यांत प्रेम नाहीं ? कां मला सुखी व्हावें अशी इच्छा नाहीं ? मग असें कां असावें बरें ?

कधीं कधीं कैसर आपल्या पत्निला एखाद्या सुंदर युवतीचा फोटो दाखवून तिचें रूप तुला कसें काय आवडतें असें विचारितात.

हे आपल्या समजुतीनें हा विनोद मानितात; पण कैसरीनबाईंना त्यायोगें अति दुःख होतें. आपल्या पतीच्या तोंडून दुसऱ्या स्त्रीच्या सौंदर्याची प्रशंसा ऐकून त्यांना अतिशय वाईट वाटतें. राजवाड्यांत होणाऱ्या भोजनसभारंभाच्या वेळीं निमंत्रण केलेल्या सुंदर युवतींच्या समक्ष कैसर आपल्या पत्निला झिडकारून टाकितात. अशा वेळीं त्या बिचारीच्या हृदयाला प्रेम व अपमान या दोन विकारांच्या ज्वाळांनीं चटके बसत असतात. अशा वेळीं त्या उभयतांमध्यें क्वचितच भाषण होतें. कैसर बळेंच बोलावयास लागलें तर ह्या तात्पुरत्या उत्तरानें वेळ मारून नेतात. जेवतांना कैसरीनबाईंनीं यांना कांहीं विचारलें तर हे असा चमत्कारिक जबाब देतात कीं, त्यावर बोलण्याचें कैसरीनबाईंना धैर्यच होत नाहीं; अगर उत्तर ऐकलें न ऐकलेसें करून त्या विषयच बदलतात. तसेंच दुसऱ्यासमक्ष होणाऱ्या आपल्या उपहासानें त्यांना फार वाईट वाटून आतां कांहीं तरी सणसणीत उत्तर देऊन मोकळें व्हावें असेंही कधीं कधीं यांना वाटतें; पण ह्या मनाला दाबून ठेवतात व वरकांतीं तोंडापुरतें बोलून वेळ निभावून नेतात.

कैसरबरोबर गप्पागोष्टी करणाऱ्या सुंदर स्त्रियांचा कैसरीन-बाईंना फार तिरस्कार वाटतो. त्यांच्यासंबंधीं यांच्या मनांत नेहमीं असें वाटत असतें कीं, कशानें तरी ह्या राजवाड्यांत येण्याच्या बंद होवोत; परंतु यांचे कांहीं चालत नाहीं. या सर्व स्त्रिया त्यांच्या

नेत्रांत अगदीं खुपतात; व त्यांपैकीं एखादी भोजन समारंभास न आली तर यांना तेवढेंच जरा बरें वाटतें. एकदां अशा एका स्त्रीनें चिठी पाठविली कीं, ' आज सायंकाळीं मला कांहीं कारणामुळें भोजन समारंभास हजर रहातां येणार नाहीं; तरी त्याबद्दल माफी असावी. ' तेव्हां यांनीं मोठ्या आनंदानें म्हटलें:—' मी मोठ्या आनंदानें क्षमा करित्यें व इच्छितें कीं, अशा सर्वच स्त्रिया माझ्या वाड्यांत कधींही न येवोत. ' हें ऐकून त्यांच्या परिचारिकेनें त्यास म्हटलें; ' बाईसाहेब, असें कां म्हणतां ? ' कैसरीनबाई म्हणाल्या हें पहा, तूंही स्त्रीच आहेस व तुलाही हृदय आहे. जरी मी कैसरीन आहे तरी माझी अशी इच्छा असतें कीं, मीही थोडा वेळ मी आपल्या पतिबरोबर एकांतांत बसून दोन गप्पागोष्टी करीन. '

कैसरीन बाईचें असें म्हणण्याचें कारण असें होतें कीं; ह्या विलासनी कैसरबरोबर नेहमीं असावयाच्याच. त्यामुळें त्यांना यांच्याशीं मोकळ्या मनानें प्रेमाचे दोन शब्द बोलण्यास फुरसतच मिळत नसे. महाराणीला नेहमीं काळजीहि होती कीं, जर एकदां तरी मला आपल्या पतिबरोबर एकांतांत अगर त्याचेसह आपल्या मुलांबाळांबरोबर भोजन करण्याचा सुयोग लाभेल तर मला जन्माचें सुख एकदांच मिळालें असें मी मानीन. तसें पाहिलें तर नेहमीं भोजनाच्या वेळेस बाहेरच्या स्त्रिया आणि पुरुष राजवाड्यांत यावयाचेच व त्यामुळें यांच्या या आशेवर पाणी पडावयाचें. जगांत ज्याला

केसरचें मनश्चित्र !

अद्‌भूत कौटुंबिक सुख म्हटलें आहे तें केसरीनबाईच्या नशिबांत क्वचितच लिहिलेलें आहे. त्या नेहमीं त्या सुखाची इच्छा बाळगून असतात; पण त्यांची निराशाच होत असते. या गृहस्थाश्रमीच्या सुखासाठीं झुरतात; तर तिकडे केसरना आपल्या विनोदी व कौतुकाच्या गोष्टींपासून सुटका होत नाहीं ! जर हे उभयतां कांहीं वेळ तरी स्थिरतेनें एकत्र बसतील तर केसरीनबाईच्या मनीषा पूर्ण होतील; पण आकाशाला फूल येण्यासारखेंच हें घडावयाचें ! ! केसरचें आपल्या पत्निवर प्रेम आहे यांत संशय नाहीं, पण हे जेव्हां गप्पागोष्टींत गर्क होऊन दुसरीकडे रंगलेले असतात त्यावेळीं ते केसरीनबाईची मुळींच पर्वा बाळगीत नाहींत; आणि इकडे यांच्या हृदयाचे तुकडे तुकडे होत असतात !

एकदां दुपारच्या वेळेस केसर बाहेर फिरावयास निघाले, त्यावेळीं केसरीनबाईंना असें वाटलें कीं, ते मला ही बरोबर चलण्यास सांगतील; परंतु त्यांनीं यांना राजवाड्यांतच ठेविलें ! या गोष्टीनें केसरीनबाईंना अतिशय वाईट वाटलें; व त्या निजावयाच्या खोलींत जाऊन अंथरुणावर शोक करीत पडल्या इतक्यांत. खोलीबाहेर कोणाचींशीं पावलें वाजल्यावरून केसरीनबाईंना, आपले पति आपणास घेऊन जाण्यासाठीं परतले असावे असें वाटलें; व त्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्या चटकन वळून खोलीचे दार उघडण्यासाठीं तिकडे वळल्या. तों त्यांना दाराशीं केसरच्या ऐवजीं

आंत डोकावून पहात असलेला एक नोकर दिसला ! ! त्या दुःखानें निव्हल होऊन त्यांनीं किंकाळी फोडली व अंथरुणावर बेशुद्ध पडल्या. त्यांची ती किंकाळी ऐकून राजवाड्यांतलीं सर्व माणसें तेथें जमली. महाराणीच्या खोलींत कोण माणूस कसा गेला. याविषयीं सर्वांच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाले ! !

कैसरची अशी इच्छा असते कीं, ते व कैसरीनबाई एकत्र बसल्या असतां तेथें कोणीही नोकर येतां कामा नये. वास्तविक याचें कारण असें असतें कीं, जेव्हां हे दोघे एकांतांत असतात त्यावेळीं एखादी चपल सुंदरी परिचारिका कैसरच्या दृष्टिसमोरूनसुद्धां जाणें उपयोगीं नाहीं; असें कैसरीनबाईंना वाटतें. कारण त्यांना भीति वाटते कीं, कोणा सुंदर दासीला पाहतांच हे तिकडे वळले तर त्यांना तेवढ्यानेंसुद्धां राग येईल. यासाठीं कैसरीनबाईंची अशी इच्छा असते कीं, आपणा उभयतांच्या एकांतसमयीं कोणीही दासी तेथें फिरकतां कामा नये. कैसरही अशा वेळीं सर्व नौकरांवर मोठी करडी नजर ठेवितात.

कैसर परत आल्यावर त्यांना जेव्हां कळलें कीं, महाराणीच्या खोलींत कोणी नोकर डोकावून पहात होता; तेव्हां त्यांनीं असा हुकूम दिला कीं, कोणाही सेवकानें कोणत्याही कारणास्तव महाराणीच्या महालाकडे फिरकतां देखील कामा नये; आणि तेथील सर्व कामें महाराणीच्या दासींनींच केलीं पाहिजेत ! आतां तर

## कैसरचें मनश्चित्र !

त्या सर्व दासींवर मोठेंच संकट येऊन कोसळलें. आतांपर्यंत श्रमाच्या कामांत नोकरलोक त्यांना सहाय्य करीत असत पण आतां त्यांना अजिबात मना केलें; व त्यामुळें कैसरीनबाईच्या कोमल दासींवर सर्व कामांचा बोजा येऊन पडला. येवढ्यानेंच भागतें तरी हरकत नव्हती; पण ज्यावेळीं स्वतः कैसर आपल्या निजावयाच्या खोलींत असतात व महाराणी आपल्या दासींना तेथें येण्याचीसुद्धां बंदी करतात तेव्हां त्यांना कधीं कधीं थंडीनिवारणार्थ स्वतःच शेगडी पेटविण्याचा प्रसंग येतो ! धन्य भाग्य ! कोठें कैसरीनबाई आणि त्यांना थंडींत रात्रीं उठून शेगडी पेटविण्याचें काम करणें भाग पडावें ? पण मनुष्यांची विचित्रता त्यांना सर्व कांहीं करावयास लावते.

कधीं कधीं कैसरीनबाई व कैसर बरोबरच बाहेर फिरावयास निघतात; पण त्यावेळीं चपळाईनें महाराणी तयार होऊन आल्या तर ठीक जमतें. जर त्यांना थोडासा देखील उशीर असला तर कैसर त्यांची वाट न पाहतां आपल्या घोड्यावर स्वार होऊन चालावयास लागतात. बॅरं चालतांना तरी घोडा हळुहळु चालवून महाराणींना येऊं देतील तर तेंही नाहीं. तितक्यांत जर कोणी यांना महाराणी येणार असल्याचें स्मरण दिलें तर हे उत्तर देतात कीं, ‘ त्यांच्याबरोबर त्यांच्या दासी वेगळ्या आहेत. मला त्यांच्यासाठीं थांबण्याची कांहीं जरूर नाहीं ! ’

## कैसरीन आणि कैसर.

एकदां सैन्याची कवायत होत होती. त्यांत कैसरीनबाईही आपल्या सैनिकवेषांत तेथें हजर होत्या. त्यांना जर्मनींतील कांहीं सैन्याच्या अधिपतीची पदवी देण्यांत आली होती. स्वत: कैसर मूर्तिमंत सैनिक आहेत मग ते आपल्या पत्निला सैनिक बनविल्याशिवाय थोडेच रहाणार आहेत ! तेथें त्यांनीं महाराणीच्या पोषाकाकडे जरा बारीक दृष्टीनें पाहिलें तों त्यांत त्यांना अर्पण केलेलें सन्मानसूचक पदक दिसून आलें नाहीं. येवढयावरूनच यांची मर्जी खप्पा होऊन त्यांनीं ह्मटलें:--

" कां ? तुह्मी त्या मूल्यवान पदकाचें काय केलेंत ? तुह्मीं तें यावेळेस पोषाकावर लावणें जरूर होतें ! जर अशा रीतीनें तुह्मी असल्या वस्तुला घालवून बसाल तर एखादें वेळेस तुम्हांला आपल्या मुकुटावरील अमूल्य रत्नांलाही मुकावें लागेल. समजलांत ? ' '

वरील शब्द कैसरनीं आपल्या पत्निला तेथें हजर असलेल्या सर्व शिपायांदेखत उच्चारले. साधारणत: एखादा साधा मनुष्य देखील आपल्या पत्निला दुसऱ्यांच्या समक्ष असलें कठोर शब्द बोलणार नाहीं ! !

आक्टोबर १८९० मध्यें हें राजकीय दंपत्य संध्याकाळीं हरणाच्या शिकारीस गेलें. कैसर आपल्या शिकारीच्या आवडत्या शिकारी पोषाकांत होते व कैसरीनबाई रुपेरी मोठ्या कांठाचें वस्त्र नेसलेल्या होत्या. महाराजांच्या मनांत असा बेत होता कीं; आज

बऱ्याच हरिणांची शिकार करूं. तीन तासपर्यंत त्यांनीं पुष्कळ खटपट केली; पण हातीं कांहीं लागलें नाहीं. तेव्हां हे निराश होऊन परत जावयास निघाले इतक्यांत एक म्हातारा शिकारी तेथें आला व आश्चर्यानें कैसरीनबाईच्या कपड्यांकडे पाहूं लागला. त्यास कैसरनें म्हटलें:-- ' कांहो, इतका वेळ मेहनत करूनही मला हरीण कां सांपडलें नाहीं हें तुम्हांला सांगतां येईल काय ? ' त्यावर तो म्हणाला ' महाराज ! याचें कारण उघड आहे ! पांढऱ्या रंगाचें कपडे पाहून हरणें भडकतात; हें लहान मुलांनासुद्धां माहीत आहे. ' तें ऐकतांच कैसरनीं आपल्या पत्निला आपादमस्तक पाहिलें व म्हटलें:-- ' ह्या ! आपणच आज आमच्या हरणाला घालवून दिलेंत बरें कां ! ! ' हे शब्द त्यांचा राग व्यक्त करीत होते. इतकेंच नव्हे तर त्या रात्रीं कैसरनीं, कैसरीनबाईबरोबर जेवण केलें नाहीं. थोडक्याशा गोष्टीवरून आपल्या पत्नीवर इतकें रागावणें त्यांच्या-सारख्यांना शोभत नाहीं. महाराणी आपल्या हातून नकळत घड-लेल्या गोष्टीनें फार दुःखी झाल्या व आपल्या पतिप्रमाणें शिकारी पोषाक तयार करवून घेईपावेतों त्यांना चैन पडलें नाहीं. पहा ! यांच्या बाजूनें इतकें प्रेम तर कैसरच्या बाजूनें इतका रुक्षपणा ! ! !

कैसरचा स्वभावच मोठा विलक्षण आहे. राजधानींतून बाहेर-गांवीं गेल्यावर ते कैसरीनबाईंना पत्र देखील पाठवीत नाहींत. दोन दिवस बाहेर जावोत किंवा महिनाभर जावोत पत्राचें म्हणून नांव

नाहीं. स्वतः होऊन पाठविणें नाहीं तर नाहीं पण आलेल्या पत्राचें उत्तरसुद्धां देण्याचें त्यांच्या जीवावर येतें ! पत्र लिहिणें व त्याचें उत्तर देणें ह्या दोन्ही गोष्टी त्यांच्या मतें अनुचित आहेत. कैसरीनबाईंना मात्र पत्र लिहिल्यावांचून रहावत नाहीं. त्या सारखीं पत्रें पाठवीत असतात; पण एक पत्राचें तरी उत्तर देतील तर मग ते कैसर कसले ? याप्रमाणें हे पत्राचे उत्तर देत नसल्यामुळें पत्रांचीं उत्तरें लिहिण्याचें काम, त्यांच्याबरोबर असलेले मंत्री करितात. ते पत्र लिहून महाराजांचा मुक्काम कोठें आहे; कोठें जाणार; शिकार किती मिळाली वगैरे मजकूर कैसरीनबाईंना कळवितात. त्याच्याखालीं त्यांचीच सही असते. कैसर बाहेर असतांना त्यांचा कैसरीनबाईशीं जो काय पत्रव्यवहार व्हावयाचा तो सर्व मंत्र्यांच्या मार्फत व्हावयाचा. आपलें स्वतःचें पत्र न गेले तर आपल्या पत्निला किती दुःख होत असेल याची त्यांना किंचित्सुद्धां काळजी वाटत नाहीं.

कैसरप्रमाणेंच कैसरीनबाईंनाही वाटतें कीं, मला खुद्द परमेश्वरानेंच या उच्च पदावर बसविलें आहे आणि तेवढ्याचकरितां कोणीही दुसरी स्त्री कोणत्याच बाबतींत माझ्याशीं प्रतिस्पर्धा करून मला जिंकू शकणार नाहीं. तरी पण एखादी स्त्री कांहीं बाबतींत वरचढ आहे असें त्यांना दिसून येतांच त्यांचा जीव फार तळमळतो. वास्तविक पहातां यांच्यांत कोमलपणा जरा कमी आहे. यांचें शरीर सुदृढ आहे व स्त्रियांच्या अंगीं असणारें सर्वसाधारण मार्दव

यांच्यांत नांवाचेंच आहे. प्रतिवर्षीं नाच होण्याचे वेळेस याही एक-दोन वेळां नाचतात. एक वेळ १८९३ मध्यें यांना नाचावयाचें होते. यांनीं पहिल्यापासूनच हुकूम दिला होता कीं, नाच होण्याच्या जागेच्या आजूबाजूस कोणीही बाहेरचा मनुष्य राहतां कामा नये व त्या जागेच्या चारी बाजूंनीं पडदे लावले पाहिजेत. पडदे लाव-ल्यानें हवा बंद होऊन नाचकाम करण्याची जागा अडचणीची होईल असें समजल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, तसें असेल तर पडदे सबंध न लावतां अर्धवट वरच्या बाजूनें हवा येण्यास जागा सोडावी व सर्व मनुष्यांस तेथून घालवून द्यावें. त्याप्रमाणें सर्व व्यवस्था कर-ण्यांत आली. यांच्या अगोदरच्या कैसरीनच्या नाचाच्या वेळीं पडद्याविषयीं इतका कडक बंदोबस्त कधींच होत नसल्यामुळें यांच्या या विशेष बंदोबस्तामुळें राजवाड्यांतल्या दासींना फार आश्चर्य वाटलें ! पण कैसरीनबाईंना नाचतांना पाहून त्यांचें कोडें उलगडलें. कारण त्यांना उत्तम नाचतां येत नसल्यामुळें प्रेक्षक लोक आपल्या नाचाला हंसतील या भीतिनें त्यांनीं ही तजवीज केली असावी. शरीरांत कोमलपणा असल्याशिवाय नाचकाम चांगलें होत नाहीं. यामुळें महाराणीला आपल्या साधारण नाचकामावरच संतुष्ट रहावें लागतें !

यांचा एक आवडता पोषाक आहे. तो घातला असतां यांच्या गळ्याखालचा कांहीं भाग थोडा उघडा रहातो. त्या पोषाकांत त्या

असतां जर त्यांच्याकडे कोणी चुकून पाहिलें तर कैसर त्यास देहान्त शिक्षा फर्मावितात ! त्यांना शिकारी पोषाकाची पण बरीच आवड आहे. त्या पोषाकांत आपण फार सुंदर दिसतो हें त्यांना ठाऊक आहे. म्हणून त्यांना तो पोषाक करून घोड्यावर बसून रपेट करण्यास जाणें आवडतें. प्रचलित वहिवाट पाळण्यासाठीं व आपल्या साहसाचे प्रदर्शन करण्यासाठीं या साधारणपणें घोड्यावरच बसून फिरावयास जात असतात. शारीरिकदृष्ट्या पाहतां यांना तसल्या पोषाकांत पाहिलें तर यांचे सौंदर्य कांहींसें खुलतें. जो घोडा उत्तम रीतीनें शिकविलेला व तरूण उमरीचा असेल त्यावरच या बसतात. घोड्यावर बसतेवेळेस त्या घोड्यास एखाद्या चबुतऱ्याशीं उभा करून मग त्यावर उडी मारून बसतात. एकदां अशाच झोंकांत त्या उडी मारून बसत असतां घोडा जाग्यावरून हलल्यामुळें या खालीं पडल्या. तें पाहून यांच्या बरोबर असलेल्या युवतींत बराच हंशा पिकला.

या घरांत बहुधा काळ्या रंगाचे कपडे वापरतात व डोकीस रेशमी इंग्रजी टोपी घालितात. या पोषाकानें त्यांचें सौंदर्य बरेंच कमी खुलतें. या कधीं कधीं आपल्या साध्या पोषाकांत पायींच फिरावयास निघतात; व बरोबर एकाददुसरी दासी असते. एकदां अशाच रितीनें या फिरावयास निघाल्या होत्या, इतक्यांत राजवाड्याच्या बाजूस जात असलेल्या पोस्टमनास पाहून त्यांस हाक

मारून या म्हणाल्या:—“ महाराजांचें एखादें पत्र आहे काय ? ” त्याजवर पोष्टमन म्हणाला, ‘ काय, तुम्ही ही मला वेड लावण्याच्या बेतांत आहां वाटतें; पण मी तसा कच्चा नाहीं. मी अशानें मुळींच फसरणार नाहीं. कैसरचें पत्र मी तुम्हांला देऊं? वा ! हे तुमचे मळकट खीसे त्या पत्राला मळकट करतील. जा, आपण आपल्या कामाला चला ! ’ यावर कैसरीन ह्मणाल्या:—‘ नाहीं, नाहीं. तुम्ही मला त्यांचें पत्र द्या. माझे पति याबद्दल तुम्हांला कांहीं सुद्धां म्हणणार नाहींत.’ पोस्टमन म्हणाला:—‘ वाहवा ! आपले पति ! तुम्ही तर त्यांचे पाय धुण्याच्यासुद्धां योग्यतेच्या नाहींत ! संभाळून बोला. नाहीं तर तुह्मांबद्दल त्यांजकडे जाऊन सांगून तुम्हांला तुरुंगांत पाठवीन. समजला ? ’

यावेळेस एका परिचारिकेनें पुढें होऊन त्या पोस्टमनास यांची ओळख करून दिली. या स्वतः कैसरीन आहेत असें समजल्यावर तो बिचारा घाबरून गेला व यांच्या पायांवर लोटांगण घेऊन क्षमा मागूं लागला. त्यांनीं त्याला अभय देऊन उठविलें व कांहीं इनामही देवविलें.

## ६ कैसर आणि राजकुमार.

जरी कैसरचें स्वास्थ जन्मापासूनच सामान्य आहे तरी ते आपलें शरीरस्वास्थ चांगलें रहाण्यासाठीं अहर्निश प्रयत्न करीत असतात. याशिवाय यांचा असाधारण सैनिक जीवनक्रम ही यांना त्या प्रयत्नांत बरीच मदत करीतो. इकडे कैसरीनबाईंची शरीरसंपत्ति स्वभावतःच सुदृढ व बलवान आहे. अशा स्थितींत या दोघांपासून सुसंपन्न संतति उत्पन्न व्हावी हे स्वाभाविक आहे. आपल्या मुलांबाळांना पाहतां हे राजदंपत्य आपणा स्वतःस मोठें भाग्यवान समजतें. एकंदरींत यांना सहा मुलगे व एक मुलगी आहे. त्यांचीं नांवें व जन्मसमय येणेंप्रमाणें:--

१ युवराज विलियम.-ता. ६ मे सन १८८२.
२ राजकुमार इटेल फ्रेडरिक.---ता. ७ जुलै १८८३.
३ राजकुमार एडेलबर्ट.-ता. १४ जुलै १८८४.
४ राजकुमार ऑगस्ट विलियम.-ता. २८ जानेवारी १८८७
५ राजकुमार आस्कर.-ता. २७ जुलै १८८८.
६ राजकुमार जिआकिंग.-ता. १७ दिसेंबर १८९०
७ राजकुमारी विक्टोरिया लुई.-ता. १३ सप्टेंबर १८९२.

यांपैकीं फक्त नं. ३ चे राजकुमार एडेलबर्ट चालू युरोपीय महायुद्धांत कामास आले बाकी सर्व हयात आहेत.

## कैसरचे मनश्चित्र !

राजकुमार लहान असतांना कैसरचे एकमेकांचे त्यांजवर कमीच प्रेम असतें. कधीं कधीं महिना महिनासुद्धां यांचे दर्शन होत नाहीं. आपल्या मुलांचे पालनपोषण व शिक्षणसंबंधीं काय व्यवस्था आहे याची त्यांना मुळींच पर्वा नसते. या सर्व गोष्टींचा बोजा फक्त कैसरीन बाईवर असतो व त्यांना आपल्या लेंकरांची सर्व प्रकारची तरतुद पहावी लागते. घरांत, बाहेर, रात्रीं दिवसा, जागेपणी झोपेंत; केव्हांच कैसर आपल्या मुलाबाळांत मिळत मिसळत नाहींत. त्यांची त्या मुलांस मोठी कृपा म्हणजे हे त्यांच्या दायांजवळ व दासींजवळ त्यांच्या बाबतींत कांहीं तपास करितात तेवढीच. येवढयानेंच त्यांना आपलें कर्तव्य आपण केलें असें वाटून ते आपल्या नित्य व्यसनांत गर्क होतात.

सामान्यतः मुलांना कौटुंबिक सुखाचें मूळकारण न समजतां हे त्यांना वंश चालविणारे तेवढेंच समजतात. या कारणानें त्यांना जन्म दिल्यानंतर हे मनांत म्हणत असतील कीं, मी आपलें कर्तव्य केलें आतां दिवसेंदिवस त्यांचें पालनपोषण करण्याच्या खटपटींत पडण्याचें माझें काय कारण आहे ? एका दृष्टीनें यांचें हें आपल्या मुलांबाळांपासून अलग रहाणेंच त्या मुलांच्या फायद्याचें आहे. कारण अशा स्थितींत कैसरच्या ज्या वाईट आचरणाचा त्यांच्या कोमल मनावर कायमचा परिणाम घडावयाचा ! कैसरीनबाईच्या आचरणाचा प्रभावच राजकुमारांवर होणें इष्ट आहे. ते सर्व त्यांच्याच शिक्षेखालीं लहानाचे मोठे होत आहेत.

इतर दुसऱ्या शिक्षणापेक्षां राजकुमारांना सैन्यविषयक शिक्षण अधिक देण्यांत येतें. लहानपणासून अशी तजवीज करण्यांत आलेली असते कीं, प्रत्येक बाबतींत खेळतांना अगर शिकतांना त्यांचें लक्ष्य विशेषें करून मर्दुमकीच्याच बाजूस राहील अशा तऱ्हेनें त्याना शिकावयाचें. त्यांचा बहुतेक वेळ सैन्यविषयक निरीक्षण, शिक्षण व संगति यांत घालविला जातो. त्यांना शिकविण्यासाठीं शिक्षक नेमतांना त्यांना आरमारी शिक्षण मिळालें आहे कीं नाहीं याची चौकशी करण्यांत येते. सर्व प्रकारें सैनिक वातावरणांत वाढल्यानें हे राजकुमार विशेषतः सैनिकच बनतात. साहित्य आणि संगीत, तसेंच दुसऱ्या कित्येक अवश्यक विद्येंत व कलांत यांना निष्णात करणें त्यासंबंधीं खटपट करणें ह्या अवश्यक गोष्टींची बरीच कमी पर्वा बाळगली जाते.

यांच्या शिक्षणांत दुसरा असा एक दोष आहे कीं, त्यांना लहानपणापासून रुपये अगर पैशांच्या बाबतींत कांहीं सुद्धां शिक्षण दिलें जात नाहीं. यामुळें द्रव्याचा उपयोग कसा करावा याविषयीं त्यांना मुळींच ज्ञान नसतें. जोंपर्यंत मुलाच्या हातांत पैसे देऊन त्यापासून कोणतेकोणतें उपयोग आहेत, त्याचा सदुपयोग कसा करावा हें त्यांना स्वतःच्या अनुभवानें शिकविलें जात नाहीं, तोंपर्यंत मुलांना द्रव्याचा सदुपयोग व दुरुपयोग कसा करणार. आणि पुढें मोठें झाल्यावर त्यांच्या हातांत एकदम संपत्ति पडली म्हणजे

ते तिचा मन मानेल तसा उपयोग करितात; आणि लवकरच रंक बनून जातात. या गोष्टीकडे कैसरचें बरेंच दुर्लक्ष्य आहे. त्यांची अशी समजूत आहे कीं, मुलांना खाजगी खर्चासाठीं रुपये देण्याची लहानपणापासून संवय लावली म्हणजे मोठेपणीं तें उधळें बनतात. यासाठीं त्यांच्या हातीं पैसा देऊं नये; पण ही त्यांची मोठी चूक आहे. कारण मुलांना रुपयांपासून अलग ठेविल्यानें त्यांना त्यांचा सद्व्यय कसा करावा हें मुळींच समजत नाहीं. कैसर जेव्हां लहानपणीं शिकत होते तेव्हां त्याच्या हातीं मुळींच पैसे येत नसत. जो कांहीं खर्च यांना लागत असे तो सर्व त्यांच्यावर नेमलेल्या सेवकाकडून होत असे. कधीं कधीं कारणापुरते पैसे यांना देण्यांत येत असत. पण त्याचा पै न पै खर्चाचा हिशोब यांजपासून घेतला जात असे. या दूषित शिक्षणाचा परिणाम असा झाला कीं, यांना कधीं १०-२० रुपयांचा खर्च करावा लागला तर यांना वाईट वाटतें तर कधीं कधीं कोटयवधि रुपयांचा हे क्षणांत फडशा उडवून टाकितात ! पण त्यासंबंधीं त्यांच्या चेहऱ्यावर किंचित देखील चिंता दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

मोठमोठ्या सम्राटांना द्रव्याच्या उपयोगाविषयीं अनभिज्ञ राहणें मोठें आपत्तीचें कारण होय. लहानपणीं स्वतंत्रतेनें खर्च कर. ण्यासाठीं १० रुपयेसुद्धां हातीं न येणाऱ्याच्या हातीं, सम्राट होतांच क्रोडो रुपये येतांच त्या संपत्तीचें महत्व त्यांना कळत नसल्यामुळें ते वाटेल तशी उधळपट्टी चालवितात. द्रव्याच्या सहाय्यानें आपलें

देशहित कसें साधतां येईल हा विचारच त्यांना नसतो. याचा परिणाम असा होतो कीं, यांच्या देखरेखीखालीं किंवा हुकमानें लाखों रुपये निरर्थक कामांत खर्च होतात तर कधीं कधीं उपयोगी कामांत द्रव्य खर्च करण्याचें त्यांच्या अगदीं जीवावर येतें ! !

या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष्य करून कैसर आपल्या मनाप्रमाणें राजकुमाराला शिक्षण देतात. या राजकुमारांना दर आठवड्यास कांहीं रुपये दिले जातात; पण त्यांचा पैनपैचा हिशोब त्यांच्याकडून घेण्यांत येतो. जर राजकुमार स्वतः त्या रुपयांचा खर्च करून त्याबद्दल हिशोब ठेवते तर कांहीं ठीक होते; पण हा खर्च व त्याचा हिशोब ठेवण्याचें काम त्या राजकुमारांच्या बरोबर असणाऱ्या नौकरानें करावयाचें असतें. त्यामुळें राजकुमारांचें द्रव्य खर्च करण्यासंबंधीचें अज्ञान तसेंच कायम राहिलें जातें. ज्या दिवशीं एखाद्या राजकुमाराला १० वर्षें पुरीं होतात त्या दिवसापासून त्या राजकुमाराला सैन्यांतील कनिष्ट दर्जाच्या—लेफ्टेनंटचा—पगार सुरू करण्यांत येतो. या पगारांतून त्यांच्या एखाद्या परिचारकाचें वेतन कापलें जातें. ह्या लहानपणाच्या असाधारण कृपणतेमुळें मोठेपणांत ते उधळे बनतात व त्यामुळें भयंकर हानी होते. जरी लहानपणापासून राजकुमारांना स्वतंत्ररीत्या द्रव्याचा व्यय करूं न दिल्यानें अनेक अनर्थ होतात तरी कैसरचें लक्ष्य अद्याप त्या गोष्टीकडें मुळींच गेलेलें नाहीं.

कैसरचें मनश्चित्र !

जेव्हां कोणी राजकुमार १० वर्षांचे झाल्यामुळें त्यांस सैन्यांत दाखल करण्यांत येतें त्या दिवशीं कैसरचे आनंदास पारावार नसतो. खरा पुत्रजन्म त्या दिवशीं झाला असें ते समजतात. यांच्या दृष्टीनें मनुष्यानें सैनिक बनणें हें त्याचें अति श्रेष्ठ ध्येय होय. या कारणानें त्यांनीं आपल्या सर्व राजकुमारांना आपणाप्रमाणेंच सैनिक बनविलें आहे. मुलगा लहान असतांना ते त्याजवर बेताचेंच प्रेम करितात; पण तो सैन्यांत सामील झाला कीं, त्याजवर यांचें प्रेम अधिक जडतें. मग तेव्हांपासून ते आपलें पितृकर्तव्य करावयास लागतात, आणि त्याची उन्नति होण्यासाठीं नेहमीं दक्षता बाळगितात. अशा स्थितींत राजकुमाराच्या उत्कर्षानें त्यांना अपरिमित आनंद होतो आणि उलटपक्षीं अतोनात दुःख होतें. आपल्या राजकुमाराला उत्तम सैनिक बनविण्याकरितां जरूर त्या सर्व गोष्टी अवश्य करितात यांत संशय नाहीं.

हे आपल्या मुलांची मिथ्या प्रशंसाकरून त्यांना उत्साह देण्याचा प्रयत्न करितात, पण ही त्यांची चूक आहे. मिथ्या प्रशंसा करण्याचा परिणाम नेहमीं वाईटच होतो. अनुभविक मनुष्य देखील या जाळ्यांत सापडून बिघडून जातात; मग त्या लहान वयाच्या राजकुमारांची काय कथा ? आम्हांला असें वाटतें कीं, खऱ्या गुणाची प्रशंसा करणें अगदीं जरूर आहे व त्यायोगें लहान बालक, युवक अगर मनुष्य यांना उत्साह वाटणें साहजिक आहे.

त्याचप्रमाणें हें ही खरें आहे कीं, मिथ्या प्रशंसा बुद्धिनाशक व साहसविनाशक आहे. राजकुमार सैन्यांत दाखल झाल्यापासून हे त्यांच्या समक्ष आणि त्यांच्याशीं अशा रीतीनें भाषण करीत असतात कीं, त्यायोगें त्यांच्या मनांत असें वाटतें कीं, आपण आतांपासून एक मोठे पराक्रमी वीर बनलों आहों आणि आतां पुढें आपणास रणकुशल होण्यासाठीं अधिक मेहनत करण्याचें कांहीं कारण नाहीं. वास्तविक गुणाच्या प्रसंसेनें मनावर असा परिणाम होतो कीं, आपण पराक्रमी व वीर आहोंत; परंतु भविष्यत्कालीं उन्नति प्राप्त होण्याकरितां आपण आतांपासूनच परिश्रम करणें जरूर आहे. या दोन प्रशंसापैकीं एक मनुष्याचा उत्साह वाढविते, स्वभाव सुधारते, चरित्र उज्वल करिते व त्याची उन्नति करते; तर दुसरी आळस वाढविते, दुर्गुणी बनविते, दुर्वर्तनी करते व त्याला अधोगतिला नेऊन पोंहचविते.

ता. २४ जून १९१४ रोजीं राजकुमार ऐडलबर्ट आरमारखात्यांत शिरले तेव्हां कैसरनीं बोलून दाखविलें कीं, 'आज राजकुमार ऐडलबर्ट तुम्हांमध्यें येऊन मिळाले आहे; तेव्हां हा दिवस जर्मनीच्या इतिहासांत विशेष महत्वाचा गणला जाईल.' अशा प्रकारच्या भाषणानें लहान लहान मुलांची अशी समजूत होते कीं, आपण आतांपासूनच ऐतिहासिक पुरुष बनलों आहों. आतां मोठेपणीं अंगीं पात्रता आणण्याची कांहीं अवश्यकता नाहीं. आपण

हल्लीं जसें आहों त्याच स्वरूपांत देश आणि जाति यांच्या हितार्थ झटणारे असतात. बरेच वृद्ध व अनुभवी जलसैनिकाच्या समोर केवळ १० वर्षाच्या उमरींचे राजकुमार ऐडलबर्टचें आरमारांत सामील होणें यासारख्या गोष्टीला इतकें महत्व देणें कितपत उचित आहे याचा सहज उलगडा होण्यासारखा आहे; तथापि याच्या तुलनेसाठीं चांगल्या रीतीनें समजण्याकरितां खालील मजकूर जरा लक्ष्यपूर्वक वाचावा:—

"आतांपासून जें काम तुला करावें लागणार आहे तें तुला जरी हलकें व व्यर्थ आहे असें वाटत असलें तरी तुला हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजें कीं, आपलें कर्तव्य बजावतांना तें लहान कीं, मोठें याचा विचार करितां कामा नये. मोठें घर तयार करण्यासाठीं—आपलें सैन्यबळ उत्तम बनविण्याकारितां—प्रत्येक वीर प्रत्येक सैनिक—चांगल्या रीतीनें बसविला गेला पाहिजे—व उत्तम रीतीनें तयार झाला पाहिजे. आता आम्ही सदर काम तुझेंवर सोंपवितों व तें तूं आपल्या वरिष्ठाच्या आज्ञेबरहुकूम बजावलें पाहिजे."

याचप्रमाणें पुढील मजकुराचेंही विचारपूर्वक वाचन करा:—

"माझ्या बंधूंनों ! आज माझा मुलगा आपल्या सैनिक शिक्षणासाठीं तुमच्या सेनेंत येऊन सामील होत आहे; याचा मला मोठा अभिमान वाटतो. मी त्याच्या या भाग्याबद्दल त्याची

प्रशंसा करितो. तुमचा वेश त्याला घालण्यासाठीं मोठ्या अभिमानानें देत आहे व त्याला तुम्हांसर्वांच्या स्वाधीन करितों."

ज्यावेळेस हल्लींचे कैसर दुसरे विलियम आपल्या १८ व्या वर्षीं ता. ७ फेब्रुवारी १८७७ रोजीं पहिल्यानें सैन्यांतील एका छोट्या हुद्यावर नेमलें गेले होते त्यावेळीं वरील भाषणांपैकीं त्यांच्या आजानें व दुसरें त्यांच्या बापानें केलें. त्यांच्या बरोबरच हल्लींच्या कैसरनीं आपल्या १० वर्षांच्या मुलाच्या सैन्यांत प्रवेश करण्याच्या वेळेस काढलेल्या उद्गारांशीं तुलना करून पहातां, जुन्या व नव्या कैसरच्या स्वभावामधील अंतर स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतें. यांच्या अगोदरचे दोघे ही महाराज यांजवर अतिशय प्रेम करीत होते पण यांच्याप्रमाणें ते मिथ्या प्रशंसा करून उत्साह देण्यानें आपल्या राजकुमाराला बिघडवीत नव्हते. जे सैन्यांत काम करतां करतां वृद्ध झाले; ज्यांनीं आपल्या आयुष्यांत अनेक अनुभव मिळविले; ज्यांनीं आपलें शीर हातांवर घेऊन शौर्य दाखविलें त्यांच्यासमोर १० वर्षांच्या लहान मुलाच्या सेनाप्रवेशला जर्मन इतिहासांत महत्वाचे स्थान देणें; आणि १८ वर्षांच्या आपल्या सुशिक्षित मुलाला त्यावेळीं कांहीं शेलक्या गौरवपूर्ण शब्दांनीं उपदेश करणें आणि त्या सैन्यांतील वृद्ध सैनिकांवर त्याला सोंपवून देणें यांपैकीं अधिक श्रेष्ठ कोणतें ? याचा निर्णय करण्याचें काम आम्ही आमच्या सूज्ञ वाचकांवरच सोंपवितों.

१४०८

## ७ कैसरचें प्रवासव्यसन !

कैसर हे मोठयाकष्टानें एके ठिकाणीं कांहीं दिवस रहातात. ते आपला बहुतेक काळ सारखा प्रवास करण्यांतच खर्च करितात. जर्मनींतील निरनिराळीं शहरें, राज्यें, अगर दुसरे निरनिराळें देश यांत नेहमीं ते फिरत असतात. आपल्या प्रवासांत एखाद्या गोष्टीचा उद्देश सिद्धीस जाईल किंवा नाहीं याची यांना विशेष काळजी नसते. कधीं कधीं तर यांचा निष्कारण प्रवास काम बिघडवून टाकतो व राज्यकारभारांत नुकसान घडवितो; तरी हे एके ठिकाणीं कचितच रहातात. नेहमीं फिरत असतात.

हे ज्या दिवशीं राजधानींत येतात त्याच दिवशीं, उद्यां कोठें प्रयाण करावें याविषयीं मनांत योजना करीत असतात ! एक प्रवास पुरा होण्याच्या आधींच दुसऱ्या प्रवासाची तरतुद करण्यास सुरुवात होते. राजवाड्यांत आले कीं, पुढील प्रवासाविषयींच्या गप्पास सुरुवात झालीच. त्यांत कोणाडून कां होईना प्रवासाची सूचना बाहेर पडण्याचा अवकाश कीं, हे तावडतोब प्रवासाची तयारी करण्यास लागतात. यांच्याबरोबरचे सेवक आणि यांचे खाजगी मंत्री सर्व प्रकारच्या गोष्टींचे पूर्ण ज्ञाते असतात ! कोणत्या देशांत कोणती राजनैतिक घटना पहाण्यासारखी आहे; आपल्या देशांत अमुक एकठिकाणीं अमुक गोष्टीची जरूर आहे व अमक्या शहरांत अमुक

एक विशेष कार्य होत आहे व त्यावेळीं महाराजांना तेथें हजर असणें जरूर आहे. अशा प्रकारची एकादी अनुकूल संधि सांपडतांच त्याबद्दल ताबडतोब कैसरना कळवून प्रवासाची तयारी करण्यास ते नेहमीं तयार असतात ! अशा बाबतींचा तपास ठेवण्याविषयीं सर्व नोकर लोकांना सक्त हुकूम सुटलेले असतातच ! शिवाय स्वतः कैसर ठिकठिकाणच्या बातमीपत्रांतून अशी एखादी संधि शोधीतच असतात. जेव्हां असली एखादी संधि सांपडत नाहीं त्यावेळेस प्रवासाला कारण फक्त कैसरची इच्छा येवढेंच असतें व तेवढें पुरेसेंही पण होतें. अशा स्थितींत सर्व नोकरचाकर आज्ञेबरहुकूम प्रवासास ताबडतोब तयार रहातात.

१८९५ सालीं आस्ट्रियाचे अर्क डयूक आल्ब्रेश मरण पावले व त्यांच्या अंत्यविधीची तारीख २१ फेब्रुवारी ठरविण्यांत आली होती. हे गृहस्थ कैसरचे कट्टे वैरी होते व हे त्याना नेहमीं पाण्यांत पहात असत. या गोष्टीवरून आस्ट्रियांचे वृद्ध महाराज फ्रान्सीस जोसेफ यांनीं कैसरला त्या अंत्यविधीसाठीं मुद्दाम बोलाविलें नव्हतें. परंतु यांच्यानें राहवलें नाहीं. प्रवासाला योग्य सबब मिळून ह्यांनीं आस्ट्रियाच्या प्रवासाची तयारी केली. यांच्या मनास वाटलें कीं; यावेळीं जाण्यानें एकतर प्रवास होईल, त्या देशाशीं स्नेहभाव वाढेल, मयत वैऱ्याच्या अंत्यविधीला हजर राहिल्याबद्दल माझी वाहवा होईल व कांहींना कांहीं तरी राज्यविषयक लाभ होईल. पण तेथें

गेल्यावर सर्वच रंग बदलला. हे आपल्या शत्रूचा सन्मान करण्यास गेले पण तेथील लोकांना तो दुःसह अपमान वाटला. हे गेले होते राजाचा परामर्श घेण्यासाठीं पण फ्रान्सिस जोसेफ यांच्याशीं बोलले देखील नाहींत. हे प्रवासाचा आनंद भोगण्यासाठीं गेलें पण यांना तेथें दुःखच भोगावें लागलें. आस्ट्रियाचे महाराज व तेथील लोकां-वर नाखूष होऊन हे तेथें असलेल्या आपल्या वकिलाच्या घरीं उतरले. आपला अंदाज पार चुकून भलताच प्रसंग घडला हें पाहून नाच, तमाशे वगैरे खेळ करून आपला वेळ व त्याबरोबरच आपलें दुःख घालवून ते मुकाट्यानें जर्मनीस परत आले. अशा प्रकारे एखादे वेळेस यांचा प्रवास यांना उपहासास्पद होतो.

दुसऱ्या देशांतल्या लोकांनीं कैसरना बोलावणें न बोलावणें हें त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्यांत कैसरचें कांहीं चालत नाहीं. पण जर्मनींतल्या लोकांविषयीं बोलण्याची सोयच नाहीं. तेथले हे कैसर आहेत व म्हणून तेथील रहिवाशी व सैनिक यांना कोणत्या तरी निमित्तानें आपल्या घरीं बोलावितात. जर त्यांनीं होऊन यांना बोलाविलें नाहीं तर यांच्या मंत्र्यांच्या सांगण्यावरून त्यांना कैसरना आपल्या येथें बोलावणें भाग पडतें. ते आपल्या नांवासाठीं भरतात व कैसरना बोलावीत असतात. सार्वजनिक, नागरीक व जातीविषयक सभा या भानगडींत हे क्वचितच पडतात. यांना निष्कारण बोलावून हजारों रुपये खर्चीं घालण्याचें काम अलीकडे बरेंच लोक हात राखून करितात.

वरील प्रकारांनींसुद्धां कैसरना जेव्हां यथेच्छ प्रवास करावयास मिळत नाहीं, तेव्हां एक दोन दिवस राजवाड्यांत राहण्यानें हे अगदीं कंटाळून जातात; व बसल्या बसल्या नवीन कारणें उत्पन्न करीत असतात. या सर्वांचा एकच हा उद्देश असतो कीं, कोणी-कडून तरी नेहमीं प्रवास करण्यास मिळावा. दुसरीं कारणें शोधण्यांत यांची निराशा झाली म्हणजे मग हे आपल्याच देशांतल्या एका सेनेला नवी पताका देण्यासाठीं; दुसरींतल्या कांहीं सैनिकांना पदकें वांटण्यासाठीं; तिसरीचें विशेष निरीक्षण करण्यासाठीं; चौथींत राज-कीय भोजन देण्यासाठीं जाण्याचा बहाणा करून आपली प्रवासाची हौस भागवितात. कोठें एखाद्या नव्या इमारतीचा पाया बसविणें आहे; कोठें एखादी नवी इमारती उघडण्याचा समारंभ आहे; कोठें एखादी मूर्ति स्थापन व्हावयाची आहे; अथवा एखादें स्मारक उभा-रावयाचें आहे अगर सामाजिक, सार्वजनिक समारंभ आहे अशा सर्व प्रसंगीं आपणाला निमंत्रीत करवून घेतात. निमंत्रण देण्यांत कोणी चूक केली तरी हे कधीं कधीं "तूं मान न मान, मैं तेरा मेहमान" या न्यायानें तेथें जातातच. कोणीकडून तरी प्रवास करण्यास कारण उत्पन्न करितात किंवा करवितात. यांना प्रवासास जाण्यास मिळालें नाहीं तर यांच्या चित्ताला शांतता वाटत नाहीं. आस्ट्रिया, इटली व स्वतः जर्मनी देश यांच्या या प्रवासाला अगदीं कंटाळून गेले आहेत. यांना पहातांच त्यांच्या तोंडून 'पहा ! प्रवासाचें सैन्य आलें !!' असे उद्गार सहज निघतात.

## कैसरचे मनश्चित्र !

कैसर आपले वर्ष कोणत्या प्रकारें घालवितात हें दाखविण्यासाठीं त्या दिवसांचा तपशील आम्ही खालीं देत आहों:--

| | दिवस. |
|---|---|
| १ शिकारसंबंधीं; समुद्रावरील व साधारण सफरी. | १५६ |
| २ राजवाड्यांमध्यें राहून सर्व वेळ भोजन, नाचरंग, संगीत, नाटक, दुसऱ्यांचे स्वागत वगैरे व गप्पागोष्टी करणें. ... ... ... | ८९ |
| ३ राजवाड्याच्या आसपास किरकोळ शिकार, नांवा चालविणें वगैरे. ... ... ... | ७७ |
| ४ सेनेचें निरीक्षण करण्याप्रित्यर्थ सफरी. ... | २७ |
| ५ राज्यकारभारसंबंधीं सफरी. ... ... ... | १६ |
| एकंदर | ३६५ |

हा साधारणपणें एक वर्षाचा तपशील दिला आहे. याशिवाय कैसर आपल्या इच्छेनुरूप कमीज्यास्त दिवसांचा फरक करितात. ज्या सबंध वर्षांत यांना प्रवासाला जाण्यास मिळालें नाहीं तें वर्ष यांच्या मतें व्यर्थ गेलें ! पण त्याचा वचपा ते पुढल्या वर्षीं भरपूर काढतात.

हा झाला एक वर्षाच्या दिवसाचा हिशोब; पण यांनीं आगस्ट १८८८ पासून मे १८९० पावेतों एक वर्ष दहा महिन्यांत किती

प्रवास केला याची यादी पहा ! या अवधींत त्यांनीं खालीं लिहिलेल्या ३६ ठिकाणीं प्रवास केला:--

| | | |
|---|---|---|
| १ स्टाकहोम. | १३ ओल्डेनबर्ग. | २५ मंस्टर |
| २ कोपेनहेगन. | १४ विलियम्स हैफेन. | २६ मिंडेन. |
| ३ फ्रँकफर्ट. | १५ श्वेट. | २७ हैजोवरा. |
| ४ स्टटगर्ट. | १६ वीमर. | २८ श्वेरिन. |
| ५ म्युनिच. | १७ ब्रजविक. | २९ एथेन्स. |
| ६ वायना. | १८ ड्रेस्डेन. | ३० डेसाओ. |
| ७ रीम. | १९ ऑस्बर्न. | ३१ डेर्मस्टाड. |
| ८ हम्बर्ग. | २० सैंडाउन बे. | ३२ कोनिग्जबर्ग. |
| ९ लिपजिग. | २१ आल्डवशाट. | ३३ वर्म्स. |
| १० ब्रेस्ला. | २२ कार्ल्सरूह. | ३४ ब्रेमेन. |
| ११ स्टेटिन. | २३ स्ट्रास्बर्ग. | ३५ फ्रँकफर्ट ऑन दी मेन. |
| १२ बकबर्ग. | २४ मेज. | ३६ ऑस्टेनबर्ग. |

ही लांबलचक यादी पाहून मनांत येतें कीं; यांच्या प्रवासाला कांहीं सीमा नाहीं. एक तर इतक्या स्थळांची यादी कोणाही मनुष्याला आश्चर्यचकित करून सोडणारी आहे; पण त्याच्याहून अधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेवढ्या अवधिंत कैसर वरील यादींपैकीं कित्येक ठिकाणीं दोन दोन तीन तीन वेळां गेले

आहेत ! ! ज्याला हिंडतच राहावयाचें त्याला ही ३६ च ठिकाणें काय पुरणार ? याच्याहून दुप्पट जरी यादी लांबली असती तरी कैसरना ती अपुरीच पडली असती. अशा रीतीनें एकसारखें फिरत राहण्याचें व्यसन जडल्यामुळें कैसरना एके ठिकाणीं स्वस्थ पडून राहणें जीवावर येतें. जमिनीमागून समुद्र, समुद्रामागून पहाड व पहाडानंतर पुनः जमीन असे एकसारखें भ्रमण चालू असतें ! कधीं कधीं यांना बाहेर जाण्यास वास्तविक अगर काल्पनिक कारण मिळत नाहीं तेव्हां हे आपल्या राजकीय रेल्वेमध्यें जाऊन निजतात. ५ मिनिटांनीं दुसऱ्या स्टेशनवर गाडी उभी करण्यांत येतें. नंतर मध्यरात्रीं अथवा पहांटे जेव्हां याची झोंप पुरी होऊन यांना प्रसन्नता वाटते तेव्हां यांना पुनः ती गाडी परत राजधानींत आणून सोडते. यावरून यांचें प्रवासाचें व्यसन केवढें जबर आहे याची कल्पना सहज होते.

एके ठिकाणीं राहण्याबद्दल यांची अस्थिरता कधीं कधीं यांचा विचारांत सुद्धां चंचलता उत्पन्न करते. एक तासाच्या अगोदर हे एका ठिकाणीं जाण्याचा निश्चय करितात तर विचाराच्या दुसऱ्या तरंगाबरोबरच तें ठिकाण बदलतें. १८९५ आणि १८९६ सालांत ही गोष्ट बरेंच वेळां घडून आली. एकदां यांनीं हुकूम दिला कीं, मी आपल्या सर्व लोकांसह "बेरिश हारोन" मध्यें टिफीन खाईन. त्याप्रमाणें ताबडतोब कित्येक गाड्यांतून तंबू, राहुट्या,

मेजें, खुर्च्या. चिनीचीं व कांचेचीं भांडीं वगैरे जिन्नस घेऊन नोकर तिकडे रवाना झालें. बरेचसे दास आणि दासी तिकडे जाण्यास निघाल्या आणि मोठ्या मुष्किलीनें तें सर्व लोक तेथें जाऊन पोंहचले. इतक्यांत मागून दुसरा हुकूम येऊन थडकला कीं, तुम्ही सर्व लोक तेथून पांच कोसावर असलेल्या दुसऱ्या एका ठिकाणीं जावें. कारण महाराज तेथें फराळासाठीं येणार आहेत ! मग काय ? हे लोक सर्व सामानासह पुनः तेथून पुढें निघाले. त्या दिवशीं चिनीचीं व कांचेचीं भांडीं किती फुटलीं असतील व केवढें नुकसान झालें असेल तें त्यांचें त्यांनाच माहीत. कितीएक घोडे लंगडे झाले. त्या वर्षीं यांच्या विचाराची चलबिचल इतकी चमत्कारिकपणानें होत असे कीं, यांचें सामान एका मुक्कामावर चाललें असतां तें तेथेंच पोंहोचेल कीं नाहीं. याविषयीं लोक अपसांत पैज लावीत असत ! आणि त्याप्रमाणें कधीं कधीं होई. एखादे वेळेस सांगितल्या ठिकाणीं सामान जाऊन पोंहचण्याच्या अगोदरच वाटेंत त्यांना दुसऱ्या ठिकाणीं जाण्याचा हुकूम होई.

कैसर प्रवासास निघाले ह्मणजे त्यांच्या बरोबर बहुधा ५० पासून १०० पावेतों मनुष्य असतात. कैसरचे खास नौकर, सैनिक व न्याय मंत्री, प्रधानमंडळांतील एक दोन सभासद, राजवैद्य, स्पेशल नोकर, कपडे ठेवणारे व अंगावर घालणारे, चांदीची भांडीं संभाळणारे नोकर, दारु ठेवणारा, घोड्यांची शुश्रुषा करणार, किती-

एक शिकारी कोचवान, नाव्ही, परिट, स्वैपांकी व इतर लोक सर्व मिळून ६० पासून ७० माणसें असतात. महाराजांच्या नेहमीं फिरण्याच्या संवयीमुळें हे लोक सर्व चिजवस्त बांधून अगदीं तयार असतात. हुकूम झाल्याबरोबर एक तासाच्या आंत हे निघण्यास तयार होतात. कैसरचा हुकूम ताबडतोब अमलांत आणण्यांत यांना कांहीं सुद्धां काळजी करीत बसावें लागत नाहीं. हुकूम मिळतांच हे सर्व लोक झटकन तयार होऊन आपलें व कैसरचे सर्व सामान बांधून स्टेशनवर पाठवून देतात.

कैसरना आगगाडीच्या वेळेसंबंधीं बिलकूल काळजी वाटत नाहीं. कारण यांची स्पेशल ट्रेन सदोदित तयार असतें. यांची लहर लागतांच ती चालूं करण्यांत येतें. जर्मनींतील बहुतेक रेल्वे सरकारी आहे तरी यांना व यांच्या बरोबरच्या नौकरांना इतर सर्व सामान्य लोकांप्रमाणेंच भाडें द्यावें लागतें. या राजकीय आगगाडींत कैसरना पूर्ण सुख मिळावें म्हणून सर्व प्रकारच्या सोयी उत्तम तऱ्हेनें केलेल्या असतात. त्यांत निजण्याची व भेटण्याची जागा; स्नान व भोजन करण्याची जागा, स्वैंपाक करण्याची व भांडीं घांसण्याची जागा मोठ्या व्यवस्थितपणें वेगवेगळ्या केलेल्या असतात. फक्त त्यांत सेवकांना बसण्याची मात्र स्वतंत्र जागा ठेवलेली नसते. त्यांना बिचाऱ्यांना भरपूर काम करावें लागतें; पण विसाव्यासाठीं मात्र त्यांना गाडींत जागा नाहीं ! ! तेवढी असती तर त्यांना

आनंद वाटतो. महाराजाच्या बरोबर प्रवासास जाणें म्हणजे आपलें दुःख वाढविण्यासाठींच जावयाचें असें त्यांना वाटतें. स्वतः कैसरच्या-साठीं तयार केलेली आगगाडी म्हणजे एक लहानसा हिंडता फिरता राजवाडाच आहे !

ही गाडी बहुधां रात्रीं १० वाजतां स्टेशनवरून निघते आणि फार धिमे धिमे चालते. कारण ज्यास्त वेगानें चालल्यास कैसरच्या झोंपेंत व्यत्यय येतो ! रेल्वे कंपनीचें वाटेल तेवढें नुकसान झालें तरी त्याची पर्वा नाहीं; परंतु महाराजांच्या सुखांत किंचित्-सुद्धां न्यून पडतां कामा नये. हे साधारणतः गाडींत बसतांच झोंप घेण्यास सुरुवात करितात, लांबचा प्रवास असल्यास बिचाऱ्या नौक-रांना कांहीं विश्रांति तरी मिळण्याचा संभव असतो; परंतु हे जेव्हां आपल्या विचित्र स्वभावानुरूप गाडींत बसून नजीकच्याच स्टेशनवर रात्र घालविण्याचा इरादा करितात तेव्हां बिचाऱ्या नौकरांचे कोण हाल होतात ! बर्लिन स्टेशनचे सुमारें १०० नौकर यांना सुखनिद्रा मिळावी म्हणून झटत असतात. हे तेथून ३-४ कोसांवर असलेल्या ' वाइल्ड पार्क ' स्टेशनपर्यंत जातात. तेथवर जाण्यास केवळ पांचच मिनिटें लागतात. त्या स्टेशनावरील सर्व नौकर आणि त्या स्टेशन-वर येणाऱ्या सर्व गाड्यांची मोठी दुर्दशा उडते. जोंपर्यंत कैसरची खास ट्रेन तेथील प्लॅटफॉर्मवर उभी आहे तोंपावेतों तेथें येणाऱ्या सर्व मालगाड्या अलग असलेल्या मालकोठ्यावर गुपचूप निघून जातात.

तसेंच पॅसेंजर गाड्यांचा वेग लांबवर आहेत तोंच अगदीं मंद करण्यांत येतो. तसेंच कोणत्याही नोकरानें योग्य कारणावांचून सिटी अगर घंटा वाजवितां कामा नये. सर्व गाड्या गुपचूप येतात व तशाच गुपचूप रीतीनें निघून जातात. हें सर्व महाराजांची झोंप मोडूं नये म्हणून ! आणि याच कारणास्तव त्या स्टेशनवरील नौकर लोकांची संख्या दुप्पट ठेवण्यांत आली आहे.

कैसर सकाळीं गाडींत जागे झाले म्हणजे शौचादिविधी उरकून एक कप चहा घेतात; नंतर स्नान करून सकाळचें जेवण जेवतात. राजवाड्यांतल्या जेवणापेक्षां येथील जेवणाचा बेत फारच चांगला असतो. यांचा दौरा दूरवरचा असला तर दुसऱ्यांची झोंप-मोड होत नाहीं. पण कधीं कधीं अर्ध्या रात्रीं किंवा पहांटे ४ वाज-तांच दुसऱ्या ठिकाणीं उतरून परत राजधानीस येतात. अशा वेळीं नगरप्रवेश करणें म्हणजे लोकांना इतकें त्रासदायक होतें कीं; स्वारीच्या धांदलीनें व कोलाहलानें सर्वांच्या झोंपा मोडल्या जातात व त्यामुळें लहान मुलें रडून गोंधळ करितात; पण त्यांनीं बिचाऱ्यांनीं काय करावें ? हे पडले कैसर व ते सामान्य नागरीक मनुष्य. यामुळें त्यांचा कांहीं इलाज चालत नाहीं. पहा ! कशी मजा आहे ? एक बाजूस यांची झोंप मोडली जाऊं नये म्हणून दुसऱ्या आग-गाड्यांचा वेगसुद्धां कमी करण्यांत येतो आणि स्टेशनवर सिटी किंवा घंटा वाजवूं देत नाहींत ! तर दुसरे बाजूस स्वतः कैसरचा अनेक

श्यक दौरा हजारों स्त्रिया, पुरुष व मुलें यांच्या निद्रेचा भंग करितो ! ! याला दैवाचा दुर्विपाक अथवा नशिबाची विडंबना यांशिवाय दुसरें काय म्हणावें ?

केसर राजवाड्यांतून बाहेर जातात तेव्हां त्यांची निमी शोभा नाहींशी होते. सर्व प्रकारचे नाचरंग व कामकाज बंद ठेवण्यांत येतें. तसेंच खर्चांतही चाट मारण्यांत येतें. केसरीन निराश होऊन आपल्या मुलांबरोबर जेवण जेवतात. पाकशाळा शांत होत असते. खोल्या शृंगारण्यासाठीं दररोज येणारी फुलें कमी होतात व केसर असतांना जी धांवपळ असतें ती अगदीं बंद पडते. केसरचा जाण्याचा व एकदम परत येण्याचा निश्चितपणा नसतो. जेव्हां हे एखाद्या जवळच्या ठिकाणीं जातात व तेथें कित्येक दिवस मुक्काम करणार असल्याचें समजतें; तेव्हां ते कधीं कधीं सूचना न पाठवितां अचानकपणें राजवाड्यांत परत येतात. हे आले कीं, तेथें पुनः धांदल सुरू होते. हे येतात ते केवळ परत निघण्याच्या तयारीनेच आलेले असतात ! एकीकडे राजवाड्यांत पाय ठेवतात तर दुसरीकडे पुनः जाण्याच्या बाबतींत सारखे हुकूम सोडीत असतात. तार, टेलिफोन व स्वार लोक या कामीं रात्रंदिवस गुंतलेले असतात. अशा रीतीनें राजवाड्यांत एकाददुसरा दिवस राहतात न राहताच तोंच पुनः बाहेर फिरावयास जातात.

यांवरून असें दिसतें कीं; सूर्य, चंद्र, पृथ्वी आणि नक्षत्रें याप्रमाणें यांनाही सतत भ्रमण करण्यासाठींच उत्पन्न केलेलें आहे !

कैसरचें मनश्चित्र !

लाखों रुपयांचा खर्च, अमर्याद कष्ट, राज्यकारभारांत गोंधळ आणि अमूल्य वेळेचा नाश सारखा होत आहे; पण हे आपले प्रवासचक्र कांहीं थांबवीत नाहींत. एंजिनावरच्या वाफेप्रमाणें यांचे मन यांना सारखें फिरावयाला लावतें. कैसरच्या ह्या फिरण्याच्या व्यसनानें कंटाळून जाऊन रुसचे झार तिसरे अलेक्झांडर यांनीं यांच्या बाबतींत एकदां म्हटलें कीं; "पाहून घ्या ! कांहीं दिवसांनीं हे आपल्या राजदरबारांत आपल्या जागीं अध्यक्षांचें काम करण्याकरितां आपले जोडे पाठवतील ! !"

---


ज्या अद्वितीय मानसिक शक्तिच्या जोरावर जर्मनीचे

कैसर— आज लढत आहेत, ज्या अदृश्य शक्तीमुळें क्रॉमवेल इंग्लंडचा राजा झाला; ती अभ्दुत शक्ति अंगीं आणून आत्मोन्नति करून घेणें असल्यास वैयक्तिक आकर्षण—पर्सनल म्यॅग्नेटिझम किं. ८८ व्ही. पी.नें ८१० हें पुस्तक मागवा !

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पेठ, पुणें—सिटी.

## ८ जर्मनीतील गुप्त पत्रांचा प्रभाव !

नटवे तरुण युवकांचा संघ, सुंदर रुपवती युवतींचें केंद्र व सुसज्जित परिस्थितींची अनुकुलता पाहून तेथें कामदेव आनंदानें नाचत असतो. त्या ठिकाणीं अनेक विचित्र व सामान्य आणि प्रकट अप्रकट प्रेमलीला होणें ही कांहीं अशक्य गोष्ट नाहीं. वास्तविक पाहिले तर कंदर्पाच्या दर्पाची सर्व साधारण लीला आहे. जेथें ह्या लिलांचा प्रादुर्भाव असतो तेथें प्रेमी व प्रेमिका यांच्यांत परस्परांच्या प्रेमाची अदलाबदल सुरू होते व तें प्रेम प्रतिकूल परिस्थिति प्राप्त होतांच प्रसंगीं वैमनस्यांतसुद्धां रूपांतर पावतें. उभयतांपैकीं एखाद्याच्या मनांत दुसऱ्याविषयीं संशय उत्पन्न झाला कीं, मग त्या लहरी मदनाच्या प्रभावानें त्या प्रेमी–प्रेमिकांच्या अनपेक्षित भेटीसुद्धां त्यांच्यांत अधिक तेढ उत्पन्न करून ती त्यांना भांडावयास उद्युक्त करिते.

जेव्हां एखादी गुप्त प्रेमलीला उघडकीस येते, तेव्हां तिच्या उजेडांत चोरट्या व छपविलेल्या कित्येक अपरिचित गोष्टी जनतेच्या दृष्टोपत्तीस येतील याचा नेमच नसतो. अशा परिस्फुटतेनें त्यांत उघडकीस आलेल्या किरकोळ गोष्टींवरूनसुद्धां रसिक समालोचक व निराश प्रेमी मोठमोठीं रहस्यें शोधून काढितात व नवीन तयार करितात ! ! अशा स्थितींत त्या प्रेमराज्यांत अनेक कलह माजतात

व कोणालाही आपल्या स्थितींचें भान नाहींसें होतें. एखाद्याला दुस-ऱ्याच्या बाबतींत जें काहीं गुप्तरहस्य माहीत असेल तें तो मनसोक्त भकत अगर लिहीत सुटतो. अशा परिस्थितींत गुप्त पत्रांचा प्रभाव अनुभवास येतो !

नवंबर १८९२ मध्यें कैसरच्या राजवाडयांत व त्यांच्या समस्त मंडळीची अशीच स्थिति बनली होती. अनेक खऱ्या प्रेम-लीला व रहस्यें यांच्या बरोबर हजारों खोटया व अश्लील गोष्टी उघडकीस येत होत्या. हजारों गुप्त पत्रांनीं आपल्या प्रादुर्भावानें तेथल्या कोमलांगीं कमनीय कामिनींना भीतीनें थरथर कांपावयास लाविलें होतें. हीं पत्रें सर्व स्त्रियां व पुरुष यांच्या नांवावर येत होतीं. त्यांच्या खालीं कोणाची सही नसे. हें गुत्प पत्र ज्यास मिळे, त्याचा स्वतःसंबंधीं, पतिसंबंधीं अगर पत्निसंबंधीं व त्यांच्या आवडत्या माण-सासंबंधीं, स्नेहसंबधीं व आप्तांसंबधीं आणि संबंध नसलेल्या अनेक दुसऱ्या माणसांसंबंधीं त्यांत अगदीं निर्लज्जतापूर्ण अशा अश्लील गोष्टी लिहिलेल्या असत. हीं पत्रें इतकीं अश्लील मजकुराची असत तीं वाचणाऱ्याचें देहभान ठिकाणीं न राहून आतां काय करूं आणि काय न करूं असें त्यांस होऊन जाई ! जगांतल्या सर्व अश्लीतेचा यांत कळस केलेला असे. सर्व कुमारिका आणि युवती या पत्रांना विषय झाल्या होत्या. त्या पत्रांत प्रेमलीलांचा आरंभ स्त्रियांकडून करविण्यांत येऊन नंतर त्यांत कोणा तरी पुरुषांचे नांव घुसडून

ग्रंथ



दिलें जात असे व त्या पुरुषाच्या पुढील दुर्गतीचें वर्णन केलेलें असे. या चपल लेखकांना नुसतीं पत्रेंच लिहून समाधान होत नसे. त्या पत्राबरोबर अनेक प्रकारचीं अश्लील चित्रेंहीं त्याबरोबरच पाठवीत असत.

राजवाड्यांत राहणारे सर्व लोक, कैसर, कैसरीन, त्या दोघांच्या बैठकींतले युवक युवति, त्यांच्याकडे जाणाऱ्या येणाऱ्या स्त्रिया आणि पुरुष, मुख्य नोकर, दासी, कैसर कैसरीन यांचे आप्तसंबंधीं, ओळखीचे पुरुष, स्त्रिया, मुलें कुमारिका, युवति वगैरे सर्वांचा या पत्रांनीं समाचार घेतला होता. या सर्वांच्या आचरणासंबंधीं चरित्रासंबंधीं, या पत्रें लिहिणारांनीं अशा कांहीं घृणापूर्ण, अश्लील व अनुचित गोष्टी लिहिल्या होत्या व अश्लील चित्रें काढून त्या पत्रांबरोबर पाठविलीं होतीं कीं, तीं पत्रें वाचून चित्रें पाहून खुद्द निर्लज्जतासुद्धां लाजली असती. मग लज्जावति स्त्रिया, युवति व कुमारिकांच्या बाबतींत काय सांगावें ? त्यांना ती पत्रें म्हणजे प्रत्यक्ष यमस्वरूपीं वाटत. तीं आपल्या नांवावर येण्यापेक्षां मरण पुरवलें असें सर्वांना वाटत असे; पण काय उपयोग ? 'कैसरचा विलक्षणपणा ' नांवाच्या प्रकरणांत नं. २५ मध्यें वाचकांनीं परिचित झालेली लावण्यमयी युवती—श्रीमती वैसेविज—हिलाही एक दिवस तसलें निर्लज्जतापूर्ण एक पत्र मिळालें. ती बिचारी तें पाहून फार लाजली व तिनें त्या अति अश्लिल लेखाचे तुकडे करून ते विस्तवांत टाकून दिलें.

या पत्रांनीं सर्वांना त्रासवून सोडलें होतें. एकालासुद्धां त्यांनीं सोडलें नव्हतें. ज्या स्त्रिया अगर पुरुषांना हीं पत्रें मिळालीं; त्यांच्या प्रेमिका व प्रेमी यांचीं गुप्त रहस्यें; तसेंच अनेक दुसऱ्या मनुष्यांचीं दुश्चरित्रें त्यांत विलक्षण रीतीनें वर्णिलीं होतीं. त्या दिवसांत श्रीमती फ्रिज व कॉज यांच्यांत या गोष्टीची मोठी चढाओढ होती कीं, पाहूं, आपणापैकीं कोणावर महाराज अधिक प्रेम करितात ! कैसरच्या प्रेमांत बिघाड घालण्याविषयीं या दोघीही आपसांत भांडत होत्या. यांच्यापैकीं एखादिशीं ते जरा हंसून व दुसरीशी जरा गंभीरपणानें बोलले तर तेवढ्यावरून त्या दोघींत भांडण जुंपत असे. इकडे गुप्त पत्रांच्या लेखकांनीं कैसरचा एकींबरोबरचा दररोजचा चोरून छपून झालेला सर्व व्यवहार दुसरीला लिहून पाठविण्यास आरंभ केला. त्यामुळें त्या दोघींत भयंकर वैमनस्याची ज्वाला भडकली, एकीला अशा तऱ्हेचें पत्र जाई कीं, आज कैसरनीं दुसरीला रत्नजडीत भूषणें दिलीं व स्वतः तिच्याजवळ असे बोललें कीं; 'ते पहिलीच्या मुलाचा धर्मपिता नसून दुसरेच आणखी कोणी आहेत.' ह्या दोघींकडेही त्यांनीं अनेक अश्लील चित्रें पाठविलीं. तीं पाहून त्या युवतींना जें काय दुःख झालें असेल तें त्यांचें त्यांनाच माहीत. यापैकीं एका चित्रांत श्रीमती फ्रीजचा फोटो होता व त्यांत असें दाखविलें होतें कीं; इटली देशचा राजा जूलियस सिझर ( ज्याला होऊन आज दोन हजार वर्षें झालीं तो ) त्यांचीं आर्जवें करीत आहे !!

सन १८९२ मध्यें जीं पत्र सर्व जर्मनींत वांटलीं गेलीं होतीं त्यांत सुमारें पंचमांश अशा अश्लील चिठ्या होत्या. वस्तुतः त्यांची संख्या यापेक्षांही अधिक असेल; कारण शेंकडों स्त्रिया आणि पुरुष या मिळतांच लज्जित होऊन जात होते आणि या गोष्टीचा स्फोट करीत नसत. बरेंच दिवसपर्यंत—नव्हे आतांपर्यंत—ह्या गुप्तपत्रांचा लेखक कोण व ते कां लिहितात याविषयीं पूर्णपणें शोध लागलेला नाहीं. यांच्यावरील आक्षेपांचें निरसन करण्याकरितां सर्व स्त्रिया आणि पुरुष सारखे तळमळत होते; पण यांच्यानें कांहीं झालें नाहीं. त्या पत्रांना आळा घालण्याकरितां नवीन निर्बंध घातले; नवीन कामगार नेमले आणि कित्येक नवीन उपाय योजण्यांत आले; परंतु सर्व गोष्टींच्या योगानें शेवटीं विशेष असा कांहींच परिणाम घडून आला नाहीं. त्यावेळच्या आवेशांत या नवीन अधिकाऱ्यांनीं व कैसरनीं एका दोघां निर्दोष सज्जन मनुष्यांना फांशीची शिक्षासुद्धां देण्याचा प्रयत्न केला; पण तसें न जमल्यामुळें त्यांना सोडून देणें भाग पडलें. गुप्त पत्रांचा सुळसुळाट जशाचा तसा कायम राहिला व या राजकीय नवीन अधिकाऱ्यांच्या निष्फळ प्रयत्नांना हंसून त्यावर टीका करावयाचा धडाका सुरू झाला. कोणाच्यानें कांहीं-सुद्धां झालें नाहीं आणि या पत्रांचे अश्लील लेखक आपले अश्लील व्यापार सारखे चालू ठेवित होते. त्यांनीं एकेक स्त्री आणि पुरुष यांना चांगल्या रीतीनें झाडलें आणि त्यांना ताळ्यावर आणलें. या

पत्रांतील निर्लज्जतापूर्ण मजकूर वाचून अनेक कोमलांगी युवतींचें हृदय शतशः विदीर्ण झालें व त्या मनांतल्या मनांत पुष्कळ शोक करीत; परंतु केवळ अब्रुच्या भीतीनें त्यांनीं ह्या बदनामी करणाऱ्या पत्रांची कोणाजवळ परिस्फुटता केली नाहीं. यावेळीं आपल्या मुलींचें व स्त्रीचें रहस्य जाणलेल्या अनेक रहिवाश्यांनीं आपली राजनिष्ठा दाखविण्यासाठीं कैसरच्या हातीं तीं पत्रें दिलीं आणि स्वतः आपल्या आणि त्यांच्या बाबतींत जारीचा शोध केला; परंतु अनेक सज्जन गृहस्थांनीं तसलें अश्लील पत्र मिळाल्यावर आपली व आपल्या स्त्रियांची बेअब्रू न होण्यासाठीं राजवाडा व महाराजांपासून अलग राहण्याचा निश्चय केला.

कैसरच्या प्रीतिपात्रांचें कैसरविषयक हृदयस्थ प्रेम नाहींसें करण्याकरितां व त्यांचें नीचत्व दाखविण्याकरितां महाराणी आगस्ट विक्टोरियांचे बंधु मि. गन्थर महोदय यांनीं ह्या अश्लील पत्रांची युक्ति काढली. एक नष्ट श्रीमती फ्लारेन्स यासंबंधीं माहिती पुरविण्याचें काम करीत होती व अनेक पत्रांतल्या बातम्या हीनें आपल्या पदरचें तिखटमीठ लावून सांगितल्या होत्या. आपल्या बहिणीच्या—कैसरीनबाईच्या—मदतीसाठीं व तिच्यावरील कैसरचें प्रेम योग्य रीतीनें पूर्ववत करण्यासाठीं त्यांच्या उपरोक्त भावानें ही गुप्त योजना केली असल्याचें संभवनीय आहे; परंतु आमच्या समजुतीप्रमाणें, कित्येक दिवसांनीं या चिठोऱ्यांना पाहून कित्येक रसिक व

उपद्व्यापी स्त्रिया व पुरुष यांना आपापला मोबदला घेण्यासाठीं तसें करणें सुरूं केलें ! ! आणि यामुळें त्या पत्रांचा इतका फैलाव झाला व त्यांची भरभराट झाली. यापैकीं कांहीं पत्रें खरोखर हितासाठीं लिहिलीं असतील; परंतु विशेषतः निराश व निरादृत प्रेमीजनांनीं आपापल्या प्रियेचें मन पुनः आपणाकडे परत वळविण्यासाठीं लिहिलीं असलीं पाहिजेत. वास्तविक जो प्रेमीजनांचा विनोद होता तो प्रेमिकांची विपत्तिरूप होता व ती बिचारी झोपेंत व जागेपणीं त्या अश्लील पत्राच्या दर्शनानें व स्मरणानें थरथरां कांपत होती.

खरोखर पाहूं गेलें तर अशा प्रकारचीं प्रेम-रहस्यें सर्व ठिकाणीं असतात; पण चतुर मनुष्य कुशलतेनें त्यांवर पांघरूण घालतो. जर्मनीचे लोक मोठे बडबडे असतात व त्यांच्या जें मनांस वाटेल तें निःसंकोचपणानें बोलून टाकितात. गप्पागोष्टी करतांना विवेकानें काम करण्याचा, स्वतः कैसरचा, स्वभाव नाहीं. अशा स्थितींत जेव्हां सर्वच आपापल्या गोष्टी आणि दुसऱ्यांचीं गुप्त रहस्यें उघडीं करितात तेव्हां ज्या सुंदर युवतींची यांना कांहीं तरी माहिती मिळते व ओळखीची बनते. तिच्या अब्रूचा संरक्षक एक परमेश्वरच ! जर्मन लोकांचा बडबड करण्याचा स्वभावच या गोंधळाचें मूळ कारण होता; नाहीं तर या गुप्त पत्रांचा इतका जोर चाललाच नसता ! !

## ९ कैसर आणि सुंदर स्त्रिया.

सौंदर्याची मिमांसा ठरविणें वस्तुतः अनुवंशिक आहे. जी रमणी एकाच्या दृष्टीनें अत्यंत रूपवती दिसतें तिच दुसऱ्याच्या दृष्टीनें सामान्य ठरते. याशिवाय नाना तऱ्हेनें स्त्रियांच्या सौंदर्यानें निर्णय करतात. कोणी पुरुष कामिनीच्या केशपाशांत अडकून राहतें; तर कोणी तिच्या भालप्रदेशावर भाळतो; कोणी तिच्या नासिकेच्या अवलोकनानें आनंदित होतो; कोणी तिच्या दंतपक्तिनें दलित होतो. कोणी तिच्या चुंबनानें चंचल होतो तर कोणी तिच्या मुखावर मोहीत होतो व कोणी तिच्या वक्षस्थळावरून आपली कुर्वंडी करितो. एकंदरींत काय कीं, कांहीं पुरुष विशेष अंगाला तर कांहीं त्या सर्वांग सुंदरतेवरून रूप लावण्याचीं मर्यादा ठरवितात.

कैसर विचित्र पुरुष आहेत. ते वर लिहिलेल्या पैकीं कोणत्याच गोष्टींत आपले मन अडकूं देत नाहींत. ज्या प्रमदेचे हात फार कोमल आणि सुंदर जिच्या हातांची बोटें पातळ व मनोहर असतात; ती यांच्या दृष्टीनें रूपवती होते. कोणी स्त्री खरोखरच सुंदर आहे किंवा नाहीं या गोष्टीची यांना विशेषशः पर्वा नसते. तिचे हात सुंदर आहेत येवढ्यावरून हे तिचें मनःपूर्वक अभिनंदन करितात. ज्या रमणीला हे अशा प्रकारें पसंत करितात;

तिला हें निष्कारण भेटतात व गप्पागोष्टी करितात; तसेंच ती परत जाण्यास निघाली असतां सर्वांच्या देखत तिच्या हाताचें एकदां चुंबन घेतात. यांना कोणी पाहत नाहीं अशा एकांत स्थलीं तिची गांठ पडली असतां हे तिच्या हातांचें व ओंटांचें किती चुंबनें घेतात त्याची गणतीच नसतें. यांच्या समजुतीनें ती स्त्री, दुसऱ्यास सुस्वरूप स्त्री जितकी मोहक दिसेल तितकीच मोहक असते. ज्या प्रेम-नदांच्या हातांचे सौंदर्य यांना पसंत वाटतें त्यांना आपल्या हातां-तील हातमोजे काढावयास लावितात व त्यांपैकीं जी यांना रूपवती वाटतें. तिच्या हाताचें हे आनंदानें चुंबन घेतात. ह्यांनीं एकवार कोठेही कोणा स्त्रीच्या सुंदर हाताचें चुंबन घेतलें असलें तर त्याची ह्यांना पक्की आठवण रहातें.

जेव्हां एखादा उत्सव, सम्मेलन अथवा प्रदर्शन समयीं यांना स्त्रियांना भूषणें वाटावयाचीं असतात. त्यावेळीं हें इतर डागीन्यां-पेक्षां कंकणें व आंगठ्या देणें व त्या आपल्या हातानें त्यांच्या हातांत घालण्यांत यांना विशेष आनंद वाटतो. या रीतीनें त्यांना त्या सुंदर हातांचें निरीक्षण करण्यास वेळ मिळतो आणि तें पाहून यांना आनंद वाटतो. एकदां याच कारणाकरितां यांनीं एका स्त्रीला आपल्या येथें बोलावून आणलें होतें. आपणाला दुसऱ्या कोणीं पाहूं नये म्हणून तिनें बुरखा घेतला होता. कैसर तिची वाट पहात बसले असतांना तेथें ती येऊन पोंहचली. ती येतांच यांनीं तिला

बुरखा काढून टाकण्याचा हुकूम फर्माविला त्याप्रमाणें तिनें आपला बुरखा काढला. तिनें अंगांत जें पोलकें घातले होते त्याच्या बाह्या मनगटापर्यंत असून त्यावर सुंदर झालर लावलेली असल्यामुळें तिचे सुंदर हात विलक्षण रितीनें खुललेले दिसत होते. ते पाहून कैसर फार खूष झाले व त्यांनीं आपल्या कपाटांतून एक सुंदर रत्नजडीत कंकणाचा जोड काढून तिच्या हातांत स्वतः चढाविला. यानंतर त्यांनीं त्या सुंदर हातांचें कित्येक वेळां चुंबन घेतले आणि तिला परत पाठविलें. ती आल्या वेळेपासून तो जावयास निघेपर्यंत तिचे सुंदर हात कैसरच्या हातांत होतें. अशा प्रकारें हे अनेक स्त्रियांना आपल्या राजवाड्यांत बोलावून आणून स्वतः कंकणें अगर आंगठ्या देऊन विभूषित करितात.

कदाचित कैसरना असें वाटत असेल कीं, कोणीही स्त्री अगर युवती असो ती यांच्या उघड प्रशंसेनें अवश्य प्रसन्न झाली पाहिजे; पण ही प्रशंसा तिच्या लज्जेला कारण होते हें यांच्या ध्यानांत क्वचितच येतें. जेव्हां भोजनसमारंभ, नाच अगर उत्सवप्रसंगीं हे एखाद्या रूपवती स्त्रीला पाहतात तेव्हां हे लागलीच तिची उघडपणें प्रशंसा करण्यास सुरुवात करितात. तशांत तिचे हात कोमल व स्तन कठीण असेल तर मग काय ? प्रशंसेची एकसारखी झोड उठवून देतात. अशा वेळीं त्यांना, आपण करतों त्या प्रशंसेनें ती स्त्री, तिचा पति

अगर पिता प्रसन्न होतील कां अप्रसन्न होतील, याचें भानच रहात नाहीं !

हे आपल्या मेजावर अनेक रूपवती स्त्रियांचीं चित्रें ठेवीत असतात. अशा प्रकारचीं चित्रें यांच्या निजावयाच्या खोलींत आणि पाहुण्यांना भेटण्याच्या खोलींत टांगलेलीं असतात. त्यांपैकीं कांहीं यांच्या हुकुमावरून काढविलेलीं असतात व बाकीच्या पैकीं पुष्कळ चित्रें यांच्या ओळखीच्या स्त्रियांनीं आपण होऊन 'प्रेम, आदर व शुभाकांक्षेसह ' आपल्या स्वतःच्या सहीनिशीं पाठविलेलीं असतात. जी युवती यांच्या मतें रूपवती होते तिचा फोटो हे तिच्याजवळून मागून घेतात अथवा अन्य उपायांनीं मागवून घेतात. जर्मनी व दुसरे देशांतल्या पुष्कळशा सुंदर स्त्रियांचीं चित्रें यांच्या उठण्याबसण्याचा, खेळण्याच्या व निजण्याच्या खोलींत ठेवलेली असतात. हे नानाप्रकारच्या स्त्रियांची, नानाप्रकारच्या वेशांतली निरनिराळी अनेक चित्रें आपल्या नजरेसमोर मोठ्या प्रेमानें ठेवितात. यांच्या खोलींत कांहीं चित्रें अशी आहेत कीं, त्यांतील कोमलांगीं स्त्रीनें नांवाला मात्र कपडे घातले आहेत ! ! यांना फार पसंत असलेले एक दोन फोटो नेहमीं यांच्याजवळ असतात. श्रीमति, लेटिशिया बोनापार्टचें चित्र याच प्रकारचें एक आहे. त्यांत विशेष हें आहे कीं, त्या सुंदरीच्या वक्षस्थळावर मोत्याच्या हाराच्या लुटपुटच्या आवरणाशिवाय दुसरें कसलेंच वस्त्र नसून तें अगदीं उघडे आहे ! याच

विलासनीचे दुसरें एक चित्र त्यांजपाशीं नेहमीं असते. त्यांत त्या स्त्रीचे सुंदर हात उघडे आहेत. तिसरें चित्र प्राशियाच्या सेनापतिची मुलगी श्रीमति, फ्राॅलिन वान वाल्किन हिचें आहे. यांच्या दृष्टीनें ती युवति त्यावेळीं ( सन १८९१ च्या सुमारास जर्मनींत अगदीं सर्वांहून सुंदर होती. कैसरनीं तिला फर्माविलें कीं, जेव्हां तुम्ही आपला नवीन फोटो काढाल त्यावेळेस त्याची एक प्रत आम्हांस पाठवावी. हे या कामिनीला फार पसंत करीत होते. हिला न बोलावतां राजवाड्यांत नाच अगर उत्सव कधीं होतच नसे. अशा प्रकारें चित्रांत चितरलेल्या अनेक सुंदर व सुकुमार स्त्रिया यांच्या खोलींत सुसज्जीत करून यांच्याकडे प्रेम दृष्टीनें पहात असतात.

प्राशियाच्या सैनिकांत अशी एक म्हण आहे कीं, "मित्रामध्यें आपसांत कोणत्याही गोष्टीचा भेद अगर वैरभाव नसतो." असें सांगतात कीं, जर्मनीचे कांहीं लोक या म्हणीच्या जोरावर 'प्रेमिका प्रवर्तन' अथवा 'पत्नि प्रवर्तन' नांवाचा खेळ खेळतात ! हा चमत्कारिक खेळ वास्तविक कोणत्या प्रकारें खेळण्यांत येत असें त्याबद्दल आम्हांला खात्रीपूर्वक कांहीं सांगतां येणें शक्य नाहीं; परंतु येवढें मात्र खास माहीत आहे कीं, एकदां १८८५ सालांत,जेव्हां कैसर व कैसरीन भरर्ज्वानींत होतें; तेव्हां हे दोघे आपला मित्र आस्ट्रियाचे रडल्फ यांची मोठी दोस्ती होती. हा आस्ट्रियन गृहस्थही तरुण वयाचाच होता व त्याची पत्नी सुंदर युवति होती. एक दिवस हे दोघे मित्र

शिकार खेळून घरीं रात्रीं परत आले. त्यावेळीं युवक कैसरनीं रडल्फला म्हटलें कीं, ‘ आपण आज पत्नि-परिवर्तन खेळ खेळूं. ’ त्या गृहस्थानें या गोष्टीस रुकार दिला; परंतु जेव्हां कैसर त्याच्या सुशिल कामिनीच्या खोलींत गेले तेव्हां तीनें मोठ्यानें आरोळी ठोकली. कैसरीनबाई तेथें जवळच दुसऱ्या खोलींत निजल्या होत्या त्या या गोंधळानें जाग्या होऊन तेथें आल्या. त्यांच्या देखत तो चमत्कारिक खेळ खेळण्याचें कैसरना साहस झालें नाहीं. अशा प्रकारें त्या रात्रींचा खेळ मातींत मिसळला. दुसरे दिवशीं त्या दोघांच्या बायकांमध्यें मोठें कडाक्याचें भांडण झालें. त्यांत प्रत्येकजण दुसरीच्या नवऱ्याला दोष देत होती. या भांडणानें त्यांच्यांत वैमनस्य उत्पन्न झालें आणि कैसर कैसरीनबाई तावडतोब जर्मनीस परत आले.

राजदूत हर्बे हे जर्मनींत फ्रान्सच्या तर्फे नेमलेले होते. त्यांचा व कैसरचा बराच स्नेह वाढला होता. बर्लिन नगरच्या पेरिसर प्लॉजमध्यें ते रहात होते. जेव्हां पहावें तेव्हां त्याच्या घरासमोर कैसरची फैटण उभी आहेच. तेथील रहिवाशी महाराजांच्या या अनुचित वर्तनाच्या मैत्रीमुळें फार रागावले होते. कारण फ्रान्स आणि जर्मनी यांत स्वाभाविक वैरभाव असतां, कैसर त्या देशच्या मनुष्याशीं नेहमीं गप्पागोष्टी करितात याचें त्यांना आश्चर्य वाटलें, इतकेंच नाहीं तर त्या मनुष्याशीं-फ्रान्सच्या राजदूताशीं-हे आपला परिचय इतका वाढवितात यांचा त्यांना राग आला होता.

इकडे यांना असा संदेह उत्पन्न होणें व तिकडे विचित्र जनवार्ता उडण्यास एकच वेळ आली. ज्या कोणाची भेट होई तो दुसऱ्याला म्हणे "महाराज, राजदूत मि. हर्बे कांहीं एकटेच येथें आलेले नाहींत. त्यांच्याबरोबर त्यांची सुंदर व रंगेली पत्निही येथें आलेली आहे आणि म्हणूनच कैसर या फ्रेंच जातीच्या गृहस्थावर इतकी कृपा करीत आहेत. ईश्वर त्यांचे मनोरथ पूर्ण करो." इकडे कैसर त्याचे येथें तसेच येत जात होते; पण हें कौतुकपूर्ण रहस्य कळल्यावर तेथील रहिवाशांचें आश्चर्यानें रसिकतेचें रूप धारण केलें. आपल्या शत्रूची-फ्रान्सची-एक कमलनयनी आमच्या कैसरला वश झाली आहे या विचारानेंच त्यांना आनंद वाटूं लागला होता. पुढें राजदूत हर्बे यांना आपली अपकीर्ति समजल्यावर तो फार घाबरून गेला.

त्यावेळेस राजवाड्यांत एक विशेष नाच व्हावयाचा होता. त्या नाचासाठीं मि. हर्बे व मिसेस हर्बे यांना मोठ्या आग्रहाचें निमंत्रण करण्यांत आलें होते. राजदूत आपल्या पत्निच्या अपमानानें मनांत सारखा जळफळत होता. त्यानें तिच्याकडून तीन दिवस अगोदर एक पत्र कैसरना पाठविलें. त्यांत लिहिलें होतें कीं, "यावेळेस महाराजांच्या सन्मानपूर्ण निमंत्रणानुरूप मला स्वतः हजर राहून आपणाला कृतार्थ करण्यास मी असमर्थ आहे. माझे पति

सद्रहू समारंभास अगत्य येतील व महाराजांच्या सेवेस सादर होतील.'
हें पत्र मिसेस हर्बे यांच्या विशेष प्रकारच्या सुगंधित कव्हरामध्यें घालून तें केसरकडे पाठविण्यांत आलें. तें मिळतांच केसरचें हृदय आनंदानें उचंबळून गेलें व त्यांनीं झटझट तें फोडून आतील श्रीमतिच्या सुंदर अक्षरांचे पत्र वाचलें. तें वाचतांच त्यांना असा भास झाला कीं, जणू काय एखाद्या विषारी सर्पानेंच त्यांना दंश केला ! त्यांनीं तें पत्र पुनः पुनः वाचलें पण त्यांत काय आणखी लिहिलें होतें ? जो काय मजकूर होता तो यांनीं एकदां वाचलाच होता; पण त्यावर विश्वास न बसतां हे आपल्या नेत्रांवरच अविश्वास ठेवित होतें !

आपणाला माहीत असेलच कीं, एकदां एक भृंगा कमळांत अडकून राहिला होता. तो त्या कमळांतील मकरंद चाखावयास मेला होता, पण सायंकाळ होतांच तो त्यांत अडकून पडला. त्यावेळेस त्याला फार दुःख वाटलें व तो मनांत म्हणू लागला कीं, सर्व रात्र जाईल, प्रातःकाळ होईल व नंतर कमळ पुनः उकलेल तों पावेतों मला अडकवून पडणें भाग आलें ! ! तो या विचारांत गुंग आहे तोंच एका हत्तीनें तें कमळ तोडून टाकलें. मिसेस हर्बेच्या पत्रानें केसरची हुबेहुब तशीच स्थिती झाली. आतां त्यांना वाटत होतें कीं:—

"हाय ! हाय ! हत्तीनें नलिनीला मुळासकट उपटून टाकलें ! "

मिसेस हर्वेचें पत्र हातांत असतांनाच त्यांनीं आपल्या मुख्य कारभाऱ्याला बोलावून हुकूम दिला कीं, "नाचासाठीं ज्यांना निमंत्रण दिलें असेल त्या सर्वांना आताच्या आंता जाऊन सांगा कीं, परवांच्या दिवशीं होणारा नाच तहकूब ठेवण्यांत आला आहे !"

नंतर यांनीं आपल्या मनाशीं ठरविलें कीं, मि. हर्वे यांना आपल्या राजधानींतून घालवून दिल्याशिवाय आपणाला चैन पडणार नाहीं; व त्याप्रमाणें लवकरच घडून आलें.

मिसेस थेरेसी मोठी थट्टेखोर युवति होती. नाचणें, सिगारेट ओढणें, खेळ खेळणें, सर्वांची चेष्टा करणें, हास्यकारक गोष्टी सांगणें, दुसऱ्यांचे हास्यजनक अनुकरण करणें वगैरे कलांत ती पूर्ण निष्णात होती. एकदां ती प्रवासास गेली होती; त्यावेळेस तिला पहिलें मूल झालें ! या विचित्र घटनचा वृत्तांत ती सर्वांना मोठ्या चावटपणानें सांगत असे. कधीं कधीं ही जमिनीवर व गवतावर लोळत पडे आणि आपल्या बरोबरच्या स्त्रियांचें पाय घट्ट धरून ठेवून आपणाला फरपटत ओढींत नेण्यास ता त्यांना सांगे. हिच्या अंगीं थट्टेखोरपणा व छिचोरपणा पूर्णपणें भरलेला होता. तसेंच सौंदर्य वगैरे सर्व गोष्टी तिला अनुकूल होत्या. तिची अनेक राजांशी ओळख व संबंध होता यामुळें सर्वजण हिला मान देत. ही चहुंकडे जात असे. हीनें आपल्या हावभावानें, गप्पागोष्टींनें व ढीलपंसत गोष्टींनीं कैसरलासुद्धां चकित करून सोडलें होतें आणि त्यांचेबरोबर भलत्याच

रीतीनें वागून त्यांना चीड आणीत होती. हिच्या छिचोरपणाच्या वागणुकीनें सर्व स्त्रियांना भीति वाटत होती व त्यांना असें वाटे कीं कांहीं चमत्कारपूर्ण योगायोग येऊन हिची अशी फजिती व्हावी कीं, हिला पुनः वर तोंड करण्यास देखील जागा न रहावी.

एकदां मिसेस थेरेशीला मोठ्या विचित्र घटनेला तोंड द्यावें लागलें. कैसर शिकार खेळण्यासाठीं गेले होते; मागाहून कित्येक स्त्रियांही तेथें जाण्यास निघाल्या. ही बाई एका मोठ्या घोड्यावर स्वार होऊन मोठ्या तातडीनें पुढें निघाली. तिला वाटत होते कीं, आपण सर्वांच्या अगोदर जाऊन कैसरना भेटूं. तिच्या मागें कांहीं अंतरावर मि. बैकमेयर आणि कांहीं सैनिकही होते. या बाईचा घोडा वायुवेगानें धावत असून तो तिला अनावर झाला होता. ही आपल्या चेष्टेखोर गोष्टीनीं दुसऱ्यांच्या गोष्टी थांबवित होती; पण यावेळीं तिला आपला घोडा आवरतां येईना. धावतां धावतां तो घोडा अशा एका रस्त्याला गेला कीं, त्याच्या दोनी बाजूस ठेंगण्या झाडांची रांग होती. त्या झाडांच्या डहाळ्या प्रायः घोड्या-इतक्याच उंचीवर इकडे तिकडे पसरल्या होत्या. जेव्हां या बाई त्या ठिकाणीं पोंहोचल्या तेव्हां यांचा झगा त्या टहाळ्यांत गुंतून राहिला, घोडा पुढें निघून गेला व ही त्याच्या पाठीवरून घसरून खालीं आली. झगा वर डहाळ्यांत गुंतला आणि ही बाई बहुतेक नागवी आपल्या गुडघ्यावर नेट देऊन तेथें बसली. यापेक्षां विशेष

गमतीची गोष्ट म्हणजे त्या बाईंना या धांदलींत कांहीं दुखापत झाली नाहीं. नाहीं तर या सर्व तमाशाची मौजच नाहींशी झाली असती.

यावेळीं मिसिस थेरेसीच्या लज्जेला पारावार नव्हता. आपल्या स्वतःला त्या कांट्यापासून सोडवून घेणें तिच्या शक्तीबाहेरचें होतें; कारण ती ठेंगणी होती. ती बिचारी मनांतल्या मनांत फार खजील झाली कीं, इतक्यांत मागून मि. बेकमेयर व सैनिका यांच्या घोड्यांच्या टापा ऐकूं येऊं लागल्या ! कां ? बाईसाहेब ? आजपर्यंत आपण चेष्टा करून दुसऱ्यांना लाजवीत असतां पण आज तर तुम्हां-वरच तसा प्रसंग येऊन ठेपला आहे ! तुम्ही उठलां तरी तुमची लाज जाते व न उठलां तरी लाज जाणार. शिवाय उठणार नाहींत तर अशा किती वेळ पर्यंत बसणार ? मि. बेकमेयर व सैनिक येतांच त्यांनीं त्या बाईला उठविलें. तेव्हां ती बाई फार लज्जीत होऊन त्यांना म्हणाली ' नाहीं, नाहीं. मी खालीं बसलेलीच बरी. '

मि. बेकमेयरः--' नाहीं. आपण कृपा करून या झाडाला पाठ टेकून उभ्या रहा; मी आपल्यापुढील झगा नीटनेटका करितो. '

त्या बाईनें लाचार होऊन हे म्हणणें मान्य केलें आणि त्या गृहस्थाच्या म्हणण्याप्रमाणें ती झाडाशीं उभी राहिली. इतक्यांत मि. बेकमेयर पुढें म्हणाले:--

' हां ! आतां थोडा वेळ जरा वर बघा पाहूं ! '

‘ हाय ! हाय ! मला फार लाज वाटतें. ’

‘ ठीक. येथें असलेल्या सैनिकांपैकीं ज्यांचे लग्न झालेलें नाहीं त्या सर्वांनीं आपलीं तोंडें दुसरीकडे वळवावीं. ’

त्या सैनिकांनीं त्याप्रमाणें केलें आणि मि. बैकमेयर यांनीं त्या बाईचा बाजूस गेलेला झगा नीटनीटका केला. नंतर एक घोडा मागवून आणून त्यांजवर त्यांना बसवून रवाना केलें. ही एक कौतुक-मय आकस्मिक गोष्ट घडली; पण त्या चेष्टेखोर बाईला राहववलें नाहीं. तिनें आपल्या मैत्रिणीला झालेली सर्व गोष्ट इत्थंभूत सांगितली; नंतर ती गोष्ट राजवाड्यांत सर्वत्र पसरली. ही विचित्र हकीकत ऐकणा-राची हंसून हंसून मुरकुंडी वळे व असल्या चमत्कारिक बाईंचे तोंड बंद करण्यास हें हास्यजनक कौतुक एक उत्तम उपाय आपल्याला सांपडला या विचारानें आनंदित होत.

# १० कैसरचे ऑफिसर्स आणि नोकर.

कैसरचा अभिमान बराच वाढलेला आहे. हे समजतात ' मी ' मीच आहे आणि माझ्याशिवाय सर्व जर्मन-या देशांतले रहिवाशी आणि राज्यांतले नोकर-हे वेगळेच आहेत. ते सर्व माझ्या आधीन रहाण्यासाठीं, माझा जाच सहन करण्यासाठीं व मला सुख देण्यासाठींच उत्पन्न झालेले आहेत. जर कोणी पुरुष अगर स्त्री, बालक अगर बालिका यांच्या उपरोक्त उद्देशाविरुद्ध कधीं वागले तर त्यांच्याकडील यांचें मन फिरतें; नाहीं तर कधीं बिघडतें. दुसरी स्थिती प्राप्त झाली असतां त्यांचे हे जें कांहीं करतील तेवढें थोडेंच आहे !

जर्मन प्रजेपैकीं बरेंच लोक दबले न जाणारें आहेत. ते साधारणतः यांच्या गर्विष्ठ बाता, अभिमानदर्शक कामें व उद्दाम स्वभावाला भीक घालीत नाहींत. त्यांपैकीं पुष्कळांच्या वरचे यांचें धमक्यांचें वाग्प्रहार व्यर्थ होतात. उद्दाम जर्मन लोक आपल्या उद्दाम महाराजांबरोबर दोन हात करण्यास तयार असतात. परंतु ऑफिसर व नोकर लोकांची वेगळी स्थिती आहे. ते अपमान, अनादर, दुःख व कष्ट सहन करितात; परंतु साधारणतः त्याच स्थितींत आपलें आयुष्य कंठितात. काय करतील बिचारे! कांहीं उपाय चालत नाही व उपजीविकेचें दुसरे उपाय शोधून काढणें सर्वांनाच

मोठें कठीण आहे. हें खरें आहे कीं; अनेक ऑफिसर व नोकर लोक यांच्यापासून अलग होऊन दुसरीकडे मिळेल तशी अर्धी-चतकोर भाकरी खाऊन आपले दिवस चालवितात. मोठमोठ्या ऑफिसरांची ही स्थिती तर छोट्या छोट्या नोकरांची गोष्टच बोलणें नको. वस्तुतः कैसर, आपल्या मुख्य प्रधानापासून तर एका सामान्य सेवकांपर्यंतच्या सर्वांना आपले नोकरच समजतात आणि त्या दृष्टीनें त्यांच्याशीं मन मानेल तसें वर्तन करितात. हे त्या सर्वांना केवळ 'बुद्धिहीन मदतगार' समजतात. एक वेळ यांनीं सुप्रसिद्ध बिस्मार्कसंबंधींसुद्धां असे उद्गार काढले होते कीं; "ते माझ्या बाबांचे एक बुद्धिहीन मदतनीस होते."

रात्रीं अगर दिवसा, जेव्हां यांची लहर लागते त्यावेळेस ते आपल्या ऑफिसरांना आपलेजवळ कामासाठीं बोलावीत असतात. झोपेंत अगर जागृतींत वाटेल त्यावेळीं त्यांना आपलाच वेळ आहे असें वाटतें व त्याप्रमाणें हे त्यांना वाटेल त्यावेळीं न बोलावतील तरच आश्चर्य समजावयाचें. कोणीही ऑफिसर आपलें खाजगी काम बिनधोक करूं शकत नाहीं. कारण त्याला धास्ती वाटत असते कीं; केव्हां मला बोलावण्यास महाराजांचा मनुष्य येईल याचा नेमच नाहीं. थंडीच्या दिवसांत ७ वाजल्यापासून आणि उन्हाळ्यांत सकाळीं ६ वाजल्यापासून त्यांना तयार रहावें लागतें. नंतर मग रात्रीं १२ वाजेपर्यंतसुद्धां कैसरचें काम चालतें व त्यावेळेस यांना

सर्वांना अगर त्यापैकीं कांहींजणांना हे बोलावणें पाठवितात. या सर्व गोष्टी आम्ही बऱ्याच उच्च पदाधिष्ठांत ऑफिसरांच्या—मुख्य प्रधान, खजिनदार, सेनासचिव, दुसरे मुख्य प्रधान, प्रधानमंडळाचे सभासद यांच्याच—बाबतींत सांगत आहोंत. दुसऱ्या श्रेष्ठ व कनिष्ठ प्रतीच्या नौकरांच्या बाबतींत तर बोलण्याची सोयच नाहीं. खरें विचारलें तर त्या बिचाऱ्यांचें नशीबच खडतर! जेथें मोठमोठे ऑफिसर सामान्य सैनिकांप्रमाणें लेखले जातात तेथें सामान्य सेवकांच्या भाग्याचा मालक भगवान परमेश्वरच आहे.

प्रवास, विनोद व कौतुक यांपासून कैसरना जेव्हां सुट्टी मिळते तेव्हां हे राजकारभाराचें काम पाहतात. तें बिघडो वा चांगलें होवो त्यांची त्यांना तितकी काळजी वाटत नसते. मंत्रीजन राज्यकारभारासंबंधीं तितकेंच दक्ष असतात व सदोदित नानाप्रकारच्या चिंता करीत असतात; पण महाराजांच्या विचित्रपणानें कधीं कधीं त्यांच्या प्राणावरसुद्धां येऊन बेतते. उंच उंच पदवीच्या जागेवर ६० वर्षांहून अधिक वयाचे अनुभवीक लोक नेमण्यांत येतात. त्यांना कधीं कधीं कैसर हुकूम देतात कीं, आज तुम्हीं आपल्या कामाचा अहवाल आम्हांला सांगण्याकरितां रात्रीं १० वाजतां ट्रेनमध्यें भेटावें. अथवा प्रवासाहून परत आले असतां रात्रीं १२ वाजतां अगर पहांटे ३ वाजतां आपल्याला भेटण्यास सांगतात. ते अशा वृद्धावस्थेंतसुद्धां तितक्या अपरात्रीं उठून यांना ठरलेल्या ठिकाणीं भेटावयास

जातात ! ते तेथें आपला पोषाक करून घंटाभर अगोदर जाऊन बसतात. या मंत्र्यांच्या कामाच्या महत्वाचें मोठमोठ्या रिपोर्टीपैकीं अर्धेमुर्धे रेल्वे स्टेशनवर वेटिंगरूममध्यें अगर गाडीच्या डब्यांत ऐकतात व बाकीचा भाग एखाद्या सहलीच्या वेळेस आपल्या फेटणमध्यें ऐकतात. इतकें करूनही कांहीं ऐकावयाचें राहिलेंच तर ते मुख्य दरबारांत ते ऐकतात.

रात्रीं १० अगर ११ वाजतां हे उत्सव, भोजन अगर नाटक समारंभाहून परत आल्यावर त्यावेळेस कधीं कधीं कोणा मंत्र्याचा अहवाल ऐकण्यास तयार होतात. यावेळीं ते जर फेटणमध्यें असले तर तींत अगर त्यांच्यासह एखाद्या रेल्वेगाडींत बसून ते प्रधान आपला अहवाल कैसरना ऐकवितात. यावेळीं जर्मनीच्या राज्यांतील महत्वाच्या व्यवस्था, अवश्यक सूचना व प्राणदंडाच्या माफीची प्रार्थना वगैरे विषयांचा ऊहापोह होत असतो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. एकीकडे प्रधान आपली हकीकत सांगत असतो; तर इकडे हे झोंप घेऊं लागतात. यांना झोंप लागलेली दिसत असतांनासुद्धां बिचारा भीतीनें आपलें वाचनाचें काम चालूच ठेवीत असतो. त्याच्या गप्प राहण्याच्या वेळेसच जर हे जागे झाले तर त्या बाबतींत कांहीं तरी बरावाईट निकाल सांगून त्या प्रधानास ते वाटेस लावितात. कधीं कधीं हे त्यांचे रिपोर्ट आपणांजवळ ठेवून घेऊन, ' मागाहून निकाल देऊं तुम्ही आज जा. ' असें त्यांना सांगतात.

कधीं कधीं राजवाड्याच्या आसपास हे शिकारीसाठीं जातात व सर्दी झाल्याकारणानें हे तो विचार सोडून देऊन परत राजवाड्यांत येण्याचा विचार करितात; तेव्हां ताबडतोब तार अथवा टेलिफोनच्या द्वारें हे दोनतीन प्रधानांना आपापलें काम घेऊन अमक्या वेळेस राजवाड्यांत येण्याचा हुकूम सोडतात. ते बिचारे हुकूम मिळतांच कैसरच्या सेवेस सादर होण्याकरितां ठरल्यावेळीं धांवत येतात. परंतु इकडे हे थोड्याच वेळांत आपला शिकारीचाच बेत कायम ठेवून तेथेंच रहातात. तिकडे बिचारे वृद्ध प्रधान राजवाड्यांत यांची मार्गप्रतीक्षा करीत बसलेले असतात ! यांना तेथें येवढाच निरोप कळतो कीं; महाराज शिकार झाल्यावर रात्रीं येणार आहेत व त्याप्रमाणें ते तेथें तिष्ठत बसतात !! तसेंच हे ज्यावेळेस त्यांचे रिपोर्ट स्टेशनवर ऐकतात तेव्हां रात्रीं ११ वाजतां त्यांना धांवत स्टेशनवर यावें लागतें; व कैसरनीं आपला बेत बदलला असला तर ते वृद्ध मंत्री सर्व रात्रभर त्या स्टेशनवर थंडीनें कुडकुडत बसलेले असतात.

कैसरच्या या विचित्र वागणुकीनें तेथें एक म्हण प्रचारांत आली आहे कीं, ज्या मंत्र्याला येथें काम करावयाचें असेल त्यानें आपला एक कान टेलिफोननवळ ठेवला पाहिजे, एक डोळा घड्याळाच्या कांट्याकडे व दुसरा रेल्वेच्या टाइमटेबलाकडे ठेवला पाहिजे.' जेव्हां उत्सव, भोजन व नाटकाहून परत येत असतांना कैसर गाडींत

रेल्वेस्टेशनवर किंवा रेल्वेगाडींत प्रवास करितांना, फिरतांना व झोंप घेतांना जर्मनीच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं कामाचा निकाल लावतात; तेव्हां या ऑफिसरांच्या बाबतींत तर कांहीं बोलण्याची सोयच नसते. जेथें केसर राज्यविषयक महत्वाच्या बाबींना क्षुल्लक लेखितात; तेथें प्रधानांच्या महत्वाच्या सामान्यपणाला अनुचित म्हणण्यास कोण तयार होईल ? या ऑफिसरांना हिंडता हिंडता पुरेसें होतें वे चित्तास स्थिरता रहात नाहीं.

यांच्यापैकीं ज्याच्यावर हे प्रसन्न होतात त्यांच्या येथें हे कधीं कधीं जातात व आणखी पुनः आपल्या कित्येक सोबत्यांसह त्याचे येथें जाऊन त्याचे हजारों रुपयांचा चुराडा उडवितात. येव-ढेंच होतें तरी बरें होतें; परंतु हे कधीं कधीं तर केवळ एक घंटा अगोदर आपल्या येण्याची सूचना देतात व नंतर आपल्या अनेक मित्रांसह त्याच्या घरीं जाऊन थडकतात. तेवढ्या वेळांत त्या बिचाऱ्याला धांवपळ करून त्यांची सत्काराची सामग्री एकच करावी लागते !

एकदां केसरनीं मुख्य प्रधान होहेनलोह्य यांना आपल्या कामाच्या रिपोर्टसह नक्की सकाळींच सात वाजतां स्टेशनवर येण्याचा हुकूम सोडला. यांची समजूत होती कीं, माझा आज्ञा-भंग करण्याची कोणास ताकद नाहीं; सबब नेमल्या ठिकाणीं व नेमल्या वेळीं मुख्य प्रधान अवश्य तेथें राहणार याविषयीं त्यांची

पकी खात्री होती. रेल्वे स्टेशनवर येतांच त्यांना कळलें कीं, राज-कुमारी होहनलोह्य आपली वाट पहात रेल्वे ट्रेनमध्यें बसली आहे. तेव्हां यांना वाटलें कीं, महामंत्री खास आजारी झाला असला पाहिजे व म्हणून तो आला नसावा. कैसरनीं झटकन पुढें होऊन हस्तांदोलन करण्याच्या अगोदर राजकुमारीला विचारलें:--

'राजकुमार होहेनलोह्य कांहीं आजारी आहेत काय ? या वेळेस आमच्या महामंत्र्याच्या आजारी होण्यानें कामाचा बराच गोंधळ उडणार आहे.'

राजकुमारी:--'नाहीं महाराज; ते आजारी नाहींत. यावेळेस ते निजले आहेत.'

कैसर:--आँ ! आम्ही हजर रहाण्याचा हुकूम दिला आहे अशा वेळीं झोप घेत आहेत ?'

राजकुमारी:--छे: छे: महाराज, आपण कदाचित विसरून गेला असाल कीं, आपण त्यांच्या वृद्धपणाकडे नजर देऊन त्यांजकडून काम करवून घ्याल ही गोष्ट आपण मान्य केल्यावर मग त्यांनीं आपलें काम पत्करलें आहे. थंडीच्या दिवसांत येथें सकाळीं ७ वाजतां हजर रहाण्याबद्दलचा या व्यवस्थेच्या विरुद्ध नाहीं काय ? यावरून मला असें वाटलें कीं, ती तार आपण स्वत: दिली नसून कोणी दुसऱ्यानेंच मधल्यामध्यें दिली असावी. अवश्यकता असलेले सर्व रिपोर्ट आपणाबरोबरच आणले आहेत.

कैसर—तें ठीक केलें; पण आपणाला ठाऊक आहे कीं, आमच्या हुकुमाला न माणणें——

राजकुमारी:——छे: छे: आपण काय माझी चेष्टा करीत आहां. महामंत्री केप्रिवी वगैरेंचीं गोष्ट अलग होती; परंतु आम्ही सर्व राजवंशीय आहोंत व आपापणांत या गोष्टींची काय शोभा येईल कीं ? कृपा करून हे रिपोर्टाचे कागदपत्र आपले जवळ ध्यावेत.

मग लाजून जाऊन कैसरनीं ते कागदपत्र आपणाजवळ ठेवून घेऊन राजकुमारीला परवानगी दिली. ज्या महामंत्री होहेनलोहनां यांनीं असल्या भलत्याच वेळीं स्टेशनवर बोलाविलें होतें. त्यांचें वय जवळ जवळ ७८ वर्षांचें होतें. सांगा. या विचित्रपणाला कांहीं मर्यादा आहे कां ? हे महामंत्रीही स्वत: राजवंशीय होते सबब त्यांनीं कैसरच्या हुकुमाची कांहींच पर्वा बाळगली नाहीं; परंतु दुसऱ्या कोणाच्यानें असें करवलें नसतें. त्याला अनादर व कष्ट सोसून बहुधां यांच्या बऱ्यावाईट वारंवार होणाऱ्या आज्ञा पाळाव्याच लागल्या असत्या ! !

कैसर राजवाड्यांत असतांना जर कोणी उच्च पदवीचा गृहस्थ यांजकडे कांहीं महत्वाचें काम घेऊन आला तर हे त्या गोष्टीला मागें ठेवून त्यांच्याबरोबर दुसऱ्याच गप्पा मारण्यास पहिल्यानें सुरवात करितात. हे शिकारीहून परत आल्यावर आपण

मारलेल्या अनेक प्राण्यांना मेजावर मांडून ठेवतात व जो कोणी मंत्री कांहीं काम घेऊन यांजकडे येतो त्यांच्याशीं त्या प्राण्यासंबंधीं अमोदूर गप्पा मारितात व नंतर त्यांच्या त्या कामाकडे लक्ष देतात. वास्तविक हीं कामें राज्यविषयक महत्वाचीं असून त्यांचेमुळें महाराज्याचा भाग्यनिर्णय व्हावयाचा असतो.

आपल्या ऑफिसरांना हे कधीं कधीं राजवाड्यांत भोजनास बोलावितात पण हा सन्मान ह्मणजे त्यांपैकीं कित्येकांची व्याधीच होय. त्यांना बहुधा आपल्या राजदरबारी पोषाकांत रहावें लागतें. हे राजदरबारी थाटांचे पोषाक बरेच तंगतंगीत असल्यामुळें यांना चांगल्या रीतीनें खातां अगर पीतां येत नाहीं. शिवाय त्यांना आणखी अशी भीति असते कीं, कैसर अगर कैसरीन कोणत्या वेळीं अचानकपणें काय विचारतील व त्यास आपण काय जबाब बावा ? याशिवाय कधीं कैसरनीं एखाद्याची कुचेष्टा करण्यास आरंभ केला तर त्याला त्या सर्व गोष्टी मुकाट्यानें ऐकून घ्याव्या लागतात. मुख्य धोरण हें आहे कीं, राज्यविषयक काम करावयाचें असो अगर भोजनास येऊन बसावयाचें असो, बहुधां सर्व पदाधिकारी यांचे जीव मोठ्या संकटांत असतात व जेव्हां हे तेथून सुटतात तेव्हां ते आपणास धन्य समजतात ! !

जो ऑफिसर कैसरशीं गप्पागोष्टी करतो त्याला तर आकाश ठेंगणेंच होतें. तो केवळ यांच्या खुशामतींत आपला सर्व वेळ घाल-

वितो व दुसऱ्या कोणाची मुळींच पर्वा पाळीत नाहीं. यांच्यापैकीं कोणी कोणी तर इतके धीट बनतात कीं, ते राजकुमार व राजकुमारींनासुद्धां आश्चर्यचकित करून सोडतात. एकदां सन १८८८ मध्यें हल्लींच्या कैसरीनबाईंनीं, या प्रकारच्या राजवाड्यांतल्या एका कारभाऱ्याला, मूल्यवान मद्याचा एक ग्लास पाठवून देण्याचा हुकूम केला; तेव्हां त्यानें स्पष्ट जबाब दिला कीं:—

'केवळ राजवधुकरितां तें मद्य पाठविलें जाण्याइतकी यंदाच्या अंदाजपत्रकांत बचत नाहीं. हां, राजकुमार विलियमनांच जर पाहिजे असतें तर आणखी एक दोन ग्लासही पाठविले असते तर निराळी गोष्ट आहे.'

या प्रगल्भ उत्तरानें कैसरीनबाईंचे हृदय क्रोधानें जळावयास लागलें; परंतु त्यांनीं त्यावेळेस गप्प बसणेंच उचित आहे; ठरविलें. सामान्यतः कांहीं कारभाऱ्यांच्या हलगर्जीपणानें त्यांना असेंच अनवश्यक श्रम करणें भाग पडतें. हीच स्थिति आतांसुद्धां असेल असें अम्हांला सांगतां येणार नाहीं; परंतु कित्येक वर्षांपूर्वी लहानलहानें वस्तुसुद्धां मागण्यासाठीं न जाणों किती त्रास पडत असेल. एखादी नवीन जिन्नस पाहिजे असल्यास त्याची सूचना राजवाड्यांतील कारभारी यांजकडे प्रथम जावी लागतें. नंतर त्यांच्या किंमतीचा अंदाज करण्याचे कामासाठीं हे प्रकर्ण दुसऱ्या कारभाऱ्यांकडे जातें. नंतर ते तपासण्यासाठीं, किंमत बेताशीच पडली किंवा,

नाहीं हें पाहण्याकरितां तिसऱ्या कारभाऱ्याकडे जातें. नंतर रुपये मिळण्यासाठीं चौथ्या कारभाऱ्याकडे जातें व त्यांजकडून मिळा-लेल्या रुपयांसह ते प्रकर्ण वस्तु आणण्यासाठीं पांचव्या कर्मचारीकडे पाठविलें जातें. याप्रकारें सहा किंवा सात दिवसांत १० अगर २० रुपयांची जिन्नस कैसरीनच्या हातीं येऊन पडतें. राजवाड्यांत जेव्हां एखादी वस्तु पुन्हा नवी मागविण्याचा प्रसंग येतो तेव्हां त्याच्यासाठीं जी जिन्नस मागविली असेल त्याला अडचण सोसावी लागते. या हास्यजनक प्रकाराला स्वतः कैसरची असाव-धानता, कारभाऱ्यांची प्रगल्भता किंवा नियमांची शिथिलता यांपैकीं कोणतें नांव द्यावें तेंच आम्हांला समजत नाहीं.

कैसरच्या हुकुमानें कां आपोआप, राजवाड्यांतील कांहीं कारभारी अति कंजुष बनतात तें सांगतां येत नाहीं. जेव्हां एखाद्या वेळीं कोणी दूर देशाचा राजा अथवा महाराजा यांच्या येथें आला म्हणजे कधीं कधीं यांना दारिद्र्य येतें. सन १८८९ मध्यें इंग्लंडचे युवराज जर्मनीस आले. त्याच्याबरोबर बरेंचसे नोकर होते. त्यांचे विशेष मित्र, वरिष्ट कारभारी वगैरे तेथें कैसरच्या येथेंच जेवत होते; परंतु नोकर लोकांसाठीं तयार केलेलें साधें जेवण त्याकडे पाठवून दिलें जाई. तेथील व्यवस्थापक आपल्या मनाप्रमाणें त्याच्याकडे जेवण पाठवीत असत, परंतु तेथें अशी चळवळ उडून गेली होती कीं, आह्मी सर्व उपाशी मरत आहोत. इकडे दुसऱ्या वस्तुशिवाय

त्या नोकरांनीं आपणासाठीं मांस व अंडीं मागितलीं. त्यावर मुख्य जर्मन कारभाऱ्यानें त्या वस्तु देण्याचें नाकारलें; पण तें इंग्रज यांचें थोडेंच ऐकतात ! असंतुष्ट होऊन त्यांनीं मोठी गडबड माजविली, जेव्हां राजवाड्यांतल्या त्या कारभाऱ्यानें यांना धमकी दिली कीं, आम्ही तुम्ही सर्वांबद्दल कैसरकडे तक्रार करूं. तेव्हां ते इंग्रज लोक म्हणाले:—

" हो, हो, तुम्ही जरूर तक्रार कराच. आम्ही पण त्याचीच वाट पाहून आहोंत. आमच्या युवराजांस ही गोष्ट कळली ह्मणजे ते आमच्या जेवणाची दुसरीकडे कोठें तरी सोय करतील ! ते मोठे उदार आहेत ! तुमच्या येथें तर आह्माला पोटभर खावयालासुद्धां मिळत नाहीं ! "

हे इंग्रज नोकर जर्मनींत होते तोंपर्यंत त्या कारभाऱ्यांशीं नेहमीं भांडत असत; परंतु तो काय त्यांना दाद देतो ? त्यानें आपली चिमूट जशीच्या तशीच कायम ठेविली, आणि एक दिवस कैसरीनबाईंच्या समक्ष तो म्हणाला:—

" इंग्लंडच्या युवराजांनीं कोठून दुष्काळपिडीत लोक जमा करून आणले कोणास ठाऊक ! "

जमलें त्याप्रमाणें खाऊन पिऊन व भांडण तंटा करून या खेपेनें इंग्लंडच्या युवराजाचे नोकर त्यांच्याबरोबर परत गेले. १८९२ मध्यें पुनः युवराज जर्मनींत जात आहेत अशी वर्दी पुढें आली होती; पण त्यानंतर कांहीं दिवसांनीं अशी खबर आली कीं, युवराजांनीं आपला बेत फिरविला. यानंतर जर्मनींत थट्टेखोर लोकांनीं अशी गप्प उठविली कीं:—

"अहो, युवराज तर येत होते; परंतु जेव्हां ते पहिल्यानें आलें होतें तेव्हां त्यांच्याबरोबर आलेल्या नौकरांना येथें उपाशीं रहावें लागल्यामुळें त्यांनीं यावेळीं जर्मनीस येण्याचें नाकारल्यामुळें लाचार होऊन युवराजांना येथें येण्याचा विचार सोडून देणें भाग पडलें."

मोठमोठ्या ऑफिसरांचा अनादर करणारा, आपल्या सामान्य नौकरांना कसें वागवीत असेल याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. कैसरच्या हिशोबीं हा सर्व चोरांचा समुदाय आहे. त्यांच्याशीं पूर्ण कठोरतेनें वागणूक होत असते. महाराज या सर्वांचें अर्धेच नाव पुकरतात व आणखी त्याबरोबर "ओ, वे" अगर "ये, अरे" लावितात. हे जेव्हां त्यांना एखादें काम सांगतात. तेव्हां निमे भाषण हे तोंडातल्या तोंडांत करितात; आणि मग तो हुकूम काय होता हें कळण्याकरितां दुसऱ्यांदा विचारावयाचें कोणाला धैर्य होत नाहीं. अशा स्थितींत त्यांना जेवढें कळतें तेवढेंच करितात आणि न समजलेला भाग आपल्या बुद्धिसामर्थ्यानें ताडून त्याप्रमाणें करितात.

साधारणतः कोणी नोकर आपल्यासमोर उभा असलेला कैसरना आवडत नाहीं. जरी हे सर्व त्यांच्या नजरेसमोर असतात. तरी हे अशी तक्रार करीत असतात कीं, जेव्हां पहावें तेव्हां हे पाजी माझे समोर उभेच असतात. अशा स्थितींत हे राजवाड्यांतील मुख्य कारभाऱ्याला असा दम देतात कीं;

" पहा, मी हजार वेळां तुम्हांला सांगितलें कीं, या पाजी लोकांपैकीं कोणीसुद्धां माझ्यासमोर नकोत. परंतु तुमच्यानें कांहींसुद्धां होत नाहीं. पुढें लक्षांत ठेवा कीं, हे सर्व आपापलीं कामें संप-

वून दुसरीकडे गेले पाहिजेत. माझ्या दृष्टीसमोर यांच्यापैकीं कोणी-सुद्धां येऊं नये."

याचा बंदोबस्त रहाण्यासाठीं असा एक नियम घालून देण्यांत आला आहे कीं; कैसर निजतात तेवढ्या वेळेखेरीज, ते राजवाड्यांत असतांना, कोणी ही नोकर त्यांच्या खोलींत येतां कामा नये इतकेंच नव्हे तर खोलीच्या जवळपाससुद्धां हिंडतां कामा नये!

अशा स्थितींत कैसर निजल्यावर हे काम करण्याकरितां जातात; परंतु जर यांचे डोळे एखादे वेळेस पहिल्यानेंच उघडल्याबरोबर अर्धवट झालेलें काम तसेंच टाकून देऊन त्यांना तेथून निघून जाणें भाग पडतें. त्याचप्रमाणें नोकर काम करीत असतांना हे बाहेरून आले तर यांच्या जाण्याच्या रस्त्यापासून ते दूर पळून जातात. त्याबरोबर ते जर एखादा शब्द बोलले अगर कोणीं मागें पाऊल टाकलें कीं, त्याची कमबख्ती भरलीच समजावयाची. एकदां एक दासी काम करीत होती. इतक्यांत कैसर अचानक आले. ती बिचारी मोठ्या अडचणींत सांपडली. तिला बाहेर जाण्यास रस्ता न मिळाल्यामुळें ती भिंतींत असलेल्या जाळण्याचे कोळसे ठेवण्याच्या जागेंत घुसून बसली आणि मग जेव्हां कैसर शेजारच्या खोलींतलें आपलें काम संपवून बाहेर गेले तेव्हां ती बिचारी, पाऊण तासानें त्या भट्टीं-तून कोळशाच्या काळ्याकुट्ट रंगानें रंगून गेलेली अशी बाहेर निघून गेली.

एक बाजूनें त्या नोकरांना ते इतकी तंबी देतात. तर दुसरे बाजूनें पहावें तों त्यांना राहण्यासाठीं घर व खाण्यापिण्याची तर-तूद केली जात नाहीं. त्या बिचाऱ्यांची सर्व शोभा सरकारी पेहराव

आणि भयकेमाच टोपींतच खलास होते. याचप्रमाणें यांना अनेक दुःखें भोगावीं लागतात. यांना दृष्टीनें पहावयाला सर्व कांहीं तयार असतें परंतु जेव्हां यांच्या खाण्यापिण्यासंबंधानें गोष्ट निघते तेव्हां त्यावर असें उत्तर दिलें जातें कीं, हे आपल्या परवानगी शिवाय आणखी लोकांचें घर लुटणार कीं काय ? आणि पगार कमी असल्याबद्दल गोष्ट काढली कीं, उत्तर असें मिळावयाचें कीं. तूर्त खजिन्यांत शिल्लक नाहींत. हें सर्व नोकर अशा प्रकारें दारिद्र्यांत राहिल्यानें त्यांना पहातांच हे महाराजांचे नोकर आहेत असें कोणालाही वाटावयाचें नाहीं.

त्यांच्याशी उद्दामपणानें वर्तन केल्यानें त्यांच्यांत असंतोष फैलावणें स्वाभाविक आहे. राजघराण्यांत एकाची चुगली दुसऱ्याजवळ सांगणें यांचें सहज काम आहे. कधीं कधीं हे कैसरीन आणि कैसर यांचें हुकूमसुद्धां धाब्यावर बसवितात; पण इतक्या चतुराईनें हें काम करितात कीं, ते कोणाच्या लक्षांतसुद्धां येत नाहीं; व त्यामुळें त्यांजवर कोणी रागावत नाहींत. एकदां कैसरीनकडे अमेरिकेचा वकील भेटण्यास आला होता. तेव्हां त्याला दाखविण्यासाठीं आपल्या सर्वांहून धाकटचा राजकुरास आणण्याची आज्ञा झाली. तेव्हां तेथें उभी असलेल्या मुख्य दासीनें सांगितलें कीं,

" बाईसाहेब, मला आठवतें कीं, दोन मिनिटापूर्वी राजकुमार आपल्या दाईबरोबर हवा खाण्याकरितां बाहेर गेले आहेत. "

कैसरीन—" कधींच शक्य नाहीं. मी त्या दासीला साफ निक्षून सांगितलें आहे कीं, त्याला खाऊं घातल्याशिवाय बाहेर नेऊं नये. "

य नंतर ती मुख्य दासी राजकुमाराला पाहण्यासाठीं गेली. परंतु तेथें जातांच राजकुमार खरोखरच बाहेर गेले असल्याचें तिला

आढळून आलें. परत आल्यावर तिनें ती हकीकत कैसरीनबाईंना सांगितली. यावर त्या कांहींशा रागानें म्हणाल्या:— " या दाईनें माझा हुकूम कां पाळला नाहीं तें माझ्या कांहीं लक्ष्यांत येत नाहीं."

यावर मुख्य परिचारिका म्हणाली:— " बाईसाहेब ! ती तेथें असलेल्या एका बाईजवळ म्हणाली कीं, लहान मुलांना हवा खाण्यासाठीं बाहेर केव्हां न्यावें हें मला ठाऊक आहे."

तें ऐकून कैसरीनबाई आपल्या मनांत खजील झाल्या. तथापि वरकांती त्या वकिलाजवळ म्हणाल्या:—

" पहा, नोकर तितके सर्वत्र सारखेच ! मोठे नष्ट व खाष्ट असतात. हे सर्व घरांतले मालकच होऊन बसतात. आतां मुलगा घरीं असल्यावेळीं आपण आला असतां; मी तो तुम्हांला अवश्य दाखवीन."

इकडे हे असंतुष्ट सेवक कधीं कधीं कैसरचें गुप्त रहस्य उघडकीस आणण्यास तयार होतात. सन १८९५ सालीं यांनीं असा एक नियमच करून टाकला होता कीं, आपल्या राजधानींतून आपल्या ट्रेनमध्यें बसून ५ मिनिटांत वाइल्डपार्क स्टेशनवर जाऊन तेथें रात्रभर निजावयाचें; व त्याप्रमाणें त्यांनीं कित्येक महिने चालविलें होतें. यावर त्यांचे नोकर तेथील पार्लमेंटच्या सभासदांना अशी सूचना देणार होते कीं, कैसर तेथें जाऊन स्टेशनला आपलें शयनागार बनवितात, सबब हें उचित कीं अनुचित याविषयीं रेल्वे प्रधानाला प्रश्न करण्यांत यावा. परंतु पुढें त्यांनीं ही गोष्ट तशीच राहूं दिली. हें तर एक साधेंच उदाहरण आहे. राजवाड्यांतले

## कैसरचें मनश्चित्र !

नौकर आपला मोबदला मिळण्याच्या धडपडींत नेहमीं असतात व त्यामुळें ते कधीं कधीं तर भलतेंच काम करून बसतात.

वाटेल तो आफिसर अगर नोकर असो, कैसरची नोकरी करितांना त्याला आपल्या अंगीं असलेल्या प्रामाणिकपणा व सौजन्य या गुणांना राजवाड्याच्या दरवाजाबाहेरच सोडावें लागतें. तसेंच त्यानें हें ही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, मी कांहींच नसून जें काय आहे तें सर्व कैसर व कैसरीनच आहेत. त्यानें केवळ सांगितलेली कामगिरी बजावली पाहिजे आणि आपल्या मालकाचा धाकदपटशा व मारहाण मुकाट्यानें सहन केली पाहिजे. नोकरीवर असतांना कैसर अगर कैसरीन यांनीं कांहीं अपमान अगर अनादर केला तर स्त्री असो कीं पुरुष असो त्याच्या मनांत त्याबद्दल कांहींही न वाटलें पाहिजे. जर कधीं कैसरच्या दडपशाहीनें त्याला राग आलाच तर तो त्यानें आपल्या हाताखालच्या नोकरावर काढावा. ज्या स्त्रीमध्यें अगर पुरुषामध्यें हा गुण नसेल अगर त्याला तो आपल्या अंगीं आणतां येत नसेल त्यानें कैसरच्या येथें नोकरी करण्याची इच्छा करूं नये अगर नोकरी करून ती यशस्वी होईलच असा भरंवसा ठेवूं नये.

REFBK-0001409
REFBK-0001409

समाप्त.

ठाणे
१४०१

# ज्ञानमित्र पुस्तकमाला.

## प्रतिज्ञा व नियम.

महाराष्ट्रांतील सुशिक्षित, अल्पशिक्षित व पुढारी बंधुभगिनींना रुचतील, पचतील आणि परिणामी हितकारक होईल असें ' ज्ञानामृत ' पाजून वाचकांना आपल्या खऱ्या कर्तव्याची ओळख पटवून देणारी औद्योगिक शास्त्रीयविषयावर छोटी छोटी पुस्तकें आणि प्रगमशील व प्रगतिकारक विचारांच्या रहस्यपूर्ण ऐतिहासिक व सामाजिक चटकदार कादंबऱ्या, जगांतील थोर विभूतींची मननीय चरित्रें प्रकाशित करण्याची सदर मालेची प्रतिज्ञा आहे.

( १ ) फक्त चार आणे प्रवेश फी भरणाऱ्यास ग्राहक समजलें जातें. कायमच्या आश्रयदात्यांत केव्हांही नांव दाखल करतां येतें. ( २ ) ग्राहक झाल्यानंतर पुढें प्रत्येक पुस्तक घेतलेंच पाहिजे. मागील पुस्तकें वाटल्यास घ्यावीत. ( ३ ) प्रत्येक अडीच तीन महिन्यांनीं एक किंवा दोन पुस्तकें ग्राहकांकडे ८६ आण्यापासून १८४ आणे पर्यंतच्या व्ही. पी.नें रवाना होतील. ( ४ ) कायमच्या ग्राहकास तूर्त दर खेपेस ८२ आण्यापासून ८४ पर्यंत लागणारा टपाल, व्ही. पी. व प्याकिंग खर्च माफ करून पुस्तकाच्या मूळ किंमतीतच पुस्तक घरपोंचतें करण्यांत येईल. लढाईनंतर प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीत देऊं. ( ५ ) कायमच्या आश्रयदात्यांकडे व्ही. पी करण्यापूर्वी सहा दिवस कार्ड पाठवून अगाऊ सूचना देण्यांत येतें व्ही. पी. घेणें नसल्यास तावडतोब स्पष्ट कळवावें.